# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ बुधवार २७ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## विद्यार्थ्यांच्या खात्यात एक रुपयाही नाही

### शिष्यवृत्ती रखडल्याने संतापाचा उद्रेक

**गडचिरोली /वृत्तसंस्था-**: सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्रातील द्वितीय हप्ता तसेच २०२५-२६ या सत्रातील संपूर्ण शिष्यवृत्ती अद्याप वितरित न झाल्याने गडचिरोली जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.



दीड वर्ष उलटूनही विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीचा एक रुपयाही जमा झाला नसल्याने पालक व विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. समाजकल्याण, आदिवासी विकास व ओबीसी विभागाच्या कार्यप्रणालीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, एसबीसी, एनटी प्रवर्गातील इयत्ता ११ वीपासून पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ दिला जातो. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली. मात्र, अद्यापपर्यंत शिष्यवृत्तीची रक्कम बँक खात्यात जमा झालेली नाही. त्यामुळे शिक्षणाचा खर्च भागविताना विद्यार्थ्यांसह पालकांचीही आर्थिक कसरत वाढली आहे.

**आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप कर-** मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे सत्र २०२५-२६ चे शिक्षण शुल्क व शिष्यवृत्ती अद्याप प्रलंबित असल्याने त्यांच्या शिक्षणावर ☞(पान २ वर)

# मोबाईलवर सायरन वाजताच ‘युद्ध की भूकंप’?

## नागरिकांमध्ये खळबळ; हा तर विदर्भाला ‘रेड अलर्ट’ !

**नागपूर/प्रतिनिधी :** मंगळवारी भर दुपारच्या वेळी अचानक एकाच वेळी अनेकांच्या मोबाईलवर अलार्म लावल्यासारखा सायरन वाजू लागला आणि लोकांची चांगलीच घाबरगुंडी उडाली. अचानक घर्रर्र वाजल्याने दचकलेल्या अनेकांच्या हातातून मोबाईल पडला. काही क्षण कुणाला काहीच समजले नाही. मात्र काही वेळाने हा अलार्म केवळ एकाच्या नाही, तर एकाचवेळी अनेकांच्या मोबाइलवर वाजत असल्याचे लक्षात आले. तेव्हा लक्ष देऊन बघितल्यावर मोबाइलच्या स्क्रिनवर एक संदेश दिसला, ज्यामध्ये २४ तासात तीव्र उष्ण लाटेचा इशारा देण्यात आला होता. सर्वांचा गोंधळ उडविणाऱ्या या अलर्टने उष्ण लाटेचे संकट किती गंभीर आहे, हेच दाखवून दिले.



‘पुढील २४ तासात अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा या जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी तीव्र उष्णतेची लाट येण्याची आणि तुरळक ठिकाणी रात्र उष्ण राहण्याची दाट शक्यता आहे -मंत्रालय मुंबई’ असा हा इशारा देणारा संदेश अनेकांच्या मोबाइलवर झळकला. विशेष म्हणजे हा सायलेंट मोडमध्येही अनेकांच्या फोनवर मोठ्या आवाजात वाजल्याने नागरिक अधिकच चक्रावून गेले. भीषण उष्णतेने आधीच हैराण झालेल्या नागरिकांसाठी हा संदेश धक्कादायक ठरला. यात नागपूरचा उल्लेख असल्याने शहरातील लाखो लोकांच्या मोबाइलवर अलर्ट गेला असेल, हे निश्चित आहे. शिवाय अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा या शहरातील लाखो लोकांच्या मोबाइलवरही हा अलर्ट वाजल्याची माहिती आहे. रस्त्यावर, कार्यालयात, बँकांमध्ये, बाजारपेठांमध्ये आणि अगदी बैठकीदरम्यानही अचानक वाजलेल्या या इशाऱ्यामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अनेकांनी घाईघाईने मोबाईल हातात घेत संदेश वाचण्यास सुरुवात केली. काही नागरिकांना हा ‘भूकंप किवा युद्धाचा इशारा तर नाही ना!’ असेही वाटून गेले.

गेल्या काही दिवसात सूर्यदेव विदर्भावर अक्षरशः आग ओकतेय की काय, ☞(पान २ वर)

# अमेरिका-इराण ऐतिहासिक करार मसुदा अखेर तयार

## ६० दिवसांचा युद्धबंदीचा प्रस्ताव; होर्मुझ खुली होणार

**वॉशिंग्टन/तेहरान/वृत्तसंस्था-** अमेरिका आणि इराण यांच्यातील दीर्घकालीन तणाव निवळण्याची चिन्हे असून दोन्ही देशांमध्ये एका प्राथमिक कराराचा मसुदा तयार झाला आहे. आखातातील एका विश्वासार्ह वृत्तवाहिनीने या कराराच्या अंतिम मसुद्याची प्रत मिळवल्याचा दावा केला असून यामध्ये दोन्ही देशांनी अनेक महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर सहमती दर्शवली आहे.



६० दिवसांची युद्धबंदी, होर्मुझ खुली होणार

या प्राथमिक करारानुसार, दोन्ही देशांमध्ये पुढील ६० दिवसांसाठी युद्धबंदी लागू केली जाईल. ती परस्पर संमतीने वाढवता येऊ शकते. तसेच जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी होर्मुझची सामुद्रधुनी आंतरराष्ट्रीय जहाजांसाठी पुन्हा खुली करण्यात येईल. या मार्गावरून तेलवाहू जहाजांना कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय सुरक्षित प्रवास करता येईल. इराण पुढील ३० दिवसांत या भागातील सागरी अडथळे आणि सुरुंग हटवण्यास तयार झाला आहे.

या कराराच्या मोबदल्यात अमेरिकेने इराणवरील आर्थिक निर्बंध शिथिल करण्याचे मान्य केले आहे. इराणला पुन्हा एकदा कच्च्या ☞(पान २ वर)

# राज्यातील NCC प्रशिक्षणासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देणार- चंद्रकांत पाटील यांची ग्वाही

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रीय छात्र सेना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासोबतच देशहिताची भावना निर्माण करणारी प्रभावी चळवळ असून राज्यातील एनसीसी प्रशिक्षणासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील विविध मान्यवर उपस्थित होते. मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, एनसीसी ही केवळ शैक्षणिक उपक्रमांची योजना नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण, शिस्त, राष्ट्रसेवा आणि संघटन कौशल्य विकसित करणारे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. विद्यार्थ्यांचा प्रशिक्षणामध्ये अधिकाधिक सहभाग वाढण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असून प्रशिक्षणाचे नियोजन अधिक प्रभावी आणि कालबद्ध पद्धतीने करण्यात यावे.



मुंबई आणि नागपूरसारख्या महानगरांमध्ये जागेच्या अडचणी असल्याचे निदर्शनास आले असून त्या तातडीने दूर करण्यासाठी क्रीडा व युवक कल्याण विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची संयुक्त बैठक घेऊन एनसीसी प्रशिक्षणासाठी स्वतंत्र व सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासनही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले. राज्याच्या विकासात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून एनसीसीसारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, नेतृत्व क्षमता, शिस्त आणि राष्ट्रभक्तीची भावना विकसित होत असल्याचे सांगत अशा योजनांना शासनाकडून अधिक बळ दिले जाईल, असेही मंत्री पाटील यांनी नमूद केले.

एनएसएसप्रमाणेच एनसीसी ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासोबतच देशहिताची भावना निर्माण करणारी प्रभावी चळवळ असून राज्यातील एनसीसीमधील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी तसेच एनसीसी प्रशिक्षण ☞(पान २ वर)

# डिझेल टंचाईने शेतकरी हैराण;

## अमळनेरात वाळूच्या डंपरांना अडवून संताप व्यक्त

**जळगाव /वृत्तसंस्था- :** जिल्ह्यात डिझेल आणि पेट्रोलच्या टंचाईमुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना, अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरांना मात्र सहज इंधन उपलब्ध होत असल्याचा आरोप करत अमळनेरातील शेतकऱ्यांनी संतप्त आंदोलन छेडले. बाजार समितीचे माजी सभापती श्याम अहिरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी रात्री रस्त्यावर उतरून वाळू वाहतूक करणारे डंपर अडवले



आणि प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

सध्या खरीप हंगामपूर्व मशागतीची कामे सुरू असून, ट्रॅक्टरसाठी डिझेलची मोठी गरज आहे. मात्र, पेट्रोल पंपांवर तासनतास प्रतीक्षा करूनही शेतकऱ्यांना ☞(पान २ वर)

### आशिक’चे कारनामे

## एक.... दोन नव्हे तब्बल १४० तरुणींना गंडा!

**डोंबिवली मुंबई/प्रतिनिधी : :** फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर मैत्री, मग प्रेमाचे नाटक, विश्वास जिंकून शारीरिक संबंध आणि शेवटी त्यांच्याच नावावर लाखो रूपयांचे कर्ज काढून पोबारा...असा फंडा वापरणाऱ्या आदर्श म्हात्रे (३४) याचा पर्दाफाश झाला आहे. डोंबिवलीतील एका पीडित तरूणीने धाडस दाखवून मानपाडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्याने आदर्शचे बिंग फुटले.. या तक्रारीच्या आधारे



पोलिसांनी आरोपी आदर्श म्हात्रे याला बेड्या ठोकल्या आहेत.

फेसबुक-इन्स्टाग्रामवर रिक्वेस्ट पाठवून मैत्री करणे, प्रेमाच्या ☞(पान २ वर)


# बुकिंग करूनही गॅस नाही; सिलिंडरसाठी नागरिकांची धावपळ

**धुसाळा (कांद्री) / वृत्तसंस्था-:** ग्रामीण भागात सध्या स्वयंपाकाच्या गॅसचा गंभीर तुटवडा निर्माण झाला असून नागरिकांना सिलेंडरसाठी अक्षरशः जीवाचे रान करावे लागत आहे. सिलिंडर बुक करूनही वेळेवर मिळत नसल्याने गृहिणी पुन्हा धुराच्या चुलीकडे वळल्या आहेत. कांद्री, काटी, खमारी, धुसाळा परिसरातील शेकडो नागरिकांनी गॅस एजन्सीच्या कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे.



अखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात अनेक अत्यावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाल्याची चर्चा असताना ग्रामीण भागात गॅस सिलेंडरचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. विशेष म्हणजे या परिसरातील बहुतांश ग्राहक हे एचपी गॅसधारक असून त्यांची मुख्य एजन्सी भंडारा येथे आहे. मागील तीन ते चार महिन्यांपासून गावागावांत नियमितपणे गॅस गाड्या पोहोचत नसल्याने नागरिकांचे मोठे हाल होत आहेत.

पूर्वी गावात थेट गॅस वितरण करणाऱ्या गाड्या नियमित येत होत्या. मात्र, आता गाडी आली तरी काही मिनिटांतच सिलिंडर संपून जात ☞(पान २ वर)



# बोहल्यावर चढण्यापूर्वीच पीएसआय तरुणाने बंदुकीचा धाक दाखवत लग्नाला दिला नकार

## मुलीच्या कुंटूंबियाकडून फसवणुकीचा गुन्हा दाखल

**गेवराई :** जनतेचे रक्षण आणि न्याय देण्याची जबाबदारी असलेल्या वर्दीतील अधिकाऱ्यावरच एका तरुणीचे आयुष्य उद्ध्वस्त केल्याचा गंभीर आरोप झाल्याने बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. लग्न अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले असताना पीएसआय पदावर कार्यरत असलेल्या तरुणाने अचानक लग्नास नकार दिल्याचा आरोप मुलीच्या कुटुंबीयांनी केला असून, या प्रकरणामुळे ‘कुंपणानेच शेत खाल्ले का?’ असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. मातोरी येथील या प्रकरणाची जिल्हाभर जोरदार चर्चा सुरू असून चकलांबा पोलीस ठाण्यात दोन्ही बाजूंकडून परस्परविरोधी तक्रारी दाखल झाल्या आहेत.

**साखरपुड्यानंतर लग्नाची तयारी; लाखोंचा खर्च**



मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पीएसआय पवन निंबाळकर यांनी लग्नाचे आश्वासन देत साखरपुडा केला. त्यानंतर लग्नासाठी सोने, कपडे तसेच विविध साहित्याची खरेदी करण्यात आली. कुटुंबीयांनी कष्टाने जमा केलेली आयुष्यभराची पुंजी मुलीच्या लग्नासाठी खर्च केली.

घरात लग्नाची लगबग सुरू असताना आणि निमंत्रण पत्रिका वाटपाची तयारी सुरू असतानाच नवरदेवाकडून अचानक लग्नास नकार देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे मुलीच्या कुटुंबीयांना मोठा मानसिक, आर्थिक आणि सामाजिक धक्का बसल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकरणात सर्वाधिक गंभीर आरोप ☞(पान २ वर)




# दर्यापूरात काँग्रेसला खिंडार
## -सुधाकर भारसाकळे शिंदे गटात प्रवेश करणार

आ. बच्चू कडू यांच्या नेतृत्वात करणार प्रवेश



**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी निडवणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांनी आतापासून मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे. विधानपरिषदेच्या निवडणुकी दरम्यान बच्चू कडू यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर आता दर्यापूर काँग्रेस नेते सुधाकर भारसाकळे पाटील शिवबंधन बांधणार असल्याचे बोलले जात आहे. दर्यापूर येथील माहेश्वरी भवन मध्ये आयोजित कार्यकर्ता आणि संवाद मेळाव्यामध्ये त्यांनी स्वतःचा यासंदर्भात अधिकृत घोषणा केली आणि आमदार बच्चू कडू यांच्यासोबत मिळून जिल्ह्यात शिंदेसेनेची ताकद वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याचे म्हटले. त्यांच्यासह शेकडो कार्यकर्ते शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. भारसाकळे शिवसेनेत पक्ष प्रवेश करणार असल्याने काँग्रेसला मोठा धक्का बसणार आहे. सहकार नेते आणि काँग्रेसचे माजी दर्यापूरचे तालुकाध्यक्ष सुधाकर भारसाकळे यांनी आज मंगळवारी कार्यकर्ता मेळावा आयोजित केला. या कार्यकर्ता मेळाव्यात सुधाकर भारसाकडे यांनी शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे स्पष्ट संकेत दिलेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि बच्चू कडू यांच्या उपस्थितीत सुधाकर भारसाकडे हे समर्थकांसह शिंदे सेनेत पक्षप्रवेश करणार आहेत. सुधाकर भारसाकडे यांच्या कार्यकर्ता मेळाव्यात काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. भारसाकळे यांच्या शिंदे सेनेत जाण्यामुळे काँग्रेसला मोठा धक्का लागलेला आहे. येणाऱ्या दोन दिवसात ते प्रवेश करणार आहे. कार्यकर्ता मेळाव्या मध्ये खरेदी-विक्री संघ अध्यक्ष गजानन जाधव, बाजार समिती उपसभापती राजू पाटील कराळे, उपाध्यक्ष अहमद खान शहद खान,मंडी संचालक गजानन देवतळे, साहेबराव भदे, राजेश खेडकर, राजेश राठी, मधुसूदन पाचवे, भैय्यासाहेब टेकाळे, संजय चांदुरकर, कैलास आवडते, संतोष भोंडे आदी उपस्थित होते.

# डॉ.नितीन धांडे, गणेश खारकर, देशमुखांसह २४ नामांकनाची उचल

**विधान परिषद निवडणूक**

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज प्रक्रियेला सोमवारपासून सुरुवात झाली आहे. सोमवारी पहिल्या दिवशी प्रवीण पोटे,अनुराधा पोटेंसह १६ नामांकन उचलण्यात आले होते, तर मंगळवारी दुसऱ्या दिवशी भाजपा शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, गणेश खारकर, हर्षजीत देशमुख यांच्यासह २४ नामांकन उचलण्यात आले आहे. एक जून पर्यंत नामांकन प्रक्रिया चालणार आहे. आता विधानपरिषद निवडणुकीचे वातावरण तापत आहे.

यंदाच्या निवडणुकीत महापालिकेतील ८ तसेच विविध नगरपालिकेतील ३४ स्वीकृत नगरसेवकांना मतदानाचा अधिकार मिळाल्याने सदस्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले आहे. काँग्रेसच्या कडून आज संभावित उमेदवार हर्षजित देशमुख यांच्यासाठी चार नामांकन उचलण्यात आले तसेच डॉक्टर गणेश खारकर यांनी तीन, त्यांची पत्नी अरुणा खारकर यांनी दोन व भाचे अभिजीत रमण खानकर यांनी पण एक नामांकन उचलला आहे. या व्यतिरिक्त समीर भारत चौधरी, सुभाष श्रीखंडे, प्रा राधेश्याम यादव, प्रा प्रवीण इचे, सजील खान, खलील खान, एड. डॉ. धनंजय तोटे, अब्दुल नाझीम अब्दुल रऊफ व विकेश गवाले यांनी नामांकन उचलले.

## १ व १० वरील उर्वरित

### विद्यार्थ्यांच्या खात्यात एक

विपरीत परिणाम होत असून नैराश्य वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. शासनाने त्वरीत कार्यवाही करून प्रलंबित शिष्यवृत्ती व शुल्क वितरित करावे, अन्यथा विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम होण्याची शक्यता शिक्षण संस्थाचालक, प्राचार्य व शिक्षकांनी व्यक्त केली आहे.

जिल्ह्यात अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या
८५०० ओबीसी विद्यार्थी
३५०० एससी विद्यार्थी
४७०० एसटी विद्यार्थी
१२५० एनटी, एसबीसी

या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना प्रतीक्षा

जिल्ह्यातील कला, वाणिज्य, विज्ञान, फार्मसी, आयटीआय, पॉलिटेक्निक, कृषी, नर्सिंग, बीएड तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकणाऱ्या हजारो मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची प्रतीक्षा लागली आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली असतानाही अद्याप त्यांच्या खात्यात शिष्यवृत्ती जमा झालेली नाही. अनेक विद्यार्थ्यांना प्रवास, पुस्तके व महाविद्यालयीन शुल्क भरण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. अनेक गरीब विद्यार्थ्यांनी उधार, उसनवार करून शुल्क भरले आहे. मात्र त्याची प्रतिपूर्ती झाली नाही.

### मोबाईलवर सायरन वाजताच

अशी स्थिती आहे. विदर्भातील ९ जिल्हे उष्ण लाटेच्या सावटात आहेत आणि बहुतेक शहरांचा पारा ४५ अंशाच्या वर गेला आहे. देशातील सर्वात उष्ण शहरांच्या यादीत पहिल्या दहामध्ये विदर्भाची पाच शहरे आहेत. घराबाहेर पडले की आगीचे चटके लागताहेत व शरीर भाजल्याची जाणीव होत आहे. त्यामुळे आजचा हा इशारा लोकांना घाबरविणारा नक्कीच ठरला आहे.

### अमेरिका-इराण ऐतिहासिक

तेलाची आंतरराष्ट्रीय बाजारात विक्री आणि निर्यात करता येईल. अमेरिकेकडून इराणच्या बंदरांवरील निर्बंध हटवले जातील. इराणचे परदेशात गोठवलेले काही आर्थिक निधी पहिल्या टप्प्यात मुक्त केले जातील.

**अणुकार्यक्रमावर चर्चा आणि प्रादेशिक शांतता-** या ६० दिवसांच्या कालावधीत इराणच्या वादग्रस्त अणुकार्यक्रमावर दोन्ही देश पुन्हा दीर्घकालीन तोडगा काढण्यासाठी चर्चा करतील. याशिवाय लेबनॉनसह संपूर्ण मध्य पूर्वेतील लष्करी कारवाया थांबवून प्रादेशिक शांतता प्रस्थापित करण्यावर भर दिला जाईल.

**या मुद्द्यांवर अजूनही मतभेद-** मसुद्यात बहुतांश मुद्द्यांवर सहमती झाली असली, तरी दोन मुख्य विषयांवर अजूनही वाद सुरू आहेत

### राज्यातील NCC प्रशिक्षणासाठी

अकादमीसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, असे प्रतिपादन मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. राज्यामध्ये एनसीसीसाठी प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी जागेची उपलब्धता कशाप्रकारे करता येईल तसेच प्रशिक्षण केंद्रांना आवश्यक सोयी-सुविधा कशा पुरवता येतील, याबाबत एनसीसी अधिकाऱ्यांसोबत सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युवकांसाठी सुरू केलेल्या प्रधानमंत्री इंटर्नशिप स्कीम (इश्घ्ए) अंतर्गत युवकांना अधिकाधिक सहभागी करून घेण्यासाठी आणि त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध संधींबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

### डिझेल टंचाईने शेतकरी

डिझेल मिळत नसल्याने शेतीची कामे रखडली आहेत. अशा परिस्थितीत अवैध वाळू वाहतुकीतील वाहनांना कोणतीही अडचण न येता डिझेल पुरवठा कसा होतो, असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला.

आंदोलकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, 'शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल देताना नियम पुढे केले जातात, मग अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरांसाठी हे नियम लागू होत नाहीत का?' असा थेट सवाल केला.

### आशिक'चे कारनामे

जाळ्यात ओढून भावनिक जवळीक व शारीरिक संबंध प्रस्थापित करणे, विश्वास संपादन करून त्यांच्या कागदपत्रांचा वापर करून त्यांच्याच नावावर बँकांमधून लाखो रुपयांचे कर्ज मंजूर करून घेणे आणि शेवटी पैसे हातात येताच मोबाईल बंद करून पोबारा करणे, असा या बदमाशाचा फसवणूक करण्याचा फंडा असायचा. तपासात समोर आलेली १४० हून अधिक तरूणींची आकडेवारी पाहून पोलिसही अवाक् झाले आहेत. यापूर्वी याच स्वरूपाच्या गुन्ह्यांसाठी नवी मुंबई पोलिसांनी त्याला अटक केली होती.

११ तरूणींचे धाडस...अन् झाली अटक

फसवणुकीला कंटाळून आतापर्यंत ११ पीडित महिला व तरूणींनी धाडस दाखवून पोलिसांकडे अधिकृत तक्रारी नोंदविल्या आहेत. नवी मुंबई पोलिसांनी आदर्शला अटक केल्याची बातमी आल्यानंतर डोंबिवलीतील एका पिडीत तरूणीनेही धाडस दाखवून मानपाडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीपान शिंदे यांनी या तरूणीला धीर देऊन आरोपीच्या विरोधात कारवाई करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार पिडीत तरूणीने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तातडीने तपास चक्रांना वेग देऊन आरोपी आदर्श म्हात्रे याचा ताबा घेऊन त्याच्यावर अटकेची कारवाई केली.

आदर्श म्हात्रे याच्या विरोधात फसवणूक, विश्वासघात व आयटी ?क्ट अंतर्गत गुन्हे दाखल असून आणखी किती तरूणींची फसवणूक झाली आहे याचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीपान शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे खास पथक करत आहे.

पोलिसांचे आवाहन- समाज माध्यमांवरील अनोळखी व्यक्तींवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका. आर्थिक व्यवहार व कागदपत्रे शेअर करताना सावध रहा. अशा प्रकारे फसवणूक झाल्यास तात्काळ सायबर सेल किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधा.

### बुकिंग करूनही गॅस

असल्याने नागरिकांमध्ये झुंबड उडत आहे. अनेकांना सिलिंडर बुक करूनही मिळत नाही. तर काही ग्राहकांना ओटीपी वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. ओटीपी आल्यानंतर एजन्सीवर गेल्यावर 'तारीख संपली' असे सांगून ग्राहकांना परत पाठविले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. गावात सिलिंडर मिळत नसल्यामुळे अनेकांना थेट भंडारा कोचे येथील एजन्सीपर्यंत जावे लागत आहे. यामध्ये दिवसभराचा वेळ, वाहन खर्च आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. अधिकृत दर ९७४ रुपये असताना ग्राहकांना अधिकचे पैसे द्यावे लागत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. उन्हाच्या तीव्र झळांमध्ये दिवसभर रांगेत उभे राहूनही सिलिंडर मिळेल याची खात्री नसल्याने ग्रामीण नागरिकांमध्ये प्रशासन आणि एजन्सीविरोधात तीव्र रोष निर्माण झाला आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून ग्रामीण भागातील गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

सिलिंडरसाठी सक्तीची खरेदी

ग्रामीण भागातील नागरिकांना गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी एजन्सीकडून अतिरिक्त साहित्य खरेदी करण्यास भाग पडावे लागत आहे. घरात गॅस पाईप किंवा इतर साहित्य उपलब्ध असतानाही 'हे घ्यावेच लागेल' नाहीतर सिलिंडर मिळणार नाही अशी सक्ती केली जात आहे. सिलिंडरच्या गरजेपोटी नागरिकांना नाइलाजाने अधिक पैसे खर्च करावे लागत आहेत.

### बोहल्यावर चढण्यापूर्वीच पीएसआय

म्हणजे संबंधित अधिकाऱ्याने बंदुकीचा धाक दाखवत धमकावल्याचा आहे. मुलीच्या कुटुंबीयांनी तक्रारीत हा आरोप नमूद केला असून, 'ज्या वर्दीवर विश्वास ठेवून सामान्य माणूस न्यायासाठी पोलीस ठाण्यात जातो, त्याच वर्दीतील अधिकाऱ्याने आमच्या मुलीच्या आयुष्याशी खेळ केला,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

'बंदुकीचा धाक दाखवत धमकावले'

'आम्ही पै-पै साठवून मुलीच्या लग्नाची तयारी केली होती. समाजात प्रतिष्ठा पणाला लावली. मात्र ऐनवेळी नकार देऊन आमची अब्रू, पैसा आणि मुलीचे भविष्य उद्ध्वस्त केले,' असा आरोप मुलीच्या वडिलांनी करून आम्हाला बंदुकीचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी देखील देण्यात आली असल्यचे मुलीच्या नातेवाईकांनी या तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी चकलांबा पोलीस ठाण्यात पीएसआय पवन निंबाळकर यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. मुलीच्या कुटुंबीयांनी संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दोन्ही बाजूंकडून परस्परविरोधी आरोप-प्रत्यारोप होत असल्याने पोलिस प्रशासनाकडून या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. तपासानंतरच नेमकी सत्य परिस्थिती स्पष्ट होणार असली, तरी या घटनेमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. वर्दीतील अधिकाऱ्यांवर अशा प्रकारचे गंभीर आरोप झाल्याने सर्वसामान्यांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात असून, या प्रकरणाकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### रामपुरी कॅम्पमधील बिबट जेरबंद

पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. हलक्या पावसातही शेकडो नागरिक घटनास्थळी ठाण मांडून होते. पोलिसांना गर्दी नियंत्रणासाठी मोठी कसरत करावी लागली. रेस्क्यूदरम्यान बिबट्याची हालचाल टिपण्यासाठी गोदामाभोवती जाळे, लोखंडी पिंजरा आणि विशेष उपकरणांचा वापर करण्यात आला. काही वेळ बिबट्या अत्यंत आक्रमक अवस्थेत असल्याने पथकाला संयमाने काम करावे लागले. अखेर संध्याकाळच्या सुमारास बिबट्याला सुरक्षितरीत्या पकडण्यात यश आले आणि उपस्थित नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. वन अधिकाऱ्यांच्या प्राथमिक अंदाजानुसार, वाढत्या उष्णतेमुळे आणि पाण्याच्या शोधात हा बिबट्या शहराच्या दिशेने आला असावा. यापूर्वीही अमरावतीतील काही भागांत बिबट्यांच्या हालचाली दिसून आल्या आहेत. या संपूर्ण मोहिमेत वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप भाड यांच्या नेतृत्वाखाली वनपाल शाम देशमुख, फिरोज खान, अमोल गावणेर, बाबुराव खेरकर, गजानन लांदे, अतुल धसकट, संदीप ठाकरे, कैलास इंगळे, धारपवार, आकाश सारडा, गायकवाड, थोटे तसेच वनमजूर मनोज ठाकूर, ओंकार भुरे, वाहनचालक संदीप चौधरी, अक्षय चांबतकर, सुशील तायडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. याशिवाय गाडगे नगर पोलिसांचे पीआय गोरखनाथ जाधव, पीएसआय रोकडे, आरसीपी पथक, महानगरपालिकेचे पशुवैद्यकीय अधिकारी सचिन बोंद्रे, तसेच स्वयंसेवी संस्थांचे शंतनू पाटील व सुमित गवई हेही मोहिमेत सहभागी होते. पकडलेल्या बिबट्याला प्राथमिक वैद्यकीय तपासणीनंतर वडाळी वनक्षेत्रात हलविण्यात आले असून, तो पूर्णतः निरोगी असल्याची माहिती वन विभागाने दिली. बुधवारी त्याला नैसर्गिक अधिवासात सुरक्षितरीत्या सोडण्यात येणार आहे.

### मुऱ्हा देवी येथील मिनी बँक

सुर्जी शाखेत जाऊन चौकशी केली. बँकेने तपासणी केली असता, महिलांकडे असलेल्या पैसे भरल्याच्या पावत्या बनावट असल्याचे समोर आले. मिनी बँक संचालकाने महिलांकडून पैसे तर घेतले, पण ते बँकेच्या मुख्य खात्यात जमाच केले नसल्याचे निष्पन्न झाले.

सेंटर बँक ऑफ इंडिया शाखा अंजनगाव सुर्जी येथे मंगळवारी दिनांक २६ रोजी दुपारी ५ वाजता ही चौकशी सुरू होती. बँक प्रशासनाने केवळ दोन तास प्राथमिक चौकशी केली असता, फक्त तीन बचत गटांचे मिळून १० लाख रुपये गायब असल्याचे दिसून आले. अद्याप ७ ते ८ बचत गट आणि इतर वैयक्तिक खातेदारांची चौकशी होणे बाकी आहे. प्राथमिक अंदाजानुसार हा आकडा ४० लाखांच्या घरात जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून उद्यापर्यंत चौकशी पूर्ण होणार असल्याने मिनी बँक संचालकांवर गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे.

ग्रामीण भागात बँकेचा ताण कमी करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या सोयीसाठी हे BC पॉईंट्स सुरू करण्यात आले होते. मात्र, अशा प्रकारच्या फसवणुकीमुळे सामान्य शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी महिलांचा बँकिंग व्यवस्थेवरचा विश्वास धोक्यात आला आहे. या प्रकरणी आता पोलीस तक्रार आणि सखोल चौकशीची मागणी बचत गटाच्या महिलांनी केली आहे.

### शहीद भगतसिंग हॉकर्स युनियनचे

पदाधिकारी व सदस्यांनी प्रहार संघटनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

प्रवेश सोहळ्यात बोलताना गणेश मारोडकर यांनी बच्चू कडू यांच्या नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त केला.'बच्चू कडू हे सर्वसामान्यांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व आहे. त्यांनी आजपर्यंत शेतकरी, शेतमजूर तसेच दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करत त्यांना न्याय मिळवून दिला आहे. जिल्हाप्रमुख छोटू महाराज वसू व महानगर प्रमुख बंटी रामटेके यांच्या मार्गदर्शनात प्रहारच्या पद्धतीने हॉकर्स बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठीही ते खंबीरपणे पाठीशी उभे राहतील,' असे ते म्हणाले.

या विलीनीकरणामुळे अमरावतीतील हॉकर्स अधिक संघटित होणार असून, त्यांच्या विविध प्रश्नांना प्रहारच्या माध्यमातून अधिक ताकदीने आवाज मिळेल, अशी भावना यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी गणेश मारोटकर संस्थापक अध्यक्ष, विशाल सहारे, दिनेश हरणे, वंदना शिरभाते, रितू लोखंडे, अमोल कुऱ्हाडकर, नितीन अठवर्धन, गजानन स्वर्गे, मोहम्मद अय्याज, सादभाई घानिवाले, कलीम मेमन, अभिजित जोंधळे, नितीन इंगळे, विनोद इंगळे, जय कपिले, राहुल गाखरे,आशिष ढोले, अंकुश तळकीत,पासुभाई, बिट्टूभाई उर्फ वाजीद बेग, इरफान अली, राजा साहू हर्षद इंगोले उपस्थित होते.

### फिशरीज हब प्रकल्पाच्या प्रगतीचा

निर्देश संबंधित विभाग प्रमुखांना देण्यात आले. विशेषतः पाण्याच्या टाकीचे बांधकाम व अन्य आवश्यक विकासकामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत सूचना करण्यात आल्या.

तसेच प्रकल्पाच्या उर्वरित विकासकामांबाबत आणि तांत्रिक बाबींवर आवश्यक तपासणी करून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्हा परिषदेमार्फत बारमाही तलावांमध्ये उत्पादित होणारे मासे या प्रकल्पाशी जोडण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. पूर्णत्वास आलेला प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावरही भर देण्यात आला. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत पाणीपुरवठ्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाणार असून त्यासंदर्भातील बहुतांश कामे पूर्ण झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

प्रकल्पाचे प्रभावी संचालन, आरएफटी/ईओआय प्रक्रिया व भविष्यातील कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी अनुभवी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. समिती दि. १५ जून २०२६ पर्यंत सविस्तर अहवाल सादर करणार असून त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, नोडल अधिकारी डॉ. सचिन बोंद्रे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे उपविभागीय अभियंता संजय लेवरकर, सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे, मत्स्य व्यवसाय विभागाचे अधिकारी तसेच इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### नांदगावात कृत्रिम पाणीटंचाई तीव्र

आंदोलन केले. पाणी पुरवठा सुरळीत झाला नाही तर नगर अध्यक्षांच्या घरासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या शहर कमिटीच्या वतीने देण्यात आला. मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले.

शहरात सध्या नगरपंचायतीकडून आठ ते दहा दिवसातून एकदाच पाणीपुरवठा केला जात असल्याचा गंभीर आरोप माकप व नागरिकांनी केला आहे. हंडाभर पाण्यासाठी अबालवृद्धांसह सर्वसामान्य नागरिकांना आपली दैनंदिन कामे आणि मजुरी सोडून भटकंती करावी लागत आहे. या समस्येकडे नगरपंचायत प्रशासनाचा पाणीपुरवठा विभाग जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहे. या कृत्रिम पाणीटंचाईमुळे पाणी विक्रेतांना सुगीचे दिवस आले. नागरिकांना तब्बल, १५० रुपयांना ५०० लीटर पाणी विकत घ्यावे लागत असल्याने जनतेत तीव्र संताप व्यक्त होत आहे. चांदी प्रकल्पावरून नांदगाव खंडेश्वर शहराला पाणीपुरवठा होतो. त्या ठिकाणी मुबलक पाणी असुन आणि विजेची समस्या नसतानाही शहरवासीयांना हक्काच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. सत्ताधाऱ्यांच्या नियोजन शून्य कारभारामुळे पाण्याची समस्या तीव्र झाली आहे असा आरोप माकपने निवेदनातुन केला आहे. दगडावर जलाभिषेक आंदोलन करीत नांदगावातील कृत्रिम पाणी टंचाई कडे सत्ताधारी प्रशासना सह पाणीपुरवठा विभागाचे लक्ष वेधले आहे. त्याचबरोबर शहरात काही ठिकाणी टँकरद्वारे पाणी पुरविल्या जात असल्याने पाणीटंचाई तीव्र झाल्याचे दिसत आहे. दगड जलाभिषेक आंदोलनाचे नेतृत्व माकप तालुका सचिव कॉ. श्याम शिंदे, शहर सचिव मोहसीन शेख, यांनी केले. यावेळी राजेंद्र राऊत, किशोर शिंदे, शैलेश कठाणे, ज्ञानेश्वर मारोडकर, मारुती बंड, वैदखा पठाण, नाझीम भाई, नरेश वाट्टी, माधुरी वट्टी, सविता खांनदे, अश्फाक मिया, शेख नाझीम, वूनुसभाई राजगुरू शिंदे यांच्या सह महिला व नागरिक उपस्थित होते.

### कत्तलीसाठी आणलेली १९ जनावरे

यांच्या मार्गदर्शनाखाली अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूरज बोंडे, सपोनि विनोद धाडसे, सपोनि अनिल चांदोरे, पोउपनि भारत चिरडे व त्यांच्या टीमने ही कामगिरी केली.

**पोलीस प्रशासनाचा कडक इशारा-** बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता व सलोखा राखण्यासाठी पोलीस दल कटिबद्ध आहे. पोलीस निरीक्षक सूरज बोंडे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, 'कोणीही अवैध जनावरांची वाहतूक, साठवणूक किंवा कत्तल करण्याचा प्रयत्न करू नये. असे कृत्य करणाऱ्यांवर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

### सोयाबीनचा भाव ७२०० पार

हंगामात व्यापाऱ्यांनी हमीभावापेक्षा कमी दराने शेतकऱ्याकडून सोयाबीन खरेदी केले. नाफेडणे सुद्धा हमीभाव ५३२८ रुपयांनी उशिराने खरेदी सुरू केली परंतु नाफेडच्या सोयाबीन खरेदी मधील जाचक अटीमुळे अनेक शेतकऱ्यांनी पाठ फिरवून खुल्या बाजारात सोयाबीन विक्रीला पसंती दिली. परिणामी शेतकऱ्यांना बाजारात ४००० हजार रुपये प्रतिक्विंटल दराने सोयाबीन विकावे लागले. हल्ली बाजारात सोयाबीनची आवक मोठ्या प्रमाणात घटली असून भावात वाढ झाली. बाजारात ७२०० पार सोयाबीनचे भाव पोहोचले असून चांगल्या प्रतीच्या सोयाबीनला ७५०० पर्यंत भाव मिळत आहे. शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारात येतो तेव्हा भावात घसरण होऊन कवडीमोल भावाने खरेदी केल्या जातो आणि साठेबाज व्यापाऱ्यांला बाजारात मोठ्या प्रमाणात दरवाढ मिळत असून हंगामातील ७५०० प्रतिक्विंटल सोयाबीनचा दर उच्चांकित ठरला असला तरी त्याचा फायदा घरात सोयाबीन शिल्लक नसल्याने शेतकऱ्याला मिळालाच नाही.

### पाचही झोनला जणगणना संचालनालाय

या भेटीदरम्यान जनगणना कक्ष व विविध गटांना प्रत्यक्ष भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. त्यांनी प्रगणक व पर्यवेक्षक यांच्याशी थेट संवाद साधून माहिती संकलन प्रक्रियेची सद्यस्थिती, कामातील प्रगती, तसेच येणाऱ्या अडचणी याबाबत सविस्तर चर्चा केली. कामाची गती, अचूकता आणि वेळेत पूर्ण होणारे उद्दिष्ट याबाबतही त्यांनी माहिती घेतली. प्रगणकांकडून जमा होणारी माहिती ही पर्यवेक्षकांनी अत्यंत काटेकोरपणे तपासून, शहानिशा करूनच पुढील प्रक्रियेसाठी पाठवावी, असे स्पष्ट निर्देश दिले. माहितीची गुणवत्ता आणि अचूकता राखणे अत्यंत आवश्यक असून कोणतीही त्रुटी राहू नये, यावर त्यांनी विशेष भर दिला. तसेच जनगणना कामामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून काम अधिक प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडावे, अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. क्षेत्रीय स्तरावर काम करताना समन्वय राखणे आणि वेळेचे काटेकोर पालन करणे यावरही त्यांनी मार्गदर्शन केले. या भेटी दरम्यान सहा.आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहा. जनगणना अधिकारी अक्षय निलंगे उपस्थित होते.

### मोदी सरकारकडून जनतेचा

दरात तब्बल ८ रुपयांची भयंकर वाढ केली आहे. ही वाढ ही सर्वसामान्य जनतेची सरळसरळ आर्थिक लूट असून, महागाईच्या आगीत जनतेला जिवंत जाळण्याची मोदी सरकारची कुटील नीती आहे, असा आरोप काँग्रेसच्यावतीने करण्यात आला.

मागील आठवड्यात इंधनाच्या किंमतींमध्ये झालेल्या प्रचंड वाढीमुळे राज्यभर महागाईचा भडका उडाला आहे. शहरांमध्ये तर ग्रामीण भागातही पेट्रोल आणि डिझेलची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे.पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागल्या आहेत.शहरातील नागरिकांना रोजच्या कामधंद्यासाठी इंधन मिळत नसल्याने अत्यंत कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे.हे मोदी सरकार शेतकरी, मजूर आणि मध्यमवर्गीयांच्या हालअपेष्टांकडे डोळेझाक करत आहे. केवळ उद्योगपती आणि कॉर्पोरेट मित्रांचे हित सांभाळण्यासाठी जनतेच्या खिशातून लूट चालवली जात आहे.ही अन्यायकारक, जनविरोधी आणि असंवेदनशील धोरणे आहेत.

काँग्रेस पक्ष स्पष्ट इशारा देत आहे की,राज्यातील इंधन टंचाई तात्काळ दूर न झाल्यास आणि पेट्रोल-डिझेलच्या दरात कपात न केल्यास काँग्रेस पक्ष राज्यभर अधिक तीव्र,आक्रमक आणि सातत्यपूर्ण आंदोलन छेडेल. 'मोदी सरकार मुर्दाबाद! जनता लुटणारे मुर्दाबाद' - ''पेट्रोल-डिझेल महागाई, मोदी सरकार हटाओ! '' 'मोदी जनता की लूट बंद करो, जनता की आवाज सुनो!' 'लूट का बाजार बंद करो, मोदी सरकार हटाओ!' 'किती लुटणार मोदी? आता बस्स करो मोदी!' या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.याप्रसंगी प्रामुख्याने काँग्रेस शहराध्यक्ष बबलु शेखावत,मनपा विरोधीपक्ष नेते विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे,नगरसेवक विक्की वानखडे,युवक काँग्रेसचे निलेश गुहे,नितीन काळे,अनिकेत ढेंगळे,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे,प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार,विनोद मोदी,राजेंद्र वर्मा,संजय चौधरकर,सलीम मिरावाले,अरुणकुमार जैस्वाल,अशोक डोंगरे,अभिनंदन पेंढारी,गजानन जाधव,गजानन राजगुरे,विठ्ठल मरापे,संजय बोबडे,अमोल उगे,अरुण बनारसे,संदेश सिंघई,शिल्पा राऊत,कांचन खोडके,शिरीन खान,जयश्री मरापे,किरण चांदवडकर,डॉ.अर्चना आत्राम,प्रथमेश गावंडे,अनिकेत क्षीरसागर,चेतन खोपे,कार्तिक कडुकर,मयुर तायडे,सतीश गवई, प्रीतम ठाकूर,प्रकाश नगराळे,शेखर सुरमवार,अशफाक खान,रफीक भाई चिकुवाले,राजा हाडोळे,अनिकेत ढेंगळे,सुरेश रतावा, राजीव भेले,प्रशांत महल्ले,प्रदीप अरबट,ज्ञानेश्वर झोंबाडे,दिनेश खोडके,विजय वानखडे,नाना बारबुद्धे,गजानन रडके,मोहन पुरोहित,श्रीधर पुरोहित यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शहराच्या विकासात्मक ॲक्शन

बोलताना नगराध्यक्ष उईके यांनी सध्या जिल्ह्यात आचारसंहिता लागू असल्यामुळे करण्यात आलेल्या किंवा प्रस्तावित कामांची सविस्तर माहिती देणे आचारसंहितेच्या चौकटीत अडचणीचे ठरू शकते, असे सांगितले. त्यामुळे विकास आराखड्याच्या तपशीलवार घोषणांपेक्षा शहरातील विविध प्रश्न, नागरिकांच्या समस्या आणि विकासासाठी कोणत्या बाबींना प्राधान्य देता येईल याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेवर ही चर्चा झाली. शहरातील काही भागांमध्ये अद्याप अतिक्रमण कायम असल्याबाबत पत्रकारांनी प्रश्न उपस्थित केला असता, उर्वरित ठिकाणीही पुढील काळात नगरपरिषदेच्या माध्यमातून कारवाई केली जाईल, अशी माहिती नगराध्यक्षांनी दिली.मान्सूनपूर्व तयारी संदर्भात बोलताना नाला,नालेसफाई आणि गटारसफाईची कामे पावसापूर्वी पूर्ण केली जातील, असे सांगण्यात आले. तसेच शहरातील ड्रेनेज पाईप लाईनसाठी फोडण्यात आलेले रस्ते मुरूम, गिट्टी आणि खडी टाकून समांतर करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. महिलांच्या सुविधांबाबत बोलताना शहरात महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उभारणी वर काम सुरू असल्याचे सांगण्यात आले. शहरातील महिला सुरक्षे सोबतच मूलभूत सुविधांवर ही भर दिला जाणार असल्याचे नगराध्यक्षांनी स्पष्ट केले.१०० दिवसांच्या विविध कामांबाबत विचारले असता, अवघ्या तीन ते चार महिन्यांत अनेक कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरू असून शहराच्या विकासात्मक आणि धोरणात्मक कामांना प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. 'स्वच्छ शहर, सुंदर शहर' हा नगरपरिषदेचा मुख्य उद्देश राहणार असल्याचाही पुनरुच्चार करण्यात आला. यवतमाळ शहरातील दैनंदिन स्वच्छता अधिक प्रभावी करण्यासाठी नवीन अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास तांत्रिक आणि प्रशासकीय मंजुरी मिळाल्याची माहिती देण्यात आली. तसेच यवतमाळ अग्निशमन व आणीबाणी सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आर्णी रोडवरील विद्यमान इमारत पाडून अत्याधुनिक अग्निशमन सेवा केंद्र उभारले जाणार असल्याचे सांगण्यात आले. नगरपरिषद प्रशासकीय इमारतीत महिला व पुरुष नागरिकांसाठी सार्वजनिक प्रसाधनगृह उभारण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तसेच पंतप्रधान आवास योजना शहरी २.० अंतर्गत ४२१ घरकुलांना मंजुरी मिळाली असून त्यापैकी ४१९ लाभार्थ्यांना बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. एक कोटी ४१ लाखांचा निधी लाभार्थ्यांना वितरित करण्यात आल्याची माहिती पत्रकाद्वारे देण्यात आली. नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांनी पत्रकारांकडूनच जाणून घेतलेल्या शहराच्या समस्या विकासकामांवर पुढील काळात भर देणार असल्याचा दावा करण्यात आला.

या पत्रकार परिषदेला उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, नितीन गिरी, नीता केळापूर, प्रियांका भवरे, लता ठेभरे, साधना काळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. मात्र शहरातील नागरिकांमध्ये आता एक चर्चा रंगू लागली आहे.१०० दिवसांचा आराखडा प्रत्यक्ष कृतीत दिसणार की तो केवळ घोषणांपुरताच मर्यादित राहणार? आता याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २७ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## अतिरिक्त सीईओ किरण कोवे यांनी दिले ३० दिवसात १०० गावे मॉडेल करण्याचे लक्ष्य

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्ह्यातील जास्तीत जास्त गावे ओडीएफ प्लस मॉडेल करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी दिले. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे यांनी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला.



मागील सहा महिन्यापासून एकही गाव मॉडेल घोषित न झाल्यामुळे त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ओडीएफ प्लस मॉडेल साठी आवश्यक असलेली प्रलंबित कामे करण्यास टाळाटाळ करणाऱ्यांची सुनावनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात लावण्याचे निर्देश त्यांनी दिले. बैठकीदरम्यान त्यांनी सहा तालुक्यातील गटविकास अधिकाऱ्यांना दूरध्वनीवर संपर्क करून विषयाचे गांभीर्य लक्षात आणून दिले. पुढील ३० दिवसात शंभर गावे ओडीएफ प्लस मॉडेल घोषित करण्याचे उद्दिष्ट ठरवून दिले. रिसोड मधून ५ आणि मानोरा तालुक्यातील १५ गावे आणि उर्वरित सर्व तालुक्यांना प्रत्येकी २० गावे मॉडेल करण्याचे टार्गेट देण्यात आले. पुढील १ महिन्यात करावयाच्या कार्यवाहीचे सुक्ष्म नियोजन करुन दिले. बैठकीला विस्तार अधिकारी सचिन गटलेवार यांच्यासह जिल्हा कक्षातील सल्लागार आणि तालुकास्तरावरील गट समन्वयक यांची उपस्थिती होती.

यावेळी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची काटेकोर अंमलबजावनी गावस्तरावर करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन श्री. कोवे यांनी केले. तसेच शासनाच्या निर्देशानुसार 'स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायु' ही विशेष जनजागृती मोहीम राबविण्याच्या सुचना देण्यात आल्या.

### कर्मचाऱ्यांच्या समस्या मार्गी लावणारे अधिकारी मोजकेच

शासनाकडुन निधी न आल्यामुळे जिल्हा व तालुकास्तरावर कार्यरत कर्मचाऱ्यांची ६ महिन्यापासुन वेतन थकल्याची बाब कर्मचाऱ्यांनी अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे यांच्या निदर्शनास आणुन दिली. तेव्हा त्यांनी तत्परतेने राज्यस्तरावरील वरीष्ठ अधिकारी यांच्याशी दुरध्वनीवर संवाद साधुन निधी पाठविण्याची विनंती केली. पुढील आठ दिवसात निधी पाठविण्यात येणार असल्याची माहिती वरीष्ठ स्तरावरुन देण्यात आली. यावेळी कर्मचाऱ्यांनी त्यांचे आभार मानले. यावेळी काम सांगणारे अधिकारी अनेक असतात मात्र कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणुन घेऊन त्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणारे मोजकेच अधिकारी असतात अशी भावनिक प्रतिक्रिया कर्मचाऱ्यांमधुन उमटली.

## दिव्यांग व शेतकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी २९ मे रोजी रास्ता रोको आंदोलन

### शासनाचे लक्ष वेधण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आंदोलन; मनीष डांगे यांची माहिती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी तसेच दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्याकरिता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने दि. २९ मे रोजी सकाळी १०.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती मनसेचे माजी जिल्हाध्यक्ष मनीष भास्कर डांगे यांनी दिली आहे.



या आंदोलनामध्ये शेतकरी व दिव्यांगांच्या विविध मागण्यांचा समावेश करण्यात आला असून, त्यामध्ये शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, दिव्यांगांना दरमहा सहा हजार रुपये मानधन मंजूर करण्यात यावे, तसेच सक्षम वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केलेल्या दिव्यांगत्व प्रमाणपत्रधारक लाभार्थ्यांना सप्टेंबर २०२६ अखेरपर्यंत सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय तात्पुरते दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्या लाभार्थ्यांना संजय गांधी योजना व इतर शासकीय योजनांचा लाभ मुदत संपेपर्यंत सुरू ठेवावा, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेतील दारिद्र्यरेषेच्या प्रमाणपत्राची अट रद्द करावी, तसेच दिव्यांगांना रोजगारासाठी शासन निर्णयानुसार २०० चौरस फूट जागा उपलब्ध करून द्यावी, अशाही मागण्या करण्यात आल्या आहेत.

दिव्यांग बांधवांना शासकीय कार्यालयात निवेदन अथवा अर्ज सादर करताना तळमजल्यावर आसन व्यवस्था व मोफत पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच सध्या बंद असलेले दिव्यांग सहायता पोर्टल तात्काळ सुरू करून दिव्यांग नोंदणी प्रक्रिया पूर्ववत करण्यात यावी, अशीही मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. या सर्व मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी व दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून, सर्व दिव्यांग व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने रास्ता रोको आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रा. संगीता चव्हाण, गणेश इगोले, परशराम दडे, गोपाल मोटे, गुलाब मनवर, योगीराज लाडवीकर, रमेश चव्हाण, मनोज इंगळे, अनिल भगत, धनीराम बाजड व गजानन कुटे यांनी केले आहे.

## श्री संत गजानन महाराज कथेची भव्य महाप्रसादाने सांगता



■ प्रतिनिधी | वाशिम ■

अधिक मास व गुरुपुष्पामृत दिन यांच्या पावन औचित्य साधून श्री संत गजानन महाराज संगीतमय चरित्र भावकथा, पादुका दर्शन तथा कलश अध्याय पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले . हा सोहळा दिनांक १८ मे ते २४ मे २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ७.३० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत चांडक लेआउट, लाखाळा, वाशिम येथे

महाराष्ट्रातील प्रथम श्री ह.भ.प. जय महाराज सरनाईक देऊळगावकर यांच्या अमृतवाणीतून संगीतमय चरित्र भावकथा सादर करण्यात आली भाविकांना भक्ती, अध्यात्म आणि संस्कारांचा संगम अनुभवण्याची सुवर्णसंधी या निमित्ताने मिळाली

विशेष म्हणजे दिनांक २१ मे २०२६ रोजी सायंकाळी गुरुपुष्पामृत दिन निमित्त कलश अध्याय पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर सोहळ्याचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे दिनांक २४ मे २०२६ रोजी श्री संत गजानन महाराज यांच्या पवित्र पादुकांचे दर्शन भाविकांना वाशिम नगरीमध्ये झाले.

## स्व. बाबाजी उर्फ रामकृष्ण राठी यांना भावपूर्ण आदरांजली

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या वाशीम अर्बन को-ऑपरेटिव बँकेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार ॲड. स्वर्गीय रामकृष्ण जी उर्फ बाबाजी राठी यांच्या ३४ व्या पुण्यतिथी निमित्त बँकेच्या प्रांगणात आयोजित सभेमध्ये त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्वप्रथम बँकेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम चरखा तथा माजी अध्यक्ष सुरेश लोध यांच्या हस्ते बाबाजी यांच्या पुतळ्याचे पूजन व हार अर्पण करण्यात आले तदनंतर बँकेचे माजी उपाध्यक्ष तथा संचालक विष्णू सोनी, व्यवस्थापन मंडळ समिती अध्यक्ष राम देशपांडे, संचालक सर्वश्री कायढ जोहर भाई हुसेन, रमन अग्रवाल, राजेश सिसोदिया, वाशिम शाखा सभापती नितीन करवा, मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र देशमुख, कर्मचारी प्रतिनिधी



तेजराव वानखेडे सरव्यवस्थापक राजेंद्र काळे, वाशिम शाखा संचालक तरणसिंग सेठी, निलेश सोमानी, रामदास चांदवानी, जितेंद्र गोधा, वाशिम शाखा प्रबंधक राजेंद्र अग्रवाल, समाजसेवि हरीश राठी, शिवाजी शिक्षण संस्थेची उपाध्यक्ष अरुणराव सरनाईक, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर प्रकाश दाभाडे, प्राध्यापक डॉक्टर सुशांत चिमणे, प्रा. संजय इडोळे प्रा. सागर सोनी, प्रवीण सोमानी, व्हॅल्यूआर रुपेश लड्डा, बाबुभाई पटेल, गोविंदा रंगभाळ, लीलाबाई रंधवे, रंधवे काका, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे रक्त संक्रमण अधिकारी हरिदास मुंडे, ॲड. प्रकाश बगडिया, ज्येष्ठ पत्रकार विश्वनाथ राऊत, गणेश भालेराव, प्रदीप सालवणकर, लक्ष्मणराव घोडके, मारोती इंगोले, संदीप राजगुरू, मनोज दागडिया, किशोर चौगांजकर, शेख मोबीन समवेत सर्व मुख्य कार्यालय व वाशिम शाखा वसुली अधिकारी कार्यालय येथील कर्मचारी बांधवांनी बाबाजींना पुष्प अर्पण करून श्रद्धांजली दिली. नंतर सर्वांनी दोन मिनिटे मौन पाडून बाबाजींना श्रद्धांजली वाहिली. संचालन प्रास्ताविक शाखा संचालक निलेश सोमानी यांनी केले.

## पं. दीनदयाल उपाध्याय निवासी प्रशिक्षण वर्ग उत्साहात

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

भारतीय जनता पार्टीच्या संघटन पर्व अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेला 'पं. दीनदयाल उपाध्याय वाशिम जिल्हा निवासी प्रशिक्षण वर्ग' उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला. कृष्णा लॉन अँड मॅरेज हॉल, वाशिम रोड, मंगरुळनाथ येथे आयोजित दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्गात जिल्हाभरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध आघाड्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा प्रभारी आमदार रणवीरजी सावरकर, जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, आमदार श्यामभाऊ खोडे, भाजपा नेते राजू पाटील राजे, आमदार सईताई डहाके, भाजपा नेते सुरेशभाऊ लुंगे, भाजप विदर्भ संघटन संयोजक दिनेशजी सूर्यवंशी, माजी आमदार पुरुषोत्तमजी राजगुरू आदी उपस्थित होते.

## रासायनिक खतांचा संतुलित वापर जनजागृती अभियान व खरीप हंगामपूर्व वैज्ञानिक चर्चासत्र




■ प्रतिनिधी | मालेगाव ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR) व कृषि विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर राबविण्यात येत असलेल्या 'रासायनिक खतांचा संतुलित वापर जनजागृती अभियान' अंतर्गत दिनांक २६ मे रोजी मौजे दापुरी खुर्द येथे ग्रामपंचायत कार्यालयात खरीप हंगामपूर्व शेतकरी मार्गदर्शन व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.आर.एल.काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगतशील शेतकरी श्री. अंकुश खुशालराव तायडे हे उपस्थित होते. मार्गदर्शक म्हणून कृषि विज्ञान केंद्र, वाशिम येथील शास्त्रज्ञ डॉ. एस. के. देशमुख व श्री. टी. एस. देशमुख यांनी उपस्थित शेतकऱ्यांना वैज्ञानिक माहिती दिली. प्रास्ताविकात विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार) डॉ. एस. के. देशमुख यांनी मृदा परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन, हिरवळीच्या खतांचा वापर, सेंद्रिय व रासायनिक खतांचा समतोल वापर तसेच एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

## गोविंद शाळेच्या मुख्याध्यापिका अपर्णा कदम यांना 'बेस्ट प्रिन्सिपल अवॉर्ड २०२६'

■ प्रतिनिधी | कारंजा ■

थानिक गोविंद शाळेच्या मुख्याध्यापिका अपर्णा कदम यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'बेस्ट प्रिन्सिपल अवॉर्ड २०२६' या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. देशातील अग्रेसर वैज्ञानिक व शैक्षणिक संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या होमिभाभा फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित भव्य कार्यक्रमात त्यांचा गौरव करण्यात आला.



अपर्णा कदम यांनी गेल्या चौदा वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट कार्य केले आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अध्यापन पद्धती, शिस्तबद्ध वातावरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण तसेच शाळेचा उत्कृष्ट निकाल या विविध बाबींची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली गोविंद शाळेने शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली असून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता व संस्कार जोपासण्याचे मोठे कार्य केले आहे. आधुनिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करून विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगासाठी सक्षम बनविण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. या यशाबद्दल कारंजा शहरासह पंचक्रोशीतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.मिळालेल्या या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना अपर्णा कदम म्हणाल्या की, 'या यशाचे श्रेय स्व. प्रकाश दादा डहाके, संपूर्ण डहाके परिवार, शाळेचे अध्यक्ष किरण चौधरी, सर्व संचालक मंडळ, शिक्षकवृंद, पालक आणि कारंजा वासीयांना जाते. सहकार्यामुळेच हे यश मिळविता आले.'

## अन्न प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण यशस्वीरित्या संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व कृषी विभाग, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत दि. १९ ते २१ मे दरम्यान विधाता प्रशिक्षण सभागृह, वाशिम येथे 'अन्न प्रक्रिया उद्योग' या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला.

ग्रामीण भागातील शेतकरी, महिला बचत गट सदस्य, युवक व उद्योजक यांना अन्न प्रक्रिया उद्योग क्षेत्रामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, मूल्यवर्धन तंत्रज्ञान व स्वयंरोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन करणे हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता.

## धानोरा ताथोड येथे फार्मर कप स्पर्धेसाठी गटबांधणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील धानोरा ताथोड येथे पाणी फाउंडेशन अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'फार्मर कप' स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर शेतकरी गटबांधणी करण्यात आली असून नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी दशपर्णी अर्क बनवण्याच्या उपक्रमास उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली आहे.

### दशपर्णी अर्क बनवण्यास उत्साहात सुरुवात



या उपक्रमाअंतर्गत गावातील प्रगतशील शेतकरी सुभाष वडेकर यांच्या शेतात कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली दशपर्णी अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना दशपर्णी अर्काचे महत्त्व, त्यात वापरली जाणारी विविध वनस्पतींची पाने, अर्क तयार करण्याची पद्धत तसेच पिकांवरील कीड व रोग नियंत्रणासाठी त्याचा होणारा उपयोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, रासायनिक कीटकनाशकांच्या वाढत्या वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होत असून उत्पादन खर्चातही वाढ होत आहे. अशा परिस्थितीत दशपर्णी अर्क हा कमी खर्चिक, प्रभावी आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरत आहे. नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च कमी करून सुरक्षित व दर्जेदार अन्न उत्पादनाला चालना देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

फार्मर कप स्पर्धेमुळे गावातील शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय व नैसर्गिक शेतीविषयी जागरूकता निर्माण होत असून अनेक शेतकरी या स्पर्धेत उत्साहाने सहभागी होत आहेत. गटबांधणीमुळे शेतकऱ्यांमध्ये एकोपा वाढण्यास मदत होत असून शेतीतील आधुनिक व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा प्रसार होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या कार्यक्रमाला सहाय्यक कृषी अधिकारी प्रवीण ठाकरे, कृषी पर्यवेक्षक एन. डी. फुके, गटातील सर्व सदस्य, निमंत्रक श्री. कदम तसेच परिसरातील अनेक शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरोग्य सेवांच्या गुणवत्तेसाठी यंत्रणांनी प्रभावीपणे काम करावे - जिल्हाधिकारी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण आणि सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक प्रभावीपणे काम करावे. चालू वर्षाअखेर जिल्ह्यातील किमान ५० टक्के आरोग्य संस्था राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके अंतर्गत प्रमाणित करण्यात याव्यात, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध आरोग्य योजना व कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांच्यासह आरोग्य यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी जिल्हा रुग्णालय वाशिमच्या NQAS प्रमाणीकरणाला प्राधान्य देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

## जिल्ह्यात ६ लाख ८९ हजार लिटर इंधन साठा दाखल

### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध झाला असून नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच अतिरिक्त इंधन खरेदी टाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

दि. २५ मे २०२६ रोजी जिल्ह्याला विविध तेल कंपन्यांकडून एकूण ६ लाख ८९ हजार लिटर इंधन साठा प्राप्त झाला आहे. यामध्ये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसीएल) कंपनीकडून ३९ हजार लिटर पेट्रोल व २ लाख ६ हजार लिटर डिझेल, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) कंपनीकडून ४३ हजार ५०० लिटर पेट्रोल व १ लाख १० हजार ५०० लिटर डिझेल, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) कंपनीकडून ३७ हजार लिटर पेट्रोल व १ लाख ७४ हजार लिटर डिझेल, नायरा कंपनीकडून २० हजार लिटर पेट्रोल व २०




हजार लिटर डिझेल तसेच जिओ-बीपी कंपनीकडून २५ हजार लिटर डिझेल प्राप्त झाले आहे.

त्यानुसार जिल्ह्याला एकूण १ लाख ४४ हजार ५०० लिटर पेट्रोल व ५ लाख ४४ हजार ५०० लिटर डिझेल प्राप्त झाले असून एकत्रित इंधन साठा ६ लाख ८९ हजार लिटर इतका आहे.

जिल्हा प्रशासन सर्व तेल कंपन्यांच्या सातत्याने संपर्कात असून जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल व डिझेल मुबलक प्रमाणात उपलब्ध होत आहे. सर्व पेट्रोल पंपधारकांशीही प्रशासन समन्वय ठेवून आहे. पेट्रोल पंपांवर इंधनाचे सुरळीत वितरण व्हावे यासाठी पोलीस प्रशासनालाही आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी कोणत्याही प्रकारची अनावश्यक गर्दी टाळावी तसेच आवश्यकतेपुरतेच इंधन खरेदी करावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत कलम ३ व ७ नुसार विहित मर्यादेपेक्षा अधिक इंधन साठा करणे, साठेबाजी करणे अथवा नफेखोरी करणे हा गंभीर फौजदारी गुन्हा आहे. अतिरिक्त व अनधिकृत इंधन साठा करणारे नागरिक, व्यापारी तसेच पेट्रोल पंप चालक किंवा मालक यांच्यावर कठोर फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १७९ ■ बुधवार, २७ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## रामनगर पोलिसांच्या नाकावर टिच्चून धाडसी चोरी

### एकाच रात्री तीन दुकाने फोडली; सराफा दुकानातून साडेआठ लाखांचा ऐवज लंपास

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील रामनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत मंगळवारी पहाटे घडलेल्या धाडसी चोरीच्या घटनेने व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जुनी म्हाडा कॉलनी येथील एका शॉपिंग कॉम्प्लेक्समधील सलग तीन दुकाने चोरट्यांनी लक्ष्य करत शटर वाकवून चोरीचा प्रयत्न केला. यातील एका सराफा दुकानातून तब्बल ८ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात चोरटे यशस्वी ठरले. एकाच रात्री एकाच कॉम्प्लेक्समधील तीन दुकाने फोडल्याने पोलिस गस्त व सुरक्षेच्या प्रश्नावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जुनी म्हाडा कॉलनी परिसरातील शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये संजय उडवंत यांचे 'आई भवानी ज्वेलर्स', डॉ. पराग शेंडे यांचे 'गजानन हॉस्पिटल' तसेच परीक्षित शेळके यांचे इलेक्ट्रिक व्हेईकल सर्व्हिस व स्पेअर पार्ट्सचे दुकान आहे. मध्यरात्रीनंतर चोरट्यांनी कॉम्प्लेक्स गाठत प्रथम लोखंडी शटर वाकवून दुकानांमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला.



डॉ. पराग शेंडे यांनी काही दिवसांपूर्वीच क्लिनिक सुरू केल्यामुळे तेथे मौल्यवान साहित्य नसल्याने चोरट्यांच्या हाती काही लागले नाही. त्यानंतर परीक्षित शेळके यांच्या दुकानाचे शटर उचकावून चोरीचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, तेथूनही मोठा ऐवज मिळाला नसल्याने चोरट्यांनी सराफा दुकानाकडे मोर्चा वळवला.

आई भवानी ज्वेलर्समध्ये प्रवेश मिळताच चोरट्यांनी दुकानातील चांदीचे दागिने, रोख रक्कम व इतर साहित्य असा एकूण सुमारे ८ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. चोरीनंतर चोरटे पसार झाले.

मंगळवारी सकाळी दुकानदारांनी दुकाने उघडण्यासाठी आल्यानंतर शटर तुटलेले दिसताच चोरीचा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरताच व्यापाऱ्यांनी मोठी गर्दी केली.

माहिती मिळताच रामनगर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर तसेच रामनगर पोलिस ठाण्याच्या ठाणेदार पौर्णिमा राखुंडे यांनी घटनास्थळी पाहणी करून तपासाच्या सूचना दिल्या. डॉग स्कॉड आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञांनाही पाचारण करण्यात आले.

दरम्यान, पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, चोरट्यांचा माग काढण्यासाठी विशेष पथके कामाला लागली आहेत. शहरातील गजबजलेल्या आणि संवेदनशील समजल्या जाणाऱ्या भागात एवढ्या मोठ्या प्रमाणावर चोरी झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. रात्रीच्या गस्तीसह बाजारपेठेतील सुरक्षा व्यवस्थेबाबत व्यापारी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे.

## वन्य प्राण्यांच्या हालचालीच्या माहितीसाठी एक हजार गावांमध्ये एआयआधारित अलर्ट यंत्रणा - वनमंत्री गणेश नाईक

### मानव वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी २६० कोटींच्या कृती आराखड्यास मंजुरी

**-अत्याधुनिक नियंत्रण कक्ष, रेस्क्यू सेंटर, उपचार केंद्रे उभारणार**
**-रॅपिड रेस्क्यू टीम, दहा ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरही उभारणार**



**मुंबई जनमाध्यम :** राज्यात वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आता वन विभागाने तंत्रज्ञानाची कास धरली असून, वनक्षेत्रालगतच्या तब्बल एक हजार गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित अलर्ट यंत्रणा उभारण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी राज्य वन्य जीव मंडळाच्या स्थायी समितीच्या बैठकीत सुमारे २६० कोटी रुपयांच्या कृती आराखड्यास मंजुरी देत 'मानवांवरील वन्यजीवांचे हल्ले रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवा,' असे स्पष्ट निर्देश दिले.

मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत आमदार समीर मेघे, प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम. श्रीनिवास रेड्डी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील वनक्षेत्रालगतच्या गावांमध्ये बिबट्या, रानडुक्कर, माकडे, हरणे यांचा वाढता वावर आणि त्यातून होणारे हल्ले, शेतीचे नुकसान व भीतीचे वातावरण लक्षात घेऊन हा व्यापक आराखडा तयार करण्यात आला आहे.

या आराखड्यानुसार राज्यभरात पोलीस नियंत्रण कक्षाच्या धर्तीवर दहा अत्याधुनिक वन नियंत्रण कक्ष उभारले जाणार आहेत. डिजिटल प्रणालींनी सज्ज असलेल्या या नियंत्रण कक्षांमधून वन विभागाची वाहने, गस्ती पथके आणि रेस्क्यू ऑपरेशन्सचे थेट ट्रॅकिंग केले जाणार आहे. कुठेही वन्यप्राण्यांचा वावर आढळल्यास संबंधित गावांना तातडीने सूचना दिल्या जाणार आहेत.

विशेष म्हणजे, AI आधारित अलर्ट यंत्रणा ही या प्रकल्पाची सर्वात मोठी ताकद ठरणार आहे. वनक्षेत्राबाहेर एखादा वन्यप्राणी दिसताच ग्रामस्थांना तत्काळ सूचना मिळणार असून, त्यामुळे नागरिकांना सतर्क राहता येणार आहे. काही गावांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर ही यंत्रणा यशस्वी ठरल्यानंतर आता ती राज्यभर विस्तारली जात आहे.


वन्यप्राण्यांच्या बचावासाठी व उपचारांसाठी दोन रेस्क्यू सेंटर आणि दहा ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटर उभारले जाणार आहेत. तसेच २० ठिकाणी रॅपिड रेस्क्यू टीम कार्यरत करण्यात येणार असून, गावागावांत दोन हजार प्राथमिक प्रतिसाद दले स्थापन केली जाणार आहेत. या दलांमध्ये स्थानिक ग्रामस्थांचाही समावेश असेल.

शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान करणाऱ्या रानडुक्कर, माकडे व हरणांना पकडण्यासाठी दोन विशेष फिरती पथके तयार करण्यात येणार आहेत. ही पथके अत्याधुनिक साधनांनी सज्ज असतील. पकडलेल्या प्राण्यांना पुन्हा जंगलात सोडण्यात येणार आहे. याशिवाय माकडे आणि रानडुकरांची वाढती संख्या नियंत्रणात आणण्यासाठी दोन नसबंदी केंद्रे उभारण्याचाही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

'वन्यजीवांचे संरक्षण आणि नागरिकांचे प्राण वाचवणे हे दोन्ही समान महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने संघर्ष कमी करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे,' असा संदेश या निर्णयातून देण्यात आल्याची चर्चा वनवर्तुळात सुरू आहे.

## बडबडीत मध्यरात्री आग; शेतकऱ्याचे दीड लाखांचे नुकसान

**वर्धा जनमाध्यम :** बडबडी परिसरात मध्यरात्री लागलेल्या आगीत शेतकरी पंकज सोनटक्के यांच्या शेतातील गहू व शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले. या घटनेत अंदाजे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रबडी येथील शेतकरी पंकज सोनटक्के यांनी शेतात गहू व शेतीसाठी लागणारे साहित्य जमा करून ठेवले होते. मध्यरात्रीच्या सुमारास अचानक आग लागल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. आगीत गव्हासह शेतीसाठी लागणारे साहित्य पूर्णपणे जळाले. घटनेची माहिती मिळताच महसूल प्रशासनाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, याबाबत तपास सुरू आहे.

या घटनेमुळे सोनटक्के कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासनाकडून तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

## आर्वी पालिकेत विकासाच्या नावाखाली लुटीचा बाजार

### -दूरदृष्टीच्या नेत्याभोवती 'शुक्राचार्यांचा' विळखा; राष्ट्रवादीचा थेट इशारा -आरसा दाखवूच

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी नगरपालिकेत सध्या विकासाच्या नावाखाली मनमानी, कंत्राटी लूट आणि अधिकाऱ्यांची बेफिकीरी सुरू असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) कडून करण्यात आला आहे. दूरदर्शी नेतृत्वाने शहरासाठी आणलेला भरीव निधी काही हस्तक आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने गिळंकृत करण्याचा उद्योग सुरू आहे, असा घणाघात करत दिलीप पोटफोडे यांनी पालिकेतील कारभारावर जोरदार हल्लाबोल केला.

नगरपालिका निवडणुकीत आर्वीकरांनी सर्व पक्षांना संतुलित कौल देत विकासाला प्राधान्य दिले. भाजपच्या नेतृत्वाखाली सत्ता स्थापन झाली असली तरी राष्ट्रवादी काँग्रेसने कोणताही स्वार्थ न ठेवता आमदार सुमित वानखेडे यांच्या विकासदृष्टीवर विश्वास ठेवत सत्तेला पाठिंबा दिला. मात्र आता त्याच विकासाच्या नावाखाली सेवकच मालक बनले असल्याची संतप्त चर्चा शहरात सुरू झाली आहे.



पालिकेत वाढीव कर आकारणी, खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करून एका टँकरमागे १५०० रुपयांची वसुली, घनकचरा संकलनातील कथित भ्रष्टाचार, मनुष्यबळ पुरवठ्यातील गैरव्यवहार आणि आरोग्य विभागातील संशयास्पद कंत्राटे यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. पालिकेचा कारभार जनतेसाठी नव्हे तर काही मोजक्या लाभार्थ्यांसाठी सुरू आहे, असा आरोपही करण्यात आला.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, स्थानिक नगरसेवक-नगरसेविकांनाही अधिकारी जुमानत नसल्याची चर्चा आहे. कोणताही अधिकारी फिल्डवर दिसत नाही. दर्जाहीन कामांचा धिंगाणा सुरू असून लोकशाहीपेक्षा हुकूमशाही जास्त दिसते, अशी संतप्त प्रतिक्रिया समोर येत आहे. नुकत्याच झालेल्या निकृष्ट दर्जाच्या ड्रेनेज कामांकडे लक्ष वेधत राष्ट्रवादी काँग्रेसने अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणावर बोट ठेवले आहे. आमदार सुमित वानखेडे यांच्या विकासाच्या दूरदृष्टीला झारीतील शुक्राचार्यांची कु-दृष्टी लागली आहे. शहर विकासाला खीळ घालणाऱ्यांना जनता माफ करणार नाही, असा इशारा देत दिलीप पोटफोडे यांनी स्पष्ट केले की, युतीत राहूनही राष्ट्रवादी काँग्रेस आरशाची भूमिका निभावेल. जनतेच्या विरोधातील प्रत्येक निर्णयाचा पर्दाफाश केला जाईल.

आर्वीतील वाढता असंतोष आता सत्ताधाऱ्यांसाठी धोक्याची घंटा ठरत असून, पालिकेतील कारभारावरून येत्या काळात राजकीय रणकंदन पेटण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत.

## दारूबंदीचा फक्त बोर्ड... गावोगावी मात्र दारूचा महापूर

### बोरीतही संतप्त महिलांचा फलक; '२४ तास मिळते दारू' म्हणत प्रशासनाच्या निष्क्रियतेवर ताशेरे

**सेलू । जनमाध्यम :** दारूबंदीचा गाजावाजा करणाऱ्या प्रशासनाच्या दाव्यांना सेलू तालुक्यातील गावांनीच आता उघडे पाडण्यास सुरुवात केली आहे. काही महिन्यांपूर्वी वाहीतपूर येथे लागलेल्या माझ्या गावात २४ तास दारू मिळते या फलकाने जिल्हाभर खळबळ उडवली होती. आता पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बोरी (कोकाटे) गावातही असाच फलक झळकल्याने दारूबंदीच्या घोषणांची पोलखोल झाली आहे.

बोरधरण परिसर पर्यटनासाठी प्रसिद्ध असला तरी याच भागात खुलेआम गावठी मोहाची दारू विकली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. एवढेच नव्हे तर परिसरात दारूच्या भट्ट्याच सुरू असून येथून तालुकाभरच नव्हे तर दूरवर दारूचा पुरवठा होत असल्याची चर्चा आहे. जंगलव्याप्त भागाचा फायदा घेत हा काळाबाजार फोफावत असताना प्रशासन मात्र डोळ्यावर पट्टी बांधून बसल्याचा संताप ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. गावातील मॉं दुर्गा दारूबंदी महिला मंडळा'ने अनेकदा सेलू पोलिस स्टेशन आणि संबंधित विभागाकडे निवेदन देऊन दारू विक्रेत्यांविरोधात कारवाईची मागणी केली होती. महिलांनी स्वतः दारू विक्रेत्यांची घरे दाखवून दिली, तरीही धंदे बंद झाले नाहीत. उलट दारू विक्रेत्यांचे मनोबल वाढल्याचे चित्र दिसत आहे. अखेर हतबल झालेल्या महिलांनी गावात फलक लावूनच प्रशासनाच्या अपयशावर बोट ठेवले. दुधापेक्षा दारू सहज मिळते, अशी बोचरी प्रतिक्रिया गावकरी देत आहेत. गावठी दारूमुळे अनेक तरुण व्यसनाधीन झाले असून चार तरुणांचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोपही महिला मंडळाने केला आहे. घर उद्ध्वस्त होत असताना आणि संसार बरबाद होत असताना प्रशासनाला जाग येत नसल्याने महिलांचा संताप



आता रस्त्यावर उतरला आहे.

सामाजिक कार्यकर्ते गोविंदा पेटकर यांनीही महिला मंडळाला पाठिंबा देत प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तक्रारी करूनही दारूचे अड्डे बंद होत नाहीत. त्यामुळे महिलांनी फलक लावण्याचा निर्णय घेतला. ही वेळ गावकऱ्यांवर येणे, हीच प्रशासनाच्या अपयशाची कबुली आहे, असे त्यांनी म्हटले.


वाहीतपूरनंतर बोरीत लागलेला हा फलक आता सेलू तालुक्यातील दारू व्यवसायाच्या भयावह वास्तवाचे प्रतीक ठरत आहे. 'गाव तेथे दारू' अशी परिस्थिती निर्माण झाली असून दारूबंदीचा कायदा फक्त कागदावरच उरला का? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत.

## मोबाईलचा सायरन घुमला... अन् नागरिकांच्या काळजाचा ठोका चुकला

**'इमर्जन्सी अलर्ट'ने काही क्षण निर्माण केली भीती; पण संकट नव्हे, सजग भारताची ही डिजिटल रंगीत तालीम**

**वर्धा जनमाध्यम :** दुपारी नेमके ३ वाजून ५६ मिनिटांनी अचानक हजारो मोबाईल फोनमधून मोठा सायरन वाजला आणि क्षणार्धात नागरिकांची धावपळ उडाली. बाजारपेठा, सरकारी कार्यालये, बँका, तसेच घराघरांत काही क्षण भीतीचे वातावरण निर्माण झाले. अनेकांनी घाबरून एकमेकांना फोन केले, सोशल मीडियावर मेसेजचा पाऊस पडला, तर काही नागरिकांनी हे युद्ध, भूकंप किंवा अन्य मोठ्या संकटाचे संकेत तर नाहीत ना, अशीही भीती व्यक्त केली.

मात्र, काही मिनिटांतच स्पष्ट झाले की हा कोणताही आपत्तीचा इशारा नसून केंद्र सरकारकडून करण्यात आलेली एक महत्त्वाची तांत्रिक चाचणी होती. भारत सरकारच्या दूरसंचार विभागाने आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने संयुक्तपणे 'सेल ब्रॉडकास्ट अलर्ट सिस्टम'ची चाचणी घेतली होती. भविष्यात भूकंप, पूर, चक्रीवादळ, अतिवृष्टी, त्सुनामी किंवा अन्य मानवनिर्मित संकटांच्या वेळी नागरिकांना काही सेकंदांत सतर्क करता यावे, हा या यंत्रणेचा मुख्य उद्देश आहे.




मोबाईलवर आलेला हा संदेश सामान्य एसएमएस नव्हता. त्यामुळे तो इनबॉक्समध्ये सेव्ह झाला नाही आणि काही वेळानंतर आपोआप गायब झाला. यामुळे अनेक नागरिक अधिकच गोंधळले. काहींनी मोबाईल हॅक झाल्याची शंका व्यक्त केली, तर काहींनी नेटवर्क कंपनीवर संतापही व्यक्त केला. परंतु प्रशासनाने नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे.

या घटनेने एक गोष्ट अधोरेखित झाली तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी सरकार आता अधिक सज्ज होत आहे. मात्र, नागरिकांनीही अशा अलर्टकडे अफवा किंवा भीतीच्या नजरेने न पाहता सजगतेच्या दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. संकटाच्या वेळी काही सेकंदांचा इशारा हजारो जीव वाचवू शकतो, हे वास्तव नाकारता येणार नाही. मोबाईलमधून घुमलेला तो सायरन हा फक्त आवाज नव्हता तर भविष्यातील संकटांशी दोन हात करण्यासाठी देश डिजिटल पातळीवर सज्ज होत असल्याचा इशारा होता. भीती नव्हे, तर जागरूकता आणि संयम हाच अशा प्रसंगी नागरिकांचा खरा आधार ठरणार आहे.

## पाण्याच्या टाकीत बुडून दोन वर्षीय चिमुकलीचा मृत्यू

**कोलगाव शेतशिवारातील घटना; मजूर कुटुंबावर दुःखाचा डोंग**

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील कोलगाव शेतशिवारात घडलेल्या दुर्दैवी घटनेत पाण्याच्या टाकीत बुडून दोन वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला. या घटनेमुळे शेतमजूर वस्तीत हळहळ व्यक्त होत असून, परिसरात शोककळा पसरली आहे. कु. पल्लवी निलेश कुमार (वय २) असे मृत बालिकेचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोलगाव येथील निळकंठ वरटकर यांच्या पोल्ट्री फार्मवर मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यातील जमुनिया केसरी येथील काही मजूर कुटुंबांसह वास्तव्यास आहेत. शेती व पोल्ट्री फार्मवरील कामासाठी ही कुटुंबे येथे राहतात. सोमवारी दुपारच्या सुमारास शेतातील घरासमोरील अंगणात काही लहान मुले खेळत होती. त्याचवेळी चिमुकली पल्लवी खेळता खेळता जनावरांसाठी ठेवण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीजवळ गेली. दरम्यान, कोणाच्याही लक्षात न येता ती टाक्यात पडली. काही वेळानंतर पल्लवी दिसत नसल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध सुरू केला. कामावर असलेल्या मजुरांनी परिसरात शोध घेतला असता ती पाण्याच्या टाकीत बुडालेल्या अवस्थेत आढळून आली. तातडीने तिला बाहेर काढण्यात आले. मात्र, तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. घटनेनंतर मजूर वस्तीत एकच आक्रोश उसळला. मुलीच्या मृत्यूने आई-वडिलांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, उपस्थितांनाही अश्रू अनावर झाले.

## दिल्लीपासून मंत्रालयापर्यंत निवेदनांचा पाऊस; पण आष्टीतील रेतीमाफियांवर कारवाई कधी ?

**तहसीलदारांना अभय की जनतेला न्याय? इस्माईल पठाण यांच्या लढ्याने प्रशासन हादरले**

**आष्टी शहीद जनमाध्यम:** तालुक्यातील अवैध वाळू उपसा, घरकुलधारकांना वाळू नाकारणे आणि शासन आदेशांची पायमल्ली या गंभीर प्रकाराविरोधात आता एका सामान्य नागरिकाने थेट दिल्ली दरबारापर्यंत आवाज पोहोचवला आहे. तळेगाव (शा.पंत) येथील जागरूक नागरिक इस्माईल पठाण यांनी राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री, महसूल मंत्री, विविध मंत्री, खासदार, आमदार तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन पाठवून आष्टी तालुक्यातील रेतीघाट घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

टेकोडा, इस्माईलपूर, गोदावरी, अंतोरा, चिंचोली, दलपतपूर आणि वाघोली येथील लिलाव झालेल्या रेतीघाटांमधून शासन नियमांना केराची टोपली दाखवत मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन सुरू असल्याचा आरोप या निवेदनातून करण्यात आला आहे. विशेष म्हणजे शासनाच्या आदेशानुसार घरकुल लाभार्थ्यांसाठी राखीव असलेली १० टक्के वाळूही प्रत्यक्ष लाभार्थ्यांना मिळत नसल्याने गरीब नागरिक संतप्त झाले आहेत. इस्माईल पठाण यांनी प्रशासनावर थेट बोट ठेवत महसूल विभाग जाणीवपूर्वक डोळेझाक करीत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. नागरिकांनी तहसील कार्यालयात जाऊन तक्रारी मांडल्या असता त्यांनाच उलट सुनावले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे आता प्रश्न फक्त अवैध वाळू उपशाचा राहिलेला नाही, तर प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही संशय निर्माण झाला आहे. दरम्यान, एवढ्या उच्चस्तरीय नेत्यांना आणि अधिकाऱ्यांना निवेदन पाठवल्यानंतर खरोखर कारवाई होणार का, की पुन्हा एखाद्या फाईलखाली प्रकरण दडपून तहसीलदारांना वाचवले जाणार, याकडे संपूर्ण आष्टी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## उर्ध्व वर्धा जलाशयाच्या सभोवतालची गाळपेर जमिन भाडेपट्टीवर देण्यासाठी अर्ज आमंत्रित

**वर्धा जनमाध्यम :** उर्ध्व वर्धा जलाशयाच्या बुडीत क्षेत्राच्या काठाभोवतीची अमरावती व वर्धा जिल्ह्यातील गाळपेर जमिन रब्बी हंगाम व उन्हाळी हंगामासाठी भाडेपट्टीवर देण्यात येणार आहे. यासाठी ३१ जुलै पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.ज्या व्यक्तीच्या जमीनी नविन जलाशय, उत्प्लव बांध, धरण इत्यादी बांधण्यासाठी संपादीत केलेली आहे किंवा कोणत्याही शासकीय प्रकल्पामुळे अथवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रकल्पामुळे ज्यांना बाधा पोहोचलेली आहे अशा व्यक्ती, स्थानिक भुमिहीन, मागासवर्गीयांच्या सहकारी संस्था, मागासवर्गीय आणि मागास वर्गीयेत्तर स्थानिक भूमिहीन व्यक्तीच्या सहकारी संस्था, स्थानिक भुमिहीन व्यक्तीच्या सहकारी संस्था, स्थानिक भुमिहिन मागास वर्गीय नागरिक, इतर वर्गातील स्थानिक भुमिहीन नागरिक, जेथे गाळपेर जमिनी आहेत त्या गावाच्या बाहेरील भूमिहीन नागरिक गाळपेर जमिन भाडेपट्टीवर घेण्यासाठी अर्ज करु शकतात. गाळेपेर जमिनीची मौजे व शेत सर्व्हे व मुळ मालक निहाय यादी व १०० रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर करावयाचा करारनामा व अर्जाचे प्रारुप उपविभागीय अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे उपविभाग क्रमांक १ मोर्शी येथे उपलब्ध आहे. इच्छुकांनी प्रारुप अर्ज व करारनामा, सहाय्यक अभियंता श्रेणी-१ उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग क्र.१ मोर्शी येथे ३१ जुलै पर्यंत सादर करावा.

## सिकलसेल रुग्णांसाठी हायड्रोक्सी युरिया, औषध संजीवनी, डोस अर्धवट सोडू नये

**जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे आवाहन**

**वर्धा जनमाध्यम :** सिकलसेल, ॲनेमिया हा एक अनुवांशिक रक्ताचा आजार असून, या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांचे जीवन सुसह्य, सुरक्षित आणि वेदनामुक्त करण्यासाठी, हायड्रोक्सी युरिया हे औषध अत्यंत प्रभावी आहे. जिल्ह्यातील सर्व सिकलसेलग्रस्त रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने या औषधाचा नियमित वापर करावा आणि ते कोणत्याही परिस्थितीत स्वतःहून बंद करू नये, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले यांनी केले आहे.

हे औषध अन्न व औषध प्रशासनाद्वारे मान्यताप्राप्त असून सन १९९८ पासून सिकलसेलच्या उपचारांमध्ये सुरक्षितपणे वापरले जात आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा सामान्य रुग्णालयात हे औषध मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे. या औषधामुळे रुग्णांच्या असह्य वेदनांचे हल्ले ५० टक्के पेक्षा कमी होतात. सिकलसेलच्या रुग्णांना होणारा पेन क्रायसिस हा अत्यंत त्रासदायक असतो. या औषधामुळे रक्तातील अडथळे कमी होऊन वेदनांचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक घटते. पर्यायाने रुग्णांना वारंवार रुग्णालयात दाखल होण्याची गरज पडत नाही.मानवी शरीरात 'बाळाचे हिमोग्लोबिन' (HbF ) असते.

हायड्रोक्सी युरिया शरीरातील ऍ ची पातळी वाढवतो. यामुळे लाल रक्तपेशींचा आकार विळ्यासारखा (सिकल) होत नाही व त्या रक्तवाहिन्यांमध्ये अडकत नाहीत. या औषधाच्या नियमित सेवनामुळे रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी स्थिर राहण्यास मदत होते. परिणामी, रुग्णाला वारंवार बाहेरून रक्त देण्याची गरज पडत नाही, ज्यामुळे शरीरात आयर्न ओव्हरलोड, (लोहाचे अतिप्रमाण) होण्याचा धोका टळतो. फुफ्फुसाचा हा आजार सिकलसेल रुग्णांसाठी अत्यंत घातक मानला जातो. मात्र, हायड्रोक्सी युरियामुळे फुफ्फुसात होणारा हा त्रास तब्बल ५० टक्क्यांपर्यंत कमी होतो.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## वेचक

### दिल्लीत एआय-आधारित मालमत्ता नोंदणी

**नवी दिल्ली :** दिल्ली सरकार मालमत्ता नोंदणी प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल आणि एआय-आधारित करण्याच्या तयारीत आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सांगितले की, नवीन प्रणालीमुळे मालकी हक्कांची ऑनलाइन पडताळणी होणार असून वादग्रस्त मालमत्तांना एआयद्वारे रेड फ्लॅग दाखवला जाईल. त्यामुळे फसवणूक, भ्रष्टाचार आणि वादग्रस्त मालमत्तांची खरेदी-विक्री रोखण्यास मदत होणार आहे. नवीन व्यवस्थेनुसार अर्जापासून नोंदणीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया कागदविरहित असेल. अर्जदारांना फक्त बायोमेट्रिक पडताळणी आणि फोटोसाठी उपनिबंधक कार्यालयात जावे लागेल. नोंदणीची कागदपत्रे थेट डिजीलॉकरमध्ये उपलब्ध करून दिली जाणार आहेत. याशिवाय उपनिबंधक कार्यालयांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून वातानुकूलित प्रतीक्षा कक्ष, डिजिटल हेल्प डेस्क, स्मार्ट टोकन प्रणाली आणि रिअल-टाइम अर्ज ट्रॅकिंगसारख्या सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

### चंदिगडमध्ये दारूचा लंगर !

**चंदिगड :** चंदिगडमधील सेक्टर ९ मार्केटमधील एका दारूच्या दुकानाबाहेर मोफत दारू वाटपाच्या प्रकरणामुळे खळबळ उडाली आहे.



व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये दुकानाचे कर्मचारी लोकांना ग्लासमध्ये बर्फाचे तुकडे मिसळून देताना दिसत आहेत. व्हिडिओ व्हायरल होताच, पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी कर्मचाऱ्यांना अटक केली. पोलिसांनी दुकान मालकाविरुद्ध एफआयआर दाखल केला. दुकान मालकाचे नाव सोनू सचदेवा असे आहे. सचदेवा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुकान मालकाने शनिवारी दुकानाबाहेर तंबू लावून उपस्थित दारू दिली होती. दारूच्या लंगरचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. लोक तो त्यांच्या अकाउंटवर शेअर करत आहेत. असे वृत्त आहे की, हा व्हिडिओ स्वतः दारू दुकान मालकानेच इन्स्टाग्रामवर पोस्ट केला होता. तो व्हायरल झाल्यानंतर त्याने इन्स्टाग्रामवरील व्हिडिओ काढून टाकला.

### पोखरणमध्ये बनावट तुपाचा साठा जप्त

**जैसलमेर :** जयपूरच्या अन्न सुरक्षा पथकाने पोखरणमध्ये बनावट तूप आणि तेलाच्या अवैध व्यापारावर कारवाई करण्यात आली. पथकाला पाहताच, काळाबाजार करणारे आपली दुकाने बंद करून पळून गेले. अन्न सुरक्षा विभागाच्या एका विशेष केंद्रीय पथकाने पोखरणच्या लोढा कॉलनीतील एका निवासी घरावर छापा टाकला. आरोपी पळून गेला, अटक केलेल्या दोन कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू आहे. पोखरण आणि आसपासच्या ग्रामीण भागात या अवैध व्यापारात इतर मोठी गोदामे सामील असल्याचा पथकाला संशय आहे. सूत्रांनुसार, पथकाला घटनास्थळी विविध ब्रँड नावाखाली तयार होणाऱ्या तुपाशी संबंधित घटक आणि इतर साहित्यही आढळले असून, त्याची तपासणी केली जात आहे. अतिरिक्त आयुक्त भगवत सिंग यांनी सांगितले की, अन्न सुरक्षा विभागाच्या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात कच्चा आणि तयार माल जप्त करण्यात आला. अहवालानुसार, १ हजार ६५ किलोग्रॅम संशयित बनावट तूप जप्त करण्यात आले. पाम तेल, सोयाबीन तेल आणि वनस्पती तुपाचे ६५० डबे जप्त करण्यात आले. लोखंडी डबे, कच्चा रासायनिक माल आणि आधुनिक टिन सीलिंग मशीनदेखील जप्त करण्यात आले. सर्व नमुने तपासणीसाठी जयपूर येथील प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.

### १०० फूट उंच विजेच्या टॉवरवर चढली मुलगी

**सिंगरौली :** मध्य प्रदेशातील सिंगरौली जिल्ह्यात सोमवारी सकाळी धक्कादायक घटना घडली. प्रेमप्रकरणातून संतप्त झालेली १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी तब्बल १०० फूट उंच वीज टॉवरवर चढल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मुलगी टॉवरवरून उंच दाबाच्या तारांच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करत ती जीव देण्याची धमकी देत होती. हा थरारक प्रकार पाहून संपूर्ण गावात एकच खळबळ उडाली. घटनास्थळी ग्रामस्थांची मोठी गर्दी जमा झाली होती. माहिती मिळताच चितरंगी पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अनेक प्रयत्नांनंतरही मुलगी खाली उतरण्यास तयार नव्हती. अखेर [illegible] तिच्या प्रियकराशी कॉन्फरन्स कॉलवर संवाद घडवून आणला. जवळपास ४० मिनिटांच्या समुपदेशनानंतर मुलीचा राग शांत झाला आणि ती सुरक्षितपणे खाली उतरली. पोलिसांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला.

### कन्यादान करणारा निघाला पहिला नवरा

**ग्वालियर :** मध्य प्रदेशातील ग्वालियर येथे एका बनावट विवाह प्रकरणाने खळबळ उडाली आहे. जबलपूरमधील ३५ वर्षीय तरुणाला



लग्नाच्या आमिषाने फसवून लाखो रुपयांची लूट करण्याचा कट उघड झाला. विशेष म्हणजे, लग्नावेळी वधूचा भाऊ असल्याचे सांगून कन्यादान करणारा व्यक्ती प्रत्यक्षात तिचाच पहिला नवरा असल्याचे समोर आले. पीडित रतनलाल याला शेजारी राहणाऱ्या सोनू तिवारीने गरीब मुलीशी लग्न लावून देण्याचे आमिष दाखवले. ७ मे रोजी ग्वाल्हेरमधील एका हॉटेलमध्ये हिंदू रितीरिवाजानुसार विवाह पार पडला. मात्र लग्नानंतर वधूच्या संशयास्पद वागण्यामुळे रतनलालने तिचा मोबाईल तपासला असता, व्हॉट्सअॅप चॅटमधून मोठा खुलासा झाला. चॅटनुसार, वधू दीक्षा हिचे २०२४ मध्येच सोनू चौहानसोबत प्रेमविवाह झाला होता. लग्नानंतर सासरचे दागिने व रोकड घेऊन फरार होण्याचा टोळीचा कट असल्याचे उघड झाले. पीडित कुटुंबाने आरोपी महिलेला थेट पोलिसांच्या ताब्यात दिले असून, पोलिसांनी मोबाईल स्क्रीनशॉट आणि लग्नाचा व्हिडिओ जप्त करून तपास सुरू केला आहे.

### १५ मे ते ५ जूनदरम्यान 'मुंबई सेंट्रल'वर मोहीम

**मुंबई :** जागतिक पर्यावरण दिन अभियानांतर्गत पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल विभागाने पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. १५ मे ते ५ जूनदरम्यान सुरू असलेल्या मोहिमेत रेल्वे स्थानके, कार्यालये, ईएमयू कारशेड, रेल्वे वसाहती आणि इतर विभागांमध्ये जनजागृती, स्वच्छता आणि पर्यावरणपूरक कृतींना प्राधान्य देण्यात आले. प.रे.चे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी दिलेल्या माहितीनुसार, #मिशनलाइफ आणि जागतिक पर्यावरण दिनाच्या संकल्पनेअंतर्गत समाज माध्यमांवर व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात आली. रेल्वे कर्मचारी आणि प्रवाशांना पर्यावरण संवर्धनाची शपथही देण्यात आली. स्थानकांवर सिंगल यूज प्लास्टिकला नकार, हवामान बदल आणि शाश्वत जीवनशैली यासंदर्भातील पोस्टर्स, बॅनर्स आणि डिजिटल स्क्रीन झळकवण्यात आले. प्रवाशांना पुन्हा वापरता येणाऱ्या पाण्याच्या बाटल्या, कापडी पिशव्या आणि पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. मुंबई सेंट्रल विभागाकडून कचरा वर्गीकरण, स्वच्छता मोहिमा आणि प्लास्टिकमुक्त उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला. रेल्वे स्थानकांवर स्वतंत्र कचरापेट्यांचा वापर करण्याबाबत प्रवाशांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच स्थानक परिसर आणि आजूबाजूच्या भागात स्वच्छता अभियान राबवून नागरिकांमध्ये सामूहिक जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### मंदिराबाहेर प्राण्यांचे अवशेष

**राजस्थान :** भीलवाडा शहरात धार्मिक स्थळाबाहेर मृत प्राण्याचे अवशेष आढळल्याने रविवारी रात्री तणावाचे वातावरण निर्माण झाले. शास्त्री नगरमधील एका धार्मिक स्थळाबाहेर मृत प्राण्याचे अवशेष सापडल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. घटनेची माहिती मिळताच विविध हिंदू संघटनेचे कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. संतप्त नागरिकांनी रस्ता रोको आंदोलन करत घोषणाबाजी केली. परिस्थिती तणावपूर्ण होताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली. पोलिसांच्या तत्परतेमुळे संभाव्य मोठा वाद टळल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर हिंदू संघटनांनी दोषींवर कठोर कारवाईची मागणी करत अशा प्रकारांना आळा न घातल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

# भारत-अमिरात-इस्रायल यांच्यातील मैत्रीमुळे सौदी-इराण-पाकिस्तानही चिंताग्रस्त

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

भारत, इस्रायल आणि संयुक्त अरब अमिरात यांच्यात वाढत असलेल्या संरक्षण आणि तंत्रज्ञान सहकार्यामुळे मध्यपूर्वेतील भू-राजकारणाला नवे वळण मिळत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, क्षेपणास्त्र निर्मिती आणि सागरी सुरक्षेसंदर्भात या तिन्ही देशांनी अलीकडच्या काळात महत्त्वाचे द्विपक्षीय करार केले आहेत. त्यामुळे सौदी अरेबिया, इराण आणि पाकिस्तानसारख्या देशांची चिंता वाढल्याची चर्चा सुरू आहे.

भारत, इस्रायल आणि यूएई यांच्यात अद्याप कोणताही औपचारिक त्रिपक्षीय करार नसला, तरी विविध रणनीतिक भागीदारी आणि सुरक्षा सहकार्यांमुळे तिन्ही देश जवळ आले आहेत.



**तिन्ही देश वेगवेगळ्या करारांद्वारे ताकद वाढवत आहेत**

अहवालानुसार, भारत, इस्रायल आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) यांच्यातील हे स्वतंत्र करार, २०२२ मध्ये अमेरिकेसोबत स्थापन झालेल्या आयटूयूटू गटाच्या पायावर आधारित आहेत. सदस्य देशांच्या विविध क्षमतांचा उपयोग करून घेणे हे या करारांचे मुख्य वैशिष्ट्य आहे. उदाहरणार्थ, इस्रायलचे तंत्रज्ञान, आयएमईसीच्या माध्यमातून यूएईची सैन्यदलाची क्षमता आणि भारताची मोठ्या प्रमाणावरील उत्पादन क्षमता या तिन्ही देशांसाठी फायदेशीर ठरू शकतात.

**पाकिस्तान, इराण आणि सौदी अरेबियाची चिंता वाढली**

भारत, इस्रायल आणि संयुक्त अरब अमिरातीसमोर मोठे धोके आहेत. भारताचे पाकिस्तानसोबत दीर्घकाळापासून वैर आहे. दोन्ही देशांमध्ये अनेक युद्धे झाली आहेत. अगदी गेल्या वर्षीच भारत आणि पाकिस्तानमध्ये सशस्त्र संघर्ष सुरु झाला होता. इस्रायलचे इराणसोबतचे वैर सर्वश्रुत आहे आणि दोन्ही देश अलीकडेच युद्धात अडकले आहेत. इस्रायलने इराणला आपल्या अस्तित्वासाठी धोका मानले आहे. दरम्यान, यूएईचे सौदी अरेबियासोबत अनेक आघाड्यांवर वाद आहेत. येमेन आणि सुदानमध्येही दोन्ही देशांमध्ये संघर्ष सुरु आहे.

# दलाई लामांच्या पुनर्जन्मावरून चीनचा भारताला इशारा

## तिबेट प्रश्नावर पुन्हा वाढला तणाव

◆ बीजिंग (वृत्तसंस्था) :



तिबेटी धर्मगुरू दलाई लामा यांच्या पुढील पुनर्जन्माच्या मुद्द्यावरून चीनने भारताला थेट इशारा दिला आहे. दलाई लामांच्या पुनर्जन्माची प्रक्रिया हा चीनचा अंतर्गत विषय असून त्यात कोणत्याही बाह्य शक्तीने हस्तक्षेप करू नये, असे चीनने स्पष्ट केले आहे. इतकेच नाही, तर तिबेटच्या स्वातंत्र्याचे समर्थन करणाऱ्या उपक्रमांना भारत व्यासपीठ उपलब्ध करून देणार नाही, अशी आशाही चीनने व्यक्त केली आहे. चीनच्या या भूमिकेमुळे भारत-चीन संबंधांमध्ये नव्याने तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

चिनी दूतावासाच्या प्रवक्त्या यू जिंग यांनी समाज माध्यमावर प्रतिक्रिया देताना, तथाकथित 'केंद्रीय तिबेटी प्रशासन' कोणत्याही सार्वभौम राष्ट्राने मान्य केलेले नसल्याचे म्हटले. तसेच दलाई लामांच्या पुनर्जन्म प्रक्रियेवर दावा करण्याचा अधिकार त्यांना नसल्याचेही चीनने स्पष्ट केले. दरम्यान, चीनने पुढील दलाई लामांची निवड कम्युनिस्ट सरकारच्या मंजुरीनेच होईल, अशी भूमिका घेतल्याने या प्रक्रियेभोवती मोठा वाद निर्माण झाला आहे.

दरम्यान, दलाई लामांनी २ जुलै रोजी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात त्यांच्या पुनर्जन्माची ओळख निश्चित करण्याचा 'एकमेव अधिकार' गदेन फोड्रंग ट्रस्टकडे असल्याचे म्हटले होते. या प्रक्रियेत इतर कोणालाही हस्तक्षेपाचा अधिकार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यानंतर चीन आक्रमक झाला असून, पुढील दलाई लामांच्या निवडीवर बीजिंगचे नियंत्रण राहावे, अशी भूमिका चीनने घेतली आहे. भारताचे केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनीही दलाई लामांच्या इच्छेनुसार आणि पारंपरिक पद्धतीनुसारच पुनर्जन्माची प्रक्रिया व्हावी, असे ३ जुलै रोजी वक्तव्य केले होते. यामुळे चीनची नाराजी अधिक वाढल्याचे मानले जात आहे.

**चीनला भीती कशाची?**

चीनला पुढील दलाई लामांची निवड स्वतःच्या नियंत्रणाखाली करायची आहे, जेणेकरून तिबेट आणि बौद्ध समुदायावर चिनी कम्युनिस्ट पक्षाचे वर्चस्व कायम राहील. चीनला भीती आहे की भारताच्या मदतीने, पुढील दलाई लामा यांची निवड चीनबाहेर (उदा. भारताच्या तवांग प्रदेशात) केली जाऊ शकते, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर तिबेटवरील बेकायदेशीर ताब्याचे चीनचे दावे कमकुवत होतील.

मात्र, सध्याचे १४ वे दलाई लामा यांनी त्यांचा पुनर्जन्म चीनच्या नियंत्रणाखालील तिबेटमध्ये नव्हे, तर स्वतंत्र देशात होऊ शकतो, असे संकेत दिले आहेत. त्यामुळे भारतातील धर्मशाळा किंवा तवांग परिसरातून पुढील दलाई लामांची निवड होण्याची शक्यता चीनसाठी चिंतेचा विषय बनली आहे.

**लामांची निवड कशी होते ?**

तिबेटी बौद्ध धर्मात दलाई लामा यांची निवड ही पूर्णपणे आध्यात्मिक आणि शतकानुशतके चालत आलेल्या पुनर्जन्मावर आधारित असते. तिबेटी बौद्धांच्या श्रद्धेनुसार, दलाई लामा मृत्यूनंतर एका नव्या बालकाच्या रूपात पुनर्जन्म घेतात. दलाई लामा मृत्यूपूर्वी अनेकदा काही संकेत किंवा लिखित सूचना देतात. अंत्यसंस्कारावेळी धुराची दिशा आणि शरीराच्या कलावरूनही पुनर्जन्माची दिशा शोधली जाते. वरिष्ठ भिक्षू तिबेटमधील पवित्र 'ल्हामो ला-त्सो' तलावावर ध्यान करतात. ध्यानातून मिळालेल्या संकेतांच्या आधारे शोधमोहीम सुरू होते. भिक्षू विविध ठिकाणी जाऊन अशा मुलांचा शोध घेतात, ज्यांचा जन्म दलाई लामांच्या निधनाच्या आसपास झाला असेल आणि ज्यांच्यात विशेष लक्षणे दिसतात. संभाव्य मुलांची ओळख पटल्यावर त्यांच्यासमोर मागील दलाई लामांच्या वस्तू ठेवल्या जातात. वस्तू अचूक ओळखल्यास त्याला दलाई लामांचा पुनर्जन्म मानले जाते.

# 'ताज' बघताच खुलला परराष्ट्रमंत्री रुबियो आणि जेनेट यांचा चेहरा

◆ जयपूर (वृत्तसंस्था) :

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो हे भारत दौऱ्यादरम्यान आहेत. सोमवारी त्यांनी त्यांच्या पत्नी जेनेट डी. रुबियो यांच्यासह आग्रा येथील ताजमहलाला भेट दिली. ताजमहल पाहिल्यानंतर दोघांनी डायना बेंचवर बसून छायाचित्रे काढली.



मार्को रुबियो यांनी माध्यमांशी संवाद साधताना "मला याआधी फक्त न्यू जर्सीतील 'ताजमहल' माहिती होता, पण हा खरा ताजमहल जगातील सात आश्चर्यांपैकी एक आहे. ज्या देशाला भेट देतो, त्या देशाच्या संस्कृतीचा आदर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे," असे ते म्हणाले.

या भेटीवरून नवा वाद निर्माण झाला आहे. हैदराबादस्थित इराणी वाणिज्य दूतावासाने समाज माध्यमावर तीव्र टिप्पणी केली आहे. दूतावासाने अधिकृत 'एक्स' अकाऊंटवर पोस्ट करत, "जर मार्को रुबियो यांना इतिहास आणि वास्तुकलेची खरी समज असती, तर त्यांनी येथे फोटो काढला नसता," अशी टीका केली.

दूतावासाने पुढे म्हटले की, ताजमहल हे मुघल सम्राटाने आपल्या इराणी पत्नीच्या प्रेमासाठी उभारलेले स्मारक आहे आणि त्याच्या वास्तुकलेत इराणी कलाकारांचे मोठे योगदान आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेकडून इराणी संस्कृतीवर टीका होत असताना ताजमहल भेटीचे राजकीय संकेत वेगळे असल्याचे सूचित करण्यात आले.

# मैथिली ठाकूर यांचा 'महंगाई डायन' गाण्याचा जुना व्हिडीओ पुन्हा व्हायरल

◆ पटना (वृत्तसंस्था) :

बिहारमध्ये वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर भाजप आमदार आणि प्रसिद्ध लोकगायिका मैथिली ठाकूर यांचा जुना व्हिडीओ सोशल मीडियावर पुन्हा व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये त्या 'महंगाई डायन खाए जात है' हे लोकप्रिय लोकगीत गाताना दिसत असून, नेटकरी त्यावरून सत्ताधारी सरकारवर टोलेबाजी करत आहेत. देशभरात पेट्रोल-डिझेलच्या दरात सलग वाढ होत असतानाच बिहारमध्ये सुधा दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे दरही वाढले आहेत.



"सखी सैयां तो खूब ही कमात हैं, महंगाई डायन खाए जात है" या ओळी सध्याच्या परिस्थितीशी तंतोतंत जुळत असल्याच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटत आहेत. दरभंगा जिल्ह्यातील अलीनगर मतदारसंघातून भाजपच्या आमदार असलेल्या मैथिली ठाकूर या त्यांच्या सुरेल आवाजामुळे देशभर परिचित आहेत. मात्र आता त्यांचाच जुना व्हिडीओ विरोधकांकडून आणि समाज माध्यमांवरील वापरकर्त्यांकडून शेअर केला जात असून, वाढत्या महागाईवरून केंद्र आणि राज्य सरकारला लक्ष्य केले जात आहे.

नेटकऱ्यांनी मजेशीर आणि उपरोधिक शैलीत प्रतिक्रिया देताना "आजच्या महागाईवर हे गाणे अधिकच फिट बसते," अशा कमेंट्स केल्या आहेत. दरम्यान, हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात ट्रेंड होत असून राजकीय वर्तुळातही चर्चेचा विषय ठरला आहे.

# ओडिशात खासदार देबाशीष सामंतरे यांचा राजीनामा

◆ भुवनेश्वर (वृत्तसंस्था) :

ओडिशातील बीजू जनता दलाला (बीजेडी) आणखी एक मोठा राजकीय धक्का बसला आहे. पक्षाचे राज्यसभा खासदार देबाशीष सामंतरे यांनी बीजेडीच्या प्राथमिक सदस्यत्वासह राज्यसभेच्या सदस्यत्वाचाही राजीनामा दिला आहे. पक्षात आपले कोणतेही राजकीय भविष्य उरले नसल्याचा आरोप त्यांनी केला असून भाजपमध्ये प्रवेशाचे संकेतही दिले आहेत.

सामंतरे यांनी पक्षाध्यक्ष नवीन पटनायक यांना पाठवलेल्या पत्रात बीजेडीवर माजी आयएएस अधिकारी व्ही.के. पांडियन यांचा पूर्णपणे प्रभाव असल्याचा आरोप केला. पक्षातील तक्रारींवर कोणतीही दखल घेतली जात नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे.



"आज सकाळी मी नवीन पटनायक यांना बीजेडीच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा पाठवला. त्यानंतर राज्यसभा सभापतींकडेही माझा खासदारकीचा राजीनामा सुपूर्द केला," असे सामंतरे यांनी सांगितले.

पक्षाचा पराभव आणि संघटना कमकुवत होण्यामागे व्ही.के. पांडियन हेच प्रमुख कारण असल्याचा दावा करत त्यांनी पटनायक यांच्यावर पांडियन यांना संरक्षण देत असल्याचा आरोप केला. "बीजेडी अजूनही पांडियन यांच्या नेतृत्वाखाली चालत आहे. खासदारांनाही नवीन पटनायक यांची भेट सहज मिळत नाही," असे ते म्हणाले. भाजपमध्ये प्रवेशाबाबत विचारले असता सामंतरे यांनी थेट उत्तर देणे टाळले. "राजकारणात पर्याय ठेवावे लागतात, योग्य वेळी सर्वांना कळेल," असे सूचक वक्तव्य केले. यापूर्वी ममता मोहंता, सुजीत कुमार आणि अमर पटनायक यांनीही बीजेडी सोडत भाजपमध्ये प्रवेश केला होता.

# इबोला दक्षतेसाठी आरोग्यमंत्र्यांकडून आढावा बैठक

**नवी दिल्ली :** जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) इबोलाला 'आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य आणीबाणी' घोषित केल्यानंतर केंद्र सरकार सतर्क झाले आहे. देशात इबोलाचा एकही रुग्ण आढळलेला नसला तरी संभाव्य धोका लक्षात घेऊन केंद्रीय आरोग्यमंत्री जेपी नड्डा यांनी सोमवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. सरकारने विमानतळ, बंदरे आणि सीमावर्ती प्रवेशबिंदूंवर तपासणी अधिक कडक करण्याचे निर्देश दिले आहेत. परदेशातून येणाऱ्या प्रवाशांची स्क्रीनिंग काटेकोरपणे करण्यास सांगण्यात आले असून, कोणतीही हलगर्जी सहन केली जाणार नसल्याचे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. भविष्यात संशयित रुग्ण आढळल्यास तातडीने तपासणी, ट्रॅकिंग आणि देखरेख सुरू करण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

# वांद्रे टर्मिनस-जबलपूर साप्ताहिक विशेष ट्रेन आता सुपरफास्ट एक्सप्रेस

**३० मेपासून नवी सेवा सुरू**

**मुंबई (प्रतिनिधी) :** प.रे.कडून वांद्रे टर्मिनस-जबलपूर साप्ताहिक विशेष ट्रेन आता सुपरफास्ट एक्सप्रेस म्हणून सुरू करण्यात आली आहे. यापूर्वी ०२१३३/०२१३४ या क्रमांकाने धावणारी ही विशेष ट्रेन आता २०१६३/२०१६४ या नव्या क्रमांकासह नियमित सेवेत धावणार आहे. प.रे.चे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रेन क्रमांक २०१६३ वांद्रे टर्मिनस-जबलपूर साप्ताहिक सुपरफास्ट एक्सप्रेस ३० मे २०२६ पासून सुरू होणार असून, ट्रेन क्रमांक २०१६४ जबलपूर-वांद्रे टर्मिनस सेवा २९ मे २०२६ पासून सुरू होईल. ही ट्रेन प्रत्येक शनिवारी दुपारी ४.३० वाजता वांद्रे टर्मिनसहून सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी ३.१० वाजता जबलपूरला पोहोचेल. तर परतीच्या प्रवासात प्रत्येक शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता जबलपूरहून सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी २.१५ वाजता वांद्रे टर्मिनसला पोहोचेल. दोन्ही दिशांनी ही गाडी बोरीवली, वापी, सुरत, वडोदरा, रतलाम, उज्जैन, संत हिरदाराम नगर, भोपाळ, नर्मदापुरम, इटारसी, पिपरिया आणि नरसिंहपूर स्थानकांवर थांबणार आहे. या सुपरफास्ट एक्सप्रेसमध्ये फर्स्ट एसी, एसी २-टियर, एसी ३-टियर, स्लीपर आणि जनरल डब्यांची सुविधा उपलब्ध असणार आहे. पूर्वीच्या ०२१३३/०२१३४ क्रमांकाने आरक्षण केलेल्या प्रवाशांनी नवीन ट्रेन क्रमांकांची नोंद घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# छत्तीसगडचे माजी उत्पादन शुल्क आयुक्त निरंजन दास यांना जामीन

**दारू घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप**

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

छत्तीसगड दारू घोटाळ्याचे सूत्रधार निरंजन दास यांना सोमवारी दारू घोटाळ्याशी संबंधित दोन प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने अनेक अटींच्या अधीन राहून जामीन मंजूर केला. घोटाळ्याच्या वेळी दास उत्पादन शुल्क आयुक्त होते. जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने म्हटले की, इतर सहआरोपी आधीच जामिनावर बाहेर आहेत आणि खटल्यांचा निकाल लागण्यासाठी बराच वेळ लागेल. मुख्य प्रकरण आणि संबंधित मनी लाँडरिंग प्रकरणाशी संबंधित दोन वेगवेगळ्या प्रकरणांची सुनावणी करताना, सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठाने माजी उत्पादन शुल्क आयुक्त निरंजन दास यांना दिलासा दिला.

खंडपीठाने नमूद केले की, निरंजन दास हे या प्रकरणाचे 'मुख्य सूत्रधार' असल्याचा आरोप आहे. इतर सह-आरोपींना फायदा व्हावा यासाठी राज्याचे उत्पादन शुल्क धोरण तयार करण्यात भूमिका बजावल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. जामीन मंजूर करताना, सरन्यायाधीशांनी नमूद केले की, निरंजन दास यांना दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये १८ सप्टेंबर २०२५ आणि १९ डिसेंबर २०२५ रोजी अटक करण्यात आली होती.



**कोणत्या अटींवर जामीन मंजूर?**

न्यायालयाने त्यांच्यावर इतर सह-आरोपींप्रमाणेच जामिनाच्या अटी लागू केल्या आहेत. या अटींनुसार, त्यांना राज्याबाहेर राहावे लागेल आणि केवळ खटल्याच्या सुनावणीत आणि तपासात सहभागी होण्यासाठीच ते छत्तीसगडला प्रवास करू शकतील. तथापि, खंडपीठाने असेही म्हटले आहे की, तो भविष्यात जामिनाच्या अटींमध्ये शिथिलता मागू शकतो.

# गुलमर्ग 'गोंडोला'मध्ये बिघाड; १८४ पर्यटकांची सुटका

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील गुलमर्ग येथे सोमवारी गोंडोला केबल कार सेवेत तांत्रिक बिघाड झाल्याने बेस स्टेशन आणि फेज-१ (कोंगडोरी) दरम्यानची सेवा अचानक बंद पडली. भारतीय लष्कर, एसडीआरएफ, जम्मू-काश्मीर पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने संयुक्तपणे बचावकार्य करतसंध्याकाळी ६.३० वाजेपर्यंत फेज-१ मधून ९४ पर्यटकांना, तर बेस स्टेशनच्या बाजूच्या १५ केबल कारमधून ९० जणांना सुरक्षितपणे बाहेर काढले. आतापर्यंत एकूण १८४ पर्यटकांची सुखरूप सुटका करण्यात आली असून, तांत्रिक बिघाडाचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

# कलानंदी गडाला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा

◆ कोल्हापूर (वृत्तसंस्था) :

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या ऐतिहासिक कलानंदी गड किल्ल्याला अखेर 'राज्य संरक्षित स्मारक' दर्जा मिळाला आहे. महाराष्ट्र सरकारने या किल्ल्याच्या जतन आणि संवर्धनासाठी महत्त्वाचे पाऊल उचलत २२ मे रोजी यासंदर्भातील अधिसूचना जारी केली. महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे आणि अवशेष अधिनियम १९६० अंतर्गत हा निर्णय घेण्यात आला असून, कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील कळीवडे गावाजवळ वसलेला हा किल्ला आता राज्य संरक्षणाखाली येणार आहे.



सुमारे ३०४ हेक्टर परिसरात पसरलेल्या या गडावर लवकरच संवर्धन आणि दुरुस्तीची कामे हाती घेतली जाणार आहेत.

'सभासद बखर'मध्ये कलानंदी गडाचा उल्लेख आढळतो. त्यानुसार, छत्रपती शिवाजी महाराजांनी हेरेकर सावंत, भोसले आणि तांबुळवाडीकर सावंत यांच्या वसाहतीच्या संरक्षणासाठी हा किल्ला बांधला होता. स्वराज्याच्या सुरक्षेसोबतच पोर्तुगीज आणि सावंतवाडीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी या गडाला विशेष रणनीतिक महत्त्व होते. समुद्रसपाटीपासून सुमारे ३३०० फूट उंचीवर वसलेल्या या किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे वरून पाहिल्यावर त्याचा आकार नंदीप्रमाणे दिसतो. तसेच काळ्या दगडांचा वापर करून बांधकाम झाल्यामुळे त्याला 'कलानंदी गड' हे नाव पडल्याचे सांगितले जाते.

गडावर आजही गोमुखी प्रवेशद्वार, भवानीमातेचे मंदिर, द गडात कोरलेली प्राचीन शौचव्यवस्था आणि पाण्याच्या टाक्या अशा अनेक ऐतिहासिक वास्तू पाहायला मिळतात. विशेष म्हणजे, प्रसिद्ध साहित्यिक आणि अभिनेते पु. ल. देशपांडे यांच्या पूर्वजांचा या गडाशी संबंध होता. त्यांचे पूर्वज या किल्ल्याचे किल्लेदार म्हणून कार्यरत होते, अशी ऐतिहासिक नोंद आहे.

# माऊंट एव्हरेस्टच्या 'डेथ झोन'मध्ये एकाच दिवशी २७४ जणांची चढाई

◆ नेपाळ (वृत्तसंस्था) :

माऊंट एव्हरेस्टवरील गिर्यारोहण हंगामात यंदा विक्रमी गर्दी पाहायला मिळत असून, 'डेथ झोन'मध्ये गिर्यारोहकांचा अक्षरशः कोंडी झाल्याची धक्कादायक परिस्थिती समोर आली आहे. १९ मे रोजी तब्बल २७४ गिर्यारोहकांनी एकाच दिवशी एव्हरेस्ट शिखर सर केल्याची नोंद झाली असून, ही आतापर्यंतची सर्वाधिक संख्या मानली जात आहे. समुद्रसपाटीपासून ८ हजार मीटरपेक्षा अधिक उंचीवरील 'डेथ झोन'मध्ये धोकादायक परिस्थिती निर्माण झाली.

या भागात ऑक्सिजनचे प्रमाण अत्यंत कमी असते. त्यामुळे गिर्यारोहकांना रांगेत तासनतास थांबावे लागल्याने अतिरिक्त ऑक्सिजनचा साठा संपण्याचा, शरीर गोठण्याचा आणि 'हाय अॅल्टिट्यूड सेरेब्रल इडिमा'सारख्या गंभीर आजारांचा धोका वाढला आहे.

या प्रकारावरून गिर्यारोहण तज्ज्ञांनी नेपाळ सरकारवर तीव्र टीका केली आहे. अधिक महसूल मिळवण्यासाठी नेपाळ मोठ्या प्रमाणात गिर्यारोहण परवानग्या देत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. नेपाळ सरकारनेही वाढत्या अर्जांची कबुली दिली आहे. नियंत्रणासाठी नियम कडक करण्यात आले असून गिर्यारोहण शुल्कात वाढही करण्यात आली आहे. मात्र, जगभरातील गिर्यारोहकांची एव्हरेस्ट सर करण्याची इच्छा कायम असल्याने अर्जांची संख्या वाढतच असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'सावध ऐका, पुढील हाका'

अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया आणि भारत या चार देशांनी स्थापन केलेल्या 'क्वाड' या संघटनेच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीनिमित्त अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांचा भारत दौरा झाला. त्यातून भारत-अमेरिका संबंधांतील तणाव दूर करण्याचा प्रयत्न रुबिओ यांनी केला असला तरी भारताच्या दृष्टीने 'सावध ऐका, पुढील हाका' ही स्थिती टळलेली नाही. रुबिओ हे अमेरिकेचे ७२ वे परराष्ट्र मंत्री आणि प्रभारी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आहेत. त्यांच्याकडे प्रचंड अधिकार आहेत. इस्रायल-इराण मध्यस्थीसारखे संवेदनशील विषय ते हाताळत आहेत. परदेशी परराष्ट्र मंत्री प्रथम समकक्षांशी चर्चा करतात आणि नंतर पंतप्रधानांना भेटतात. मात्र, रुबिओ यांच्या बाबतीत हा शिष्टाचार बाजूला ठेवला गेला. त्यांनी पंतप्रधान मोदींना अमेरिका भेटीचे निमंत्रण दिले. यावरून अमेरिका भारताला विशेष महत्त्व देत असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न दिसतो. भारताला महत्त्वाचा धोरणात्मक भागीदार म्हणतानाच रुबिओ यांनी सद्य:स्थिती विचारात घेत अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर ऊर्जा पुरवठा करण्याची तयारी दर्शवली. भारतात इंधन टंचाई असताना रुबिओंचा हा प्रस्ताव आश्वासक आणि दिलासादायक वाटू शकतो. पण अमेरिकन तेलाचे अर्थकारण वेगळे असून काही मुद्दे प्रश्नांकित आहेत. रशिया आणि इराण भारताला सवलतीत तेल देतात. अमेरिकाही त्या दरातच कच्चे तेल देईल का, हा कळीचा मुद्दा आहे. भारत कच्च्या तेलाच्या आयातीवर तब्बल १७४ अब्ज डॉलर्स खर्च करतो. युक्रेन संघर्षानंतर रशिया भारताला आंतरराष्ट्रीय बाजारभावापेक्षा खूपच स्वस्त दरात कच्चे तेल देत आहे. याउलट अमेरिकन तेल हे बझेंट किंवा डब्ल्यूटीआय या जागतिक मानकांनुसार बाजारातील चालू दराने विकले जाते. यात कोणतीही विशेष सवलत मिळत नाही. जागतिक स्तरावर तेल १०० डॉलर्सच्या पार असते, तेव्हा रशियन तेलामुळे भारताची अब्जावधी डॉलर्सची बचत होते. अमेरिकन तेलामुळे ती शक्य नाही. कच्च्या तेलाचे व्यवहार अमेरिकन डॉलरमध्ये होतात. भारतीय रुपया डॉलरच्या तुलनेत ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. त्यामुळे भारताला तेल आयातीसाठी आधीच जास्त पैसे मोजावे लागत आहेत. अशा स्थितीत महागडे अमेरिकन तेल खरेदी केले, तर आयात बिल कमालीचे वाढेल. पर्यायाने चालू खात्यातील तूट वाढून अर्थव्यवस्थेवर आणि देशांतर्गत महागाईवर अत्यंत विपरीत परिणाम होईल. रशियाच्या तुलनेत अमेरिकेतून भारतात तेल आणण्याचा सागरी वाहतूक खर्चही अधिक आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलावरील निर्बंध तात्पुरते शिथिल केल्यानंतर भारताने तिथून मोठ्या प्रमाणावर हेवी क्रूडची आयात सुरू केली. व्हेनेझुएला आता सौदी अरेबिया आणि अमेरिकेला मागे टाकून भारताचा तिसरा मोठा तेल पुरवठादार देश बनला आहे. व्हेनेझुएलाकडून होणारी तेल आयात सुरू राहण्यास ट्रम्प यांची हरकत नसावी. पण त्याऐवजी अमेरिकेकडून तेलाचा हट्ट धरल्यास भारतासाठी ते गैरसोयीचे ठरणार आहे. भारताचे ऊर्जा धोरण हे पश्चिम आशिया आणि रशिया संबंधांच्या भक्कम पायावर आधारलेले आहे. या देशांशी आपली मैत्री काळाच्या कसोटीवर उतरली आहे. अमेरिकेसोबतचा व्यापार कमी झाल्याने भारताच्या निर्यातीला आणि निर्यातदारांना फटका बसला. पण त्याची किंमत या मैत्री संबंधांकडे पाठ फिरवून मोजता येणार नाही. भारत-अमेरिका यांच्यातील व्यापार तूट कमी करण्यासाठी ट्रम्प यांनी याआधीही अमेरिकेकडून तेल खरेदीचा मुद्दा मांडला होता. रुबिओ तीच भूमिका पुढे नेत आहेत. रुबिओ यांनी रखडलेला द्विपक्षीय करार लवकरच मूर्त रूप घेईल, असे संकेत दिले. ते देताना भारत पुढील पाच वर्षांत ५०० अब्ज डॉलर्सची अमेरिकन उत्पादने खरेदी करेल, या ट्रम्प यांच्या विधानाचा पुनरुच्चार केला. यावरून अमेरिका व्यापार कराराबाबत स्वतःच्या मतावर ठाम दिसते. रुबिओ यांनी या कराराबाबत अमेरिका लवचिकता दाखवेल, असे कुठेही म्हटलेले नाही. अमेरिकेची सध्याची धोरणे भारतीय हिताच्या दृष्टीने अनुकूल नसल्यामुळेच कराराला विलंब होत आहे. ट्रम्प हे जागतिक पातळीवर पाकिस्तानला प्रचंड महत्त्व देतात. ही भूमिका भारतासाठी चिंतेची आहे. दहशतवाद ते द्विपक्षीय व्यापारापर्यंत, अमेरिकेच्या धोरणांमध्ये कमालीची अस्थिरता आहे. भारताला महान भागीदार म्हणताना व्यापारी, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यासाठी अमेरिकेला ठोस पावले उचलावी लागतील. हिंद-प्रशांत क्षेत्रातील स्थैर्यासाठी आणि क्वाडच्या भवितव्यासाठी अमेरिका किती गांभीर्य दाखवतो, यावरच या दौऱ्याचे यश अवलंबून असेल. ट्रम्प प्रशासनाने नुकतेच 'अमेरिका फर्स्ट' व्हिसा टूल आणि ग्रीन कार्डच्या नियमांत मोठे बदल केले. अमेरिकेत जाणाऱ्या किंवा तिथे कार्यरत आयटी क्षेत्रातील व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांना यामुळे अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या जाचक अटी शिथिल कराव्यात, अशी भारताची मागणी आहे. याबाबत सकारात्मक विचार करण्याचे संकेत रुबिओ यांनी दिले असले तरी जमिनीवरील वास्तव बदललेले नाही. 'नाटो'तून बाहेर पडणारी अमेरिका 'क्वाड'चेही विसर्जन करणार काय, अशी भीती जपान, ऑस्ट्रेलियाला होती. पण ही बैठक होत आहे. चीन दौऱ्यातून हाती काहीही न लागल्याचा हा परिणाम असू शकतो. ओबामांच्या काळात चीनचा आशिया खंडातील विस्तारवाद रोखण्यासाठी पिव्हॉट टू एशिया हा कार्यक्रम हाती घेतला होता. भारताला चीनचा काऊंटरवेट म्हणून पुढे आणण्यासाठी ही योजना होती. व्यापारी वृत्तीच्या ट्रम्प यांनी भारताला वळसा घालून थेट चीनशी नाते जुळवण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण ड्रॅगनचे फुत्कार अनुभवल्यानंतर त्यांना उपरती झाल्याचे दिसते. अमेरिकन न्यायालयाने ट्रम्प यांचे टॅरिफ धोरण मुळासकट मोडून काढले. त्याचा आधार घेऊन ट्रम्प प्रशासन भारतासोबत व्यापार करार करण्यास तयार झाले तर रुबिओ यांची ही भेट सार्थ ठरली असे म्हणता येईल. नसता पंतप्रधान मोदींना दिलेले अमेरिका भेटीचे आमंत्रणही 'लबाडाघरचे आवतण' ठरू शकते. राष्ट्रीय नेतृत्वांचा जाहीर उपमर्द करण्याचा ट्रम्प यांचा खोडसाळपणा युक्रेन, जर्मनी, इंग्लंड या देशांच्या राष्ट्राध्यक्षांबाबत काय पातळी गाठतो हे जगाने पाहिले आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी अमेरिकेची भूमिका पूर्णपणे समजून घेत पुढील पावले चाणाक्षपणाने टाकणे गरजेचे आहे.

# 'महासत्ते'च्या वाटेवर की 'अविद्ये'च्या अनर्थाकडे?

मानवी उत्क्रांतीच्या प्रवासात आदिम अवस्थेपासून ते आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगापर्यंत मानवाने जी झेप घेतली आहे, त्यामागे 'शिक्षण' हेच सर्वात प्रभावी इंधन राहिले आहे. ज्या राष्ट्रांनी आपल्या मानवी संसाधनाला दर्जेदार शिक्षणाची जोड दिली, तीच राष्ट्रे आज प्रगत म्हणून ओळखली जातात. मानवी विकास निर्देशांक सुधारण्यापासून ते अर्थव्यवस्थेला गती देण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर शिक्षणाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. जेव्हा एखादा समाज सुशिक्षित होतो, तेव्हा तो केवळ स्वत:चा विकास करत नाही, तर आपल्या कल्पकता आणि कौशल्याच्या जोरावर देशाला जागतिक पटलावर सन्मानाचे स्थान मिळवून देतो. म्हणूनच, भारताला जर खऱ्या अर्थाने भविष्यातील महासत्ता व्हायचे असेल, तर आपल्या शिक्षण व्यवस्थेतील सद्य:स्थिती आणि त्यातील आव्हाने यांचा वेध घेणे अनिवार्य ठरते.

या पार्श्वभूमीवर आपल्या देशातील शिक्षणाची स्थिती आज कशी आहे? उच्चशिक्षणाचे खासगीकरण, त्यात परकीय गुंतवणूक आदी वेगाने होत आहे. त्याहीपेक्षा, 'दशकभरात लाखभर शाळा बंद'सारख्या बातम्या अस्वस्थ करणाऱ्या ठरत आहेत. या बातमीची पूर्वपीठिका अशी की, सीकर (राजस्थान) येथील माकपचे खासदार अमरा राम यांच्या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी (२ फेब्रुवारी २०२६) लोकसभेत सांगितले : गेल्या १० वर्षांत देशभरात ९३,००० पेक्षा अधिक शाळा बंद झाल्या आहेत, यापैकी बहुतेक शाळा पहिल्या सहा वर्षांत बंद झाल्या.

आज जेव्हा सरकारी आकडेवारी ९३,००० शाळा बंद झाल्याचे सांगते, तेव्हा समाजाचा एक मोठा घटक पुन्हा एकदा 'अविद्ये'च्या अंधारात ढकलला जाण्याची भीती आहे. संसदेत सरकारनेच दिलेल्या लेखी उत्तरानुसार, २०१४-१५ ते २०१९-२० या काळात ७०,००० हून अधिक शाळा बंद झाल्या हा आतापर्यंतचा सर्वाधिक आकडा आहे. त्यानंतर २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत आणखी १८,७२७ शाळा बंद झाल्या.

### 'कल्याणकारी राज्या'चे प्राधान्यक्रम काय?

सरकारच्या मते, शाळा बंद होण्यामागे विद्यार्थ्यांची कमी पटसंख्या, ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर आणि संसाधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी केलेले 'शाळांचे विलीनीकरण' ही प्रमुख कारणे आहेत. सरकारचा दावा आहे की, जवळपासच्या शाळा एकत्र केल्यामुळे पायाभूत सुविधा आणि शिक्षकांची उपलब्धता अधिक दर्जेदार होईल. मात्र, हा युक्तिवाद वरकरणी योग्य वाटत असला तरी तो 'कल्याणकारी राज्या'च्या मूलभूत संकल्पनेला हरताळ फासणारा आहे.

'सुसूत्रीकरण' किंवा 'पटसंख्ये'च्या नावाखाली एखादी शाळा बंद होते, तेव्हा त्या परिसरातील वंचित घटक, गरीब मुले आणि विशेषत: मुलींच्या शिक्षणाची दारे कायमची बंद होतात. वाहतुकीच्या साधनांचा अभाव आणि आर्थिक ओढाताण यामुळे अशा विलीनीकरणानंतर गळतीचे प्रमाण वाढण्याची मोठी भीती शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. थोडक्यात, प्रशासकीय सोय पाहताना विद्यार्थ्यांच्या 'शिक्षण हक्का'चा बळी दिला जात आहे, असेच चित्र सध्या दिसते.

**देशातील लाखभर सरकारी शाळा गेल्या दहा वर्षांत बंद झाल्या; याच दशकभरात शिक्षणाचे खासगीकरण अतोनात वाढले. एकीकडे 'लाडक्या' योजना, मोफत शिधा... तर दुसरीकडे शिक्षण महाग करण्याचे हे धोरण आपल्या देशाला कुठे नेणार आहे?**

सोबतचा तक्ता केंद्र सरकारनेच दिलेल्या आकडेवारीचा आहे. देशभरातून डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत ९३,२५८ सरकारी शाळा गायब झाल्या; त्यापैकी सर्वाधिक उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यांतील आहेत (एकूण घटीपैकी ६० टक्क्यांपेक्षा जास्त वाटा). देशभर शाळा बंद होण्याचा हा वेग २०१४ ते २०२० या पहिल्या सहा वर्षांत सर्वाधिक (७४,५३१ शाळा) होता, तो आजही थांबलेला नाही. मात्र एकट्या उत्तर प्रदेशात १९,३०५ खासगी शाळांची वाढ झाली. देशातील खासगी शाळांच्या एकूण ४२,९४४ वाढीपैकी ४४.९ टक्के वाटा उत्तर प्रदेशचा आहे.

### खासगी शाळांची वाढ किती?

शासकीय शाळा मागील १० वर्षांत आठ टक्क्यांनी घटल्या, तर खासगी शाळा १४.९ टक्क्यांनी वाढल्या. खासगी शाळांची संख्या २०१४-१५ मधील २,८८,१६४ वरून २०२३-२४ मध्ये ३,३१,१०८ इतकी वाढली असून, एकूण ४२,९४४ शाळांची वाढ झाली आहे. यातही १० राज्यांनी खासगी शाळांच्या वाढीच्या १४.९ टक्के या देशभरच्या सरासरीपेक्षा अधिक वाढ नोंदवली आहे. बिहारमधील खासगी शाळा २०१४-१५ मध्ये ३,२८४ होत्या, त्या २०२३-२४ मध्ये ९,१६७ झाल्या म्हणजेच १७९.१४ टक्के वाढ!

युनेस्कोचा 'ग्लोबल एज्युकेशन मॉनिटरिंग' अहवाल (२०२२) हा सार्वजनिक शिक्षणाची अपुरी उपलब्धता आणि दर्जा, तसेच पालकांच्या अपेक्षा, यांमुळे भारतात खासगी शिक्षणाची वाढ झाल्याचे नोंदवतो. या अहवालानुसार, प्राथमिक शिक्षणात खासगी शाळांचा सरासरी जागतिक वाटा केवळ १९ टक्के आहे, तर भारतात तो ४५ टक्के! उच्च शिक्षणात तर, भारताचा ५७ टक्के वाटा खासगी संस्थांकडे आहे. साहजिकच, उच्च शिक्षण आवाक्याबाहेर असून केवळ 'आर्थिक सक्षमता' असलेला वर्गच उच्च पदांपर्यंत पोहोचू शकतो. माध्यमिक स्तरावर भारतात ५१ टक्के खासगीकरण आहे. नेपाळ (२४ टक्के) व पाकिस्तान (३४ टक्के) सारख्या देशांनीही माध्यमिक स्तरावर भारतापेक्षा जास्त सरकारी गुंतवणूक राखली आहे.

ज्या देशात सुमारे ८१.३५ कोटी लोकांना 'प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजने'तून मोफत शिधा दिला जातो, तिथे शिक्षणाची ही अवस्था. खरे तर, या वंचित घटकांसाठी शाळा म्हणजे केवळ चार भिंती नसून, तिथे मिळणारे 'मध्यान्ह भोजन' ही पोषणाची हमी असते. 'मोफत पाठ्यपुस्तके' हा स्वप्नांना मिळणारा आधार असतो. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. परंतु, जर गरिबांच्या शाळाच बंद होणार असतील, तर सामाजिक समता कशी प्रस्थापित होणार?

| राज्य / केंद्रशासित प्रदेश | २०१४-१५ सुरू असलेल्या शाळा | २०१९-२० सुरू असलेल्या शाळा | २०१४-२० बंद शाळा | २०२०-२१ सुरू असलेल्या शाळा | २०२४-२५ सुरू असलेल्या शाळा | २०२०-२५ बंद शाळा |
|---|---|---|---|---|---|---|
| भारत (एकूण) | ११,०७,१०१ | १०,३२,५७० | ७४,५३१ | १०,३२,०४९ | १०,१३,३२२ | १८,७२७ |
| उत्तर प्रदेश | १,६२,२२८ | १,३७,६३८ | २४,५९० | – | – | – |
| मध्य प्रदेश | १,२१,८४९ | ९९,४११ | २२,४३८ | ९९,१५२ | ९२,२५० | ६,९०२ |
| ओडिशा | ५८,६९७ | ५३,२६० | ५,४३७ | ५०,२५६ | ४८,६२५ | १,६३१ |
| पश्चिम बंगाल | ८२,७५८ | ८१,७५६ | १,००२ | ८३,३७९ | ८२,१५४ | १,२२५ |
| झारखंड | ४१,३२२ | ३५,९३१ | ५,३९१ | – | – | – |
| महाराष्ट्र | ६७,७१७ | ६५,८८६ | १,८३१ | ६५,७३४ | ६४,८८४ | ८५० |
| बिहार | ७४,२९१ | ७२,६१० | १,६८१ | – | – | – |
| राजस्थान | ७०,२१० | ६७,६६० | २,५५० | – | – | – |
| पंजाब | २०,७७२ | १९,३७७ | १,३९५ | – | – | – |
| उत्तराखंड | १७,७५३ | १६,७४१ | १,०१२ | – | – | – |
| जम्मू-काश्मीर | – | – | – | ३,१६० | १८,०८५ | ४,३८२ |
| हिमाचल प्रदेश | – | – | – | १५,३९१ | १४,७२५ | ६६६ |

देशात २०१४ पासून स्थापन झालेल्या ९७,००० नव्या शाळांपैकी तब्बल ६७,००० शाळा या खासगी आणि विनाअनुदानित आहेत. याचाच अर्थ, शिक्षणाची जबाबदारी शासन आता हळूहळू 'नफेखोरी' करणाऱ्या घटकांच्या हाती सोपवत आहे. एका सर्वेक्षणानुसार, भारतातील ७३ टक्के पालकांनी केवळ गुणवत्ता/दर्जा नसल्यामुळे सरकारी शाळांकडे पाठ फिरवून खासगी शाळांची निवड केली. यापैकी १२ टक्के पालकांना आपल्या मुलांनी इंग्रजी शिकावे असे वाटते, तर १० टक्के पालकांच्या परिसरात सरकारी शाळाच उपलब्ध नाहीत. धक्कादायक बाब म्हणजे, आज भारतात कोणतीही अधिकृत मान्यता नसलेल्या सुमारे २९,६०० शाळा असून त्यात ३८ लाख मुले शिक्षण घेत आहेत. यात ४,१३९ अप्रमाणित मदरशांचाही (पाच लाख विद्यार्थी) समावेश आहे. शिक्षणाचे हे असंघटित आणि अनियंत्रित विस्तारणे भविष्यात 'शैक्षणिक विषमता' निर्माण करणारे ठरेल.

### हा लोकशाहीचाही संकोच

गरिबांच्या मुलांसाठी खासगी शाळांत असणारा २५ टक्के राखीव जागांचा हक्काचा (राइट टु एज्युकेशन- 'आरटीई') मार्गही आता नवनवे नियम आणून संकुचित केला जात आहे. 'लाडक्या' योजनांसाठी तिजोरी रिकामी होत असताना, त्याचा फटका मात्र अशा शैक्षणिक योजनांना बसतो. खासगी स्वयं-अर्थसाहाय्यित शाळा व्यवस्थापन संघटनांचा दावा आहे की, राज्य सरकारकडे गेल्या दहा वर्षांपासून आरटीई शुल्काची सुमारे २,५०० कोटी रुपयांची प्रतिपूर्ती प्रलंबित आहे. त्यामुळे गेल्या वर्षी राज्यात आरटीई प्रवेशासाठी ८,८६३ शाळांनी नोंदणी केली, तर यंदा हा आकडा घटून ८,४९० वर आला. आरटीई प्रवेश प्रक्रिया आपणांस लागू होऊ नये म्हणून 'अल्पसंख्याक दर्जा' मिळवण्याचा मार्ग अनेक शाळा व्यवस्थापने शोधत आहेत. केवळ या सुटकेसाठी गेल्या पाच वर्षांत मुंबईतील सुमारे ४०, तर राज्यभरात सुमारे १२० शाळांनी अल्पसंख्याक दर्जा मिळवला आहे.

केवळ मूठभर लोकांकडे ज्ञानाची आणि सत्तेची मक्तेदारी असणे, हे लोकशाहीचे लक्षण नव्हे. जर प्रगतीचा महामार्ग केवळ श्रीमंतांसाठीच मोकळा राहणार असेल आणि गरिबांच्या वाटा (सरकारी शाळा) बंद होणार असतील, तर आपण कोणत्या महासत्तेच्या दिशेने निघालो आहोत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

**डॉ. मनोज महाजन**

## बंद पडणाऱ्या शासकीय शाळा

निती आयोगाच्या निरीक्षणानुसार गेल्या दशकभरात देशात सुमारे लाखभर शाळा बंद पडल्या असून त्यामध्ये ९४ हजार शासकीय व सरकारी अनुदानित शाळांचा समावेश आहे. दुसरीकडे मात्र तब्बल ५१ हजार खाजगी शाळांची वाढ झाली आहे.ही आकडेवारी शिक्षण क्षेत्रातील वाढत्या व्यापारीकरणाचे गंभीर वास्तव अधोरेखित करणारी आहे असं म्हटल्यास वावगे होणार नाही. शिक्षण हे ज्ञानदानाचे आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले जात असताना आज ते नफेखोरीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसून येते.शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे, असे आपण मान्य केले. मात्र हा हक्क प्रत्यक्षात सर्व स्तरांपर्यंत समानतेने पोहोचतोच असे नाही ही आजची परिस्थिती आहे. आर्थिक परिस्थितीमुळे एखादे मूल शिक्षणापासून वंचित राहणे ही अत्यंत चिंताजनक बाब असून समाजातील विषमता कमी करण्याऐवजी शिक्षण व्यवस्थाच व्यापारीकरणातून वाढविण्याचे काम करत असेल, तर ती धोकादायक ठरू शकते.

आज गरज आहे ती शासकीय शाळांचे जाळे मजबूत करण्याची, दर्जेदार शिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याची आणि पालकांचा विश्वास पुन्हा संपादन करण्याची. आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षित शिक्षक, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सुरक्षित वातावरण या गोष्टी शासकीय शाळांमध्ये उपलब्ध झाल्या तर अनेक पालक पुन्हा सरकारी शिक्षण व्यवस्थेकडे वळतील.शिक्षण हे केवळ बाजारपेठेतील उत्पादन नसून राष्ट्रनिर्मितीचे भक्कम साधन आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्था सर्वसामान्यांच्या आवाक्यात राहणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक बालकाला आर्थिकदृष्ट्या परवडणारे, सहज उपलब्ध आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल, तोच खरा समाजाच्या प्रगतीचा सुदिन ठरेल.

**-विश्वनाथ पंडित**

## क्राकोच जनता दल आपची पिलावळ

अलीकडच्या काळात असे दिसून येत आहे की, मूळ हेतूला हरताळ फासत अनेक याचिका केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी, राजकीय अजेंडा राबवण्यासाठी किंवा वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठी दाखल केल्या जातात. अशा निरर्थक याचिकांमुळे न्यायालयाचा अत्यंत मौल्यवान वेळ वाया जातो. सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे, या याचिकांच्या गर्दीमुळे जे नागरिक खरोखरच पीडित आहेत आणि ज्यांच्यावर मोठा अन्याय झाला आहे, अशा गरजूंच्या याचिकांवर सुनावणी होण्यास नाहक उशीर होतो.या पार्श्वभूमीवर, राजकीय वर्तुळातूनही तीव्र आणि उस्फूर्त प्रतिक्रिया उमटल्या. विशेषतः आम आदमी पक्ष (आप) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षांना ही टिप्पणी चांगलीच बोचली. विरोधकांनी या वक्तव्याचा आधार घेत 'आप'च्या सतत कोर्टात जाण्याच्या आणि त्याद्वारे राजकीय प्रसिद्धी मिळवण्याच्या प्रवृत्तीवर कडाडून टीका केली. या वादातूनच एक वेगळी घडामोडी समोर आली. दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांचे माजी खाजगी सचिव अभिजीत दीपके (जे सध्या अमेरिकेत शिक्षण घेत आहेत) यांनी न्यायमूर्तींच्या विधानाचा उपरोधात्मक आधार घेत सोशल मीडियावर 'कॉकरोच जनता पार्टी' (क्रॉचोच जनता पक्ष) नावाच्या एका आभासी पक्षाची घोषणा केली. त्यांनी तरुणांना ऑनलाईन सदस्यत्व घेण्याचे आवाहन केले आणि या मोहिमेला मोठा डिजिटल प्रतिसाद मिळाल्याचे दावेही केले गेले. हा सर्व प्रकार न्यायालयाच्या विधानावर व्यक्त केलेला एक राजकीय उपरोध ठरला.परंतु, प्रश्न केवळ तात्कालिक प्रतिक्रियेचा किंवा डिजिटल मोहिमांचा नाही. कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा चळवळीला समाजात स्थान मिळवण्यासाठी ठोस ध्येय, धोरणे आणि विचारसरणीची आवश्यकता असते. सुरुवातीला अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून जेव्हा 'आम आदमी पक्षा'चा उदय झाला, तेव्हा हा पक्ष देशाच्या राजकारणाला नवी दिशा देईल असे वाटले होते. परंतु,स्पष्ट विचारसरणीचा अभाव आणि केवळ आंदोलनापुरते मर्यादित राजकारण यांमुळे आज त्यांची स्थिती डळमळीत झाली आहे. ठोस धोरणांशिवाय केवळ प्रसिद्धीच्या जोरावर राजकारण करणे किती काळ टिकू शकते, हा या निमित्ताने उपस्थित झालेला मोठा प्रश्न आहे.

**अविनाश देशपांडे**

## मीडिया भाजपचा गुलाम?

कॉक्रोच जनता पार्टी स्थापन झाल्यानंतर त्याबद्दल घमासान चर्चा सुरू झाली. अजूनही होते आहे. डिजिटल स्पेसमध्ये सुरू झालेल्या एका उपक्रमाबाबत उत्सुक असणे, विशेषतः इतक्या मोठ्या प्रमाणात लोकांनी ती पार्टी जॉईन करणे हे फारच इंटरेस्टिंग आहे. मात्र साधारण एक आठवड्यापूर्वी सुरु झालेल्या व्हर्च्युअल उपक्रमाबाबत इतक्या तातडीने हमरीतुमरीवर येऊन बोलण्याची काही गरज आहे असे मला वाटत नाही. अर्थात सोशल मीडियाचे नेचरच 'बोलायला उद्युक्त करणारे' असल्याने बोलणे, दावे-प्रतिदावे आणि वाद सुरू होतात त्याला इलाज नाही. निरीक्षण करण्यापेक्षा निष्कर्ष काढण्याची घाई आपण माणसे करतोच. सोशल मीडियाने तो वेग वाढवला हे खरे.

पण यातला एक सीरियस मुद्दा म्हणजे भाजप आणि भाजपची एकूण डिजिटल इकोसिस्टिम यांनी आम्ही 'झुरळांचा बंदोबस्त करू' वगैरे म्हणणे सुरू केले. पार्टीची ट्विटर आणि इंस्टाग्राम अकाउंट बंद केली गेली. अभिजीत दिपके भारतात आला तर त्याला तुरूंगात टाकतील असे एका कट्टर भाजप समर्थकाने म्हटल्याचे वाचले. 'त्याने कोणता गुन्हा केला आहे? कोणत्या गुन्ह्याखाली त्याला तुरूंगात टाकतील?' असे विचारण्याचा मोह मला झाला होता; पण आवरला.




थोडक्यात एखाद्याने नवीन राजकीय उपक्रम सुरू करणे, किंवा राजकीय पक्ष काढणे हा आता गुन्हा होणार आहे का? आणखी वाईट म्हणजे असे धमकावणे,अकाउंट्स बंद करणे हे आता नॉर्मलाइज झाले आहे.यात कायदा काही करू शकणार आहे की नाही माहीत नाही.की 'अकाउंट काढायच्या आधी विचार करायला हवा होता.नवीन राजकीय पर्याय देण्याचा विचार करणे हा नव्या भारतात गुन्हा आहे' असे उद्या कुणी न्यायमूर्ती स्पष्टपणे म्हणणार आहेत? तसे म्हटले तर बरं होईल. निदान एक प्रश्न तरी सुटेल.

अनेक सीरियस गोष्टी नॉर्मलाइज झाल्याचे आपण अलीकडील काळात पाहिले आहे.(मला तर असेही वाटते की कधीकधी विनोदाचाही अतिरेक होतो. विषय गंभीर असतो; पण त्यातले सगळे गांभीर्य निघून जाते. जे भयानक आहे ते नॉर्मल होते). कॉक्रोच जनता पार्टीच्या निमित्ताने ही आणखी एक गोष्ट जाणवली म्हणून नोंदवावीशी वाटली. जो कुठला विरोधी आवाज, विशेषतः संघटित आवाज,असेल त्याला अजिबात वेळ न घालवता देशद्रोही म्हणणे,त्याचा बंदोबस्त केला पाहिजे असे म्हणणे किंवा हा अराजक माजवण्याचा प्रकार आहे असे म्हणणे - अत्यंत आत्मविश्वासाने म्हणणे हे फार विलक्षण आहे. माणसांची सारासार विवेकबुद्धी इतकी रसातळाला जाऊ शकते यावर विश्वास बसत नाही.

जे भाजप समर्थक अजून कट्टर झालेले नाहीत, विवेकाने निर्णय घेऊ शकत आहेत त्यांनी यावर जरूर विचार करावा. दोन विरोधी गट समोरासमोर उभे ठाकले की दोघेहीजण आपले राजकारण पुढे रेटतात हे बरोबर. त्यामुळे भाजप समर्थकांना आपले राजकारण पुढे न्यायचे आहे हे ठीक. पण ते करत असताना आपण लोकशाहीची स्पेसच नष्ट करतो आहोत का याचा त्यांनी विचार करावा. हे दुसऱ्या बाजूलाही लागू आहे. पण आज भाजप (आणि पर्यायाने भाजप समर्थक) ड्रायव्हिंग सीटवर आहेत. आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे 'लेव्हल प्लेइंग फील्ड' उरलेले नाही. मीडिया भाजपचा गुलाम आहे, स्वायत्त संस्था भाजपच्या नियंत्रणात आहेत. त्यामुळे भाजप समर्थकांनी जास्त गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

**-उत्पल व्हिबी**

# जुन्या वादातून वडगावात रिक्षाचालकाची निर्घृण हत्या

## चुलत सासरे व अल्पवयीन मुलावर खुनाचा गुन्हा.. सीसीटीव्ही फुटेजमुळे तपासाला वेग

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** शहरातील वडगाव परिसरात प्रेमविवाहातून निर्माण झालेल्या जुन्या कौटुंबिक वादाचे हिंसक रूप घेत रिक्षाचालक सय्यद वसीम सय्यद हबीब उर्फ 'मिठा चावल' (वय ३५, रा. वडगाव) यांची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. २६) सकाळी उघडकीस आली.



या प्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी दोन जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून त्यात एका विधिसंघर्षग्रस्त अल्पवयीन मुलाचाही समावेश आहे. ही घटना मंगळवारी सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास आर्णी मार्गावरील वडगाव परिसरातील जांब चौफुली येथील जयसिंगपुरे कॉम्प्लेक्स समोरील फुटपाथवर घडली. मृतक वसीम रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळून आला. त्याच्या छाती, पोट आणि तोंडावर धारदार शस्त्राचे गंभीर वार करण्यात आले होते. या प्रकरणी मृतकाचा भाऊ सय्यद शहबाज सय्यद लियाकत (वय ३४, रा. वडगाव) यांच्या तक्रारीवरून मंगेश चंपतराव कनाके (वय ४४) व त्यांच्या १७ वर्षीय मुलाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व ३(५) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सय्यद शहबाज यांनी सुमारे तीन वर्षांपूर्वी स्वाती कनाके ऊर्फ जोया सय्यद हिच्यासोबत प्रेमविवाह केला होता. या आंतरजातीय विवाहामुळे कनाके कुटुंब नाराज होते. त्यानंतर दोन्ही कुटुंबांमध्ये सातत्याने वाद सुरू होते. याशिवाय, आरोपी मंगेश कनाके यांच्या मुलीच्या १३ मे रोजी झालेल्या विवाह सोहळ्यास फिर्यादी व त्यांच्या कुटुंबियांना निमंत्रण देण्यात आले नव्हते. या कारणावरून मृतक वसीम व आरोपी यांच्यातील वाद अधिक तीव्र झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सीसीटीव्ही फुटेजमुळे मिळाला तपासाचा धागा घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुरावे संकलित केले. घटनास्थळाजवळील होंडा शोरूम परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये सकाळी ६ ते ७ वाजण्याच्या दरम्यान मृतक व संशयितांमध्ये झटापट होत असल्याचे आढळल्याचा दावा फिर्यादीने केला आहे. या फुटेजमुळे तपासाला महत्त्वाचा धागा मिळाल्याचे बोलले जात आहे. जखमी अवस्थेत वसीम यांना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

### शहरातील वाढत्या गुन्हेगारीबाबत चिंता

**विशेष म्हणजे, गेल्या आठवड्यात जामणकर नगर भागात सचिन उर्फ येडा राठोड यांच्या खुनाची घटना ताजी असतानाच शहरात पुन्हा खुनाची घटना घडल्याने नागरिकांमध्ये वाढत्या गुन्हेगारीबाबत चिंता व्यक्त होत आहे.**
**या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक नंदकुमार काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस अधिकारी के. एस. बुद्धेवार करीत आहेत. आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली असून वडगाव परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाल्याने पोलिसांनी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले आहे.**

# अवैध सावकारीवर सहकार विभागाचा दणका..!

## पुसदमध्ये धाडसत्र, शेकडो संशयित कागदपत्रे जप्त!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** पुसद तालुक्यात सुरू असलेल्या कथित अवैध सावकारी व्यवहारांवर सहकार विभागाने आज मोठी कारवाई करत धाडसत्र राबविले. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत सहा पथकांनी एकाचवेळी सहा ठिकाणी झडती घेत आक्षेपार्ह कागदपत्रे, कोरे धनादेश, स्टॅम्पपेपर, डायऱ्या, खरेदीखत व अन्य दस्तऐवज जप्त केले.

या कारवाईमुळे अवैध सावकारीच्या जाळ्यात खळबळ उडाली आहे. प्राप्त तक्रारीनुसार, रोहित सुरोशे यांच्यातर्फे दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात पुसद येथील उदासी वार्ड परिसरातील यशवंत बाबुराव पल्लेवार यांच्या निवासस्थानी झडती घेण्यात आली.




या कारवाईत तब्बल १८ आक्षेपार्ह कागदपत्रे, कोरे धनादेश व अन्य दस्तऐवज जप्त करण्यात आले. तर दुसऱ्या प्रकरणात भालचंद्र धुमाळ यांनी केलेल्या तक्रारीच्या आधारे सुनिल व निता कोमरवल्लीवार तसेच विठ्ठल आणि दिलीप लाड यांच्या ठिकाणीही पथकाने धाड टाकली. ग्रीन पार्क, पुसद तसेच रोहडा परिसरातील घरे आणि दुकानांवर घेतलेल्या झडतीत एकूण ८० हून अधिक संशयास्पद कागदपत्रे, डायऱ्या, स्टॅम्पपेपर, खरेदीखत व चिठ्ठ्या जप्त करण्यात आल्या. जप्त कागदपत्रांची तपासणी करून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. सहाय्यक निबंधक के. एस. मस्के यांच्या नियोजनाखाली महसूल, सहकार, कृषी व पोलीस विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे ही मोहीम राबविली. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था आणि तहसील प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईमुळे अवैध सावकारीविरोधात प्रशासन आता अधिक आक्रमक भूमिका घेत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# घटना-घडामोडी

## एक वर्ष सेवा, पण मानधनाचा पत्ता नाही..!

**न्याय न मिळाल्यास आमरण उपोषणाचा इशारा!"**

**महागाव :** मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेअंतर्गत महागाव पंचायत



समिती येथे डेटा ऑपरेटर म्हणून कार्यरत असलेल्या युवकाला तब्बल एक वर्ष पूर्ण होऊनही मानधन न मिळाल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत संबंधित युवकाने आता न्यायासाठी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. धारमोहा/धारेगाव (ता. महागाव) येथील रामदास शंकर भिसे यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून आपली व्यथा मांडली आहे. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेअंतर्गत ते दिनांक १ सप्टेंबर २०२४ ते ३१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत पंचायत समिती महागाव येथे डेटा ऑपरेटर म्हणून कार्यरत होते. मात्र, सेवा पूर्ण करूनही आजपर्यंत मानधन अदा करण्यात आले नसल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

"मी एक सुशिक्षित बेरोजगार असून शासनाच्या योजनेतून मानधन मिळण्याची अपेक्षा होती. परंतु अनेकदा विनंती अर्ज करूनही गटविकास अधिकारी यांनी दखल घेतली नाही. यामुळे माझ्यावर आर्थिक संकट ओढवले असून उपासमारीची वेळ आली आहे," असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून न्याय मिळावा, अन्यथा नाईलाजास्तव आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

## महागाव नगर पंचायतीत रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबवा..! शिवसेना उबाठाची मागणी

**महागाव :** महागाव नगर पंचायत क्षेत्रातील बेरोजगार युवक, शेतकरी व शेतमजुरांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी योजना तात्काळ आणि प्रभावीपणे राबविण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते तेजस पाटील नरवाडे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगर पंचायत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करून प्रशासनाचे लक्ष वेधले.
निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या ३ मार्च २०१४ च्या शासन निर्णयानुसार "क" वर्ग नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रात रोजगार हमी योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देणे तसेच विविध विकासकामांना गती देणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आहे.महागाव परिसरातील शेतकरी, शेतमजूर व बेरोजगार नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात तसेच शेतीपूरक विकासकामांना चालना मिळावी, यासाठी शेतरस्ते, पाणंद रस्ते, नाले खोलीकरण, जलसंधारण, शेततळे, वृक्षारोपण, विहिरी आणि बंधारे यांसारखी कामे प्राधान्याने हाती घेण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.
ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करून नागरिकांची आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविणे काळाची गरज असल्याचे मत तेजस नरवाडे यांनी व्यक्त केले. प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेत तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# 'मेलेडी चॉकलेट' वाटप करून युवक काँग्रेस तर्फे प्रतिकात्मक आंदोलन..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. २६ :** मेलेडी'वर रील, जनतेवर महागाईची डील! इंधन दरवाढीविरोधात युवक काँग्रेसचा मोदी सरकारवर हल्लाबोल केला.मागील अवघ्या दहा दिवसांत चार वेळा झालेल्या पेट्रोल-डिझेल दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक ताण वाढला असून, राज्यात निर्माण झालेल्या इंधनाच्या तीव्र टंचाईविरोधात तालुका युवक काँग्रेसने आज बाभुळगाव तहसील कार्यालयासमोर जोरदार आंदोलन छेडले. केंद्रातील मोदी सरकारच्या धोरणांचा निषेध करत कार्यकर्त्यांनी नागरिकांना 'मेलेडी चॉकलेट' वाटून अनोख्या पद्धतीने संताप व्यक्त केला.

### इंधन टंचाई व महागाईवर संताप



यावेळी आंदोलकांनी केंद्र सरकारवर निशाणा साधताना, देशातील जनतेला बचत आणि संयमाचे सल्ले दिले जातात. मात्र दुसरीकडे देशातील गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ प्रतिमा जपण्याचे राजकारण सुरू असल्याचा आरोप केला. बेरोजगारी, महागाई आणि इंधनटंचाईमुळे सामान्य नागरिक त्रस्त असताना सत्ताधाऱ्यांचे प्राधान्यक्रम वेगळेच असल्याची टीका करण्यात आली. तालुका युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी वाढत्या इंधन दरामुळे शेती, वाहतूक, उद्योग आणि सर्वसामान्यांचे घरगुती अर्थकारण कोलमडत असल्याचे सांगत, तातडीने दरवाढ मागे घ्यावी आणि इंधनपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली. या आंदोलनात तालुका युवक अध्यक्ष अमेय घोडे, उपाध्यक्ष मुकेश बोबडे, तालुका अध्यक्ष मोहन बनकर, संदेश आखरे, शाहरुख खान, प्रदीप नंदुरकर, अक्षय राऊत, राजेश काटेकर, मनमोहन भोयर, अतुल भाऊ देशमुख, पांडुरंगजी लांडगे, प्रकाश भाऊ नागतोडे, विनोद वाटमोडे, विपुल बोदडे, संकेत देशमुख, अंकुश सोयाम, कवीश गावंडे, मोहन शेंडे, मनोज पाचघरे, सुयोग आराडे, हबीब बेग, राजू भाऊ चुके आदी उपस्थित होते.

# इंधन दरवाढी विरोधात पुसद मध्ये महाविकास आघाडीचे तीव्र आंदोलन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २६ :** केंद्र सरकारच्या सततच्या इंधन दरवाढीच्या निषेधार्थ पुसद येथे महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किंमतीमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि वाहन धारकांचे आर्थिक कंबरडे मोडले असून केंद्र सरकारने तात्काळ इंधन दर कमी करावेत, अशी मागणी आंदोलकांनी केली.



महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलकांनी हातात फलक घेत केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच पेट्रोल पंपावर येणाऱ्या नागरिकांना 'मेलोडी' चॉकलेट वाटून अनोख्या पद्धतीने निषेध नोंदविण्यात आला.इंधन दरवाढ कमी करा. महागाईला आळा घाला.सामान्य जनतेला दिलासा द्या अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी नेत्यांनी इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीतही मोठी वाढ झाल्याचा आरोप केला. त्यामुळे सर्वसामान्यांचे जीवन अधिक कठीण बनल्याचे त्यांनी सांगितले. पेट्रोल आणि डिझेलवरील कर तातडीने कमी करावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व महाविकास आघाडीचे नेते शरद मैद,काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अॅड. सचिन नाईक आणि शिवसेनेचे मोहन विश्वकर्मा यांनी केले. यावेळी विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईविरोधात काँग्रेसचा रोष..!

## विविध मागण्यांसाठी प्रशासनाला निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. २६ :** तालुका प्रतिनिधी देशातील केंद्र सरकार आणि राज्य शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन असह्य झाले असून पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस सिलेंडर, रासायनिक खतांच्या वाढत्या किमतींसह विविध योजनांतील रखडलेल्या निधीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने मंगळवारी (दि. २६) उपविभागीय अधिकारी राळेगाव यांना निवेदन देण्यात आले.




महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंतराव पुरके यांच्या नेतृत्वाखाली तसेच काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष अरविंद वाढोणकर, तालुकाध्यक्ष राजेंद्र तेलंगे आणि शहराध्यक्ष प्रदीप ठुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात इंधन दरवाढ, रासायनिक खतांच्या वाढत्या किमती, विविध योजनांतर्गत मंजूर झालेल्या विहिरी व घरकुलांचे रखडलेले निधी यांसह पंचायत समितीच्या कथित भोंगळ कारभाराबाबत रोष व्यक्त करण्यात आला. वाढत्या महागाईमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. तसेच शासनाने या मागण्यांवर तातडीने तोडगा काढला नाही तर पुन्हा एकदा व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा काँग्रेस पक्षाने दिला. यावेळी समविचारी संघटना, घरकुल आणि विहीर लाभार्थी तसेच नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असेही सांगण्यात आले. यावेळी अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी, शेतमजूर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी शासनाविरोधात घोषणाबाजी करून निषेध नोंदविला.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काँग्रेसचा एल्गार..!

## यवतमाळात ट्रॅक्टर-डबकी मोर्चाने सरकारला धडक इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांसमोर उभ्या ठाकलेल्या खतटंचाई, रखडलेला पिक विमा, वाढते इंधन दर आणि विस्कळीत वीजपुरवठ्याच्या प्रश्नांवर काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत आज यवतमाळ शहरात भव्य ट्रॅक्टर-डबकी मोर्चा काढत सरकारविरोधात जोरदार एल्गार पुकारला. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या आंदोलनाने शहराचे लक्ष वेधून घेतले.




तालुका काँग्रेस कमिटी, शहर काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस तसेच विविध सेल आणि आघाड्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या मोर्चाची सुरुवात मेडिकल चौक, दोन पंजा येथून झाली. लाठीवाला पेट्रोल पंप, संविधान चौक, दत्त चौक आणि महात्मा ज्योतिबा फुले स्मारक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकला. ट्रॅक्टर, डबकी आणि घोषणा बाजी मुळे आंदोलनाला विशेष स्वरूप प्राप्त झाले. काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री व कृषिमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात शेतकऱ्यांना कृषी कामांसाठी कॅन मधून डिझेल उपलब्ध करून देणे, रात्रीची सिंगल फेज वीज सुरळीत करणे, सोयाबीन, कापूस व तूर पिकांचा रखडलेला विमा मंजूर करणे, डीएपी-युरिया खतांचा पुरेसा पुरवठा, बोगस खते-बियाणे-कीटकनाशकांवर कारवाई आणि शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव देण्याच्या मागण्या करण्यात आल्या. यावेळी माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनी राज्य सरकारवर शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. तर आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी सरकारने तातडीने निर्णय न घेतल्यास आगामी काळात आणखी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. मोर्चात काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक आणि मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने केवळ आश्वासन नव्हे, तर तात्काळ ठोस कृती करावी, अशी तीव्र भावना आंदोलनातून व्यक्त करण्यात आली.

# सवना येथे गारपीट, वादळाने जनजीवन विस्कळीत..

## चक्रीवादळामुळे घरांची टिनपत्रे उडाली, केळी बागांचे मोठे नुकसान वाहतूक ठप्प, वीजपुरवठा खंडित

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २६ :** महागाव तालुक्यात मंगळवारी (दि. २६ मे) दुपारच्या सुमारास अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्याने जोरदार तडाखा दिला. तालुक्यातील सवना व खडका परिसरात सायंकाळी चारच्या सुमारास आलेल्या वादळाने मोठ्या प्रमाणात नुकसान घडवून आणले. अचानक आलेल्या चक्रीवादळामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सवना येथे वादळी वाऱ्याच्या तडाख्यामुळे अनेक घरांवरील टिनपत्रे उडून गेली.





येथील शेतकरी विनायक देशमुख यांच्या शेतातील टिनशेड उध्वस्त झाले असून, त्यात एक लहान वासराचा मृत्यू झाला. तसेच इतर काही जनावरे जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. याच वादळामुळे गोपाळराव सरसमकर यांची केळी बाग पूर्णतः उद्ध्वस्त झाली असून परिसरातील अनेक केळी उत्पादक शेतकऱ्यांचे ही मोठे नुकसान झाले आहे. अवकाळी संकटामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणीचे नवे संकट उभे ठाकले आहे. दरम्यान, महागाव–सवना–गुंज मार्गावर अनेक ठिकाणी झाडे कोसळल्याने वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. तसेच वीज खांब व तारांचे नुकसान झाल्याने परिसरातील वीजपुरवठाही खंडित झाला आहे. जिल्ह्यात विविध भागांत अवकाळी पावसाने हाहाकार माजवला असून अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून प्रशासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी नागरिक व शेतकरी करत आहेत.


**NAME CHANGE**

MY OLD NAME WAS. SYED SHUJAUDDIN SYED FAIYAZUDDIN NOW MYNEW NAME IS. SYED SUJAUDDIN SYED FAIYAZUDDIN. ADDRESS. GANDHI NAGAR GHATE LAYOUT PUSAD DISTRICT YAVATMAL ४४५२०४

**NAME CHANGE**

MY OLD NAME WAS SUJAUDDIN NOW MYNEW NAME IS SYED SUJAUDDIN SYED FAIYAZUDDIN. ADDRESS. GANDHI NAGAR GHATE LAYOUT PUSAD DISTRICT YAVATMAL ४४५२०४

**क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/४९२/२०२६**
**तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड**
**दिनांक : २६/०५/२०२६**

**जाहीर सूचना**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार राबिया बी इब्राहीम खान रा.उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची मुलगी नामे आएशा बानो इब्राहीम खान जन्म दि-०१/०४/१९६४ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १०.०६.२०२६० पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी, उमरखेड

### स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार व कोचिंग क्लासेसच्या मनमानीविरोधात

# अ.भा.ग्राहक कल्याण परिषद आक्रमक; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

देशातील व राज्यातील विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने होणारे गैरप्रकार, 'नीट' परीक्षेतील पेपरफुटी आणि खासगी कोचिंग क्लासेसकडून सुरू असलेली आर्थिक लूटमार याविरोधात अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद, महाराष्ट्रच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना एक परिपत्रक व निवेदन सादर करण्यात आले. या गंभीर प्रश्नांकडे शासनाचे तातडीने लक्ष वेधण्यासाठी परिषदेच्या वतीने तीव्र निदर्शने व निषेध आंदोलनही करण्यात आले.



गेल्या काही दिवसांत नीट परीक्षेच्या पेपरफुटीच्या घटनांमुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या लाखो गुणवंत विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात सापडले आहे. दिवस-रात्र मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांवर या भ्रष्ट व्यवस्थेमुळे मोठा अन्याय होत असून, तरुण वर्गात तीव्र संतापाचे आणि नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर ग्राहक कल्याण परिषदेने आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला जाब विचारला आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, शिक्षण हे सेवा आणि संस्काराचे माध्यम असताना आज खासगी कोचिंग क्लासेसनी त्याचे व्यावसायिक दुकान थाटले आहे. मध्यमवर्गीय आणि सामान्य पालकांची आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी शासनाने कोचिंग क्लासेससाठी तातडीने नियमावली तयार करून फीचे निश्चित पॅटर्न जाहीर करावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच, अनेक विभागांच्या प्रलंबित व रखडलेल्या स्पर्धा परीक्षा पारदर्शक पद्धतीने व वेळेत घेऊन सुशिक्षित बेरोजगारांना दिलासा द्यावा, याकडेही लक्ष वेधण्यात आले. 'नीट'सह सर्व स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी व्हावी, पेपरफुटी व शैक्षणिक गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, खासगी कोचिंग क्लासेससाठी शासनमान्य फी संरचना व कडक नियंत्रण यंत्रणा लागू करावी, विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी कोचिंग संस्थांची नियमित तपासणी व्हावी, रखडलेल्या सर्व स्पर्धा परीक्षा तातडीने व संपूर्ण पारदर्शक पद्धतीने घेण्यात याव्यात, परीक्षा प्रक्रियेत तांत्रिक सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यात यावी.

यावेळी परिषदेचे गजानन मुदगल स्टेट चेअरमन, प्रभाकर वानखडे स्टेट सेक्रेटरी, निलेश टवलारे वर्किंग प्रेसिडेंट, ज्योत्स्ना शेटे राज्य सचिव, नंदा राऊत महिला जिल्हा अध्यक्ष, मयूर बासुंदे जिल्हाध्यक्ष, प्रवीण चंद्र मसराम जिल्हा सचिव, रोहन ढोमने महानगर अध्यक्ष, आशिष बिसणे, पवन सुरजेकर, नितीन मेश्राम, मयूर नांदेकर, महेश पंडित, ऋषिकेश थेलकर, मनोज सावरकर, मनीषा मडावी महानगर, अध्यक्ष, बबीता राठोड, सरिता इंगोले, रूपाली देशमुख, मंगला अस्वर, स्मिता वासेकर चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष, शुभांगी सोळंके, ममता घनकर, सुवर्णा पार्तेकी, सरिता मसराम, शालिनी गुढे, मेघा मेश्राम, दिव्या ढोमणे, बिंदिया गणेशकर, प्रमुख पदाधिकारी, सदस्य तसेच मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

## संक्षिप्त

### विद्यापीठाच्या २८ मे रोजी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या



**अमरावती** -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या उन्हाळी-२०२६ लेखी परीक्षांच्या वेळापत्रकात महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. २८ मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.विद्यापीठाने जाहीर केलेल्या परिपत्रकानुसार, २८ मे २०२६ रोजी 'बकरी ईद' असल्याने या दिवशी नियोजित असलेल्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.२८ मे रोजी होणाऱ्या परीक्षा आता १७ जून २०२६ रोजी घेतल्या जाणार आहे . महाविद्यालयांनी याची तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी सुध्दा आपापल्या महाविद्यालयांशी संपर्क साधून माहिती करुन घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

### ३१ में ला श्री संत गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक महापारायण

**चांदूरबाजार**-पुरुषोत्तम मासाचे औचित्य साधून स्व. रवीन्द्र, स्व. सुमती केशवराव टोम्पे, स्व. केशवराव टोम्पे व स्व. नितीन कोरडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ३१ मे २०२६ रोजी सकाळी ६ वाजता श्री संत गजानन विजय ग्रंथाचे,एक दिवसीय सामूहिक महापारायणाचे आयोजन करण्यात आले आहे.हा भक्तिमय सोहळा निर्मिती पब्लिक स्कूल, नानोरी रोड, चांदूर बाजार, येथे होणार आहे. तसेच दुपारी १ ते ४ दरम्यान, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे, श्री संत गजानन महाराजांच्या मुंडगाव येथील पादुकांचे आगमन या प्रसंगी होणार आहे. तसेच दासगणु लिखित श्री गजानन विजय ग्रंथाचे मुखोद्गत पारायण, डॉ. गजानन खासनीस (पुणे) यांच्या अमृतवाणीतून होणार आहे. त्यामुळे चांदूर बाजार नगरीत भक्तीमय वातावरण निर्माण होणार आहे.या कार्यक्रमाचे आयोजन श्री संत गजानन महाराज सेवा समिती व भक्तपरिवार गो. सी. टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्ट, चांदूर बाजार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### भजन मंडळांना साहित्य वितरण



**दर्यापूर**-गावागावातील भजन मंडळे सक्षम व्हावीत, भक्तिसंगीताची परंपरा अखंड राहावी, यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून त्यांच्या हस्ते येवदा येथील जय गुरुदेव भजन मंडळ, जय वळेखन भजन मंडळ तसेच वडनेर गंगाई येथील अरबाडी भजन मंडळ यांना भजनासाठी आवश्यक साहित्याचे वितरण करण्यात आले.साहित्यामध्ये उच्च दर्जाचे मायक्रोफोन, भोंगे, स्पीकर, ॲम्प्लिफायर, चटई तसेच इतर उपयुक्त साहित्याचा समावेश आहे. ग्रामीण भागातील भजन मंडळांना आधुनिक सुविधा मिळाव्यात यासाठी खासदार डॉ. बोंडे यांनी दीर्घकाळ पाठपुरावा केला होता. त्याचेच हे फलित असल्याचे उपस्थितांनी सांगितले.सोहळ्यास बाळासाहेब वानखडे, जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य सभापती बाळासाहेब हिंगणीकर, कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूरचे संचालक मनिष कोरपे, मदन पाटील बायस्कार, सलीमभाई घानिवाले, रामदास कराळे, ओमप्रकाश शर्मा, बाळासाहेब वडतकर, तंटामुक्ती अध्यक्ष भरत गावंडे, श्याम ठाकरे, नितीन बढे, चंदू रघुवंशी, किरण देशमुख, प्रीती गिरपुंजे, मयूर वांदे, रामेश्वर इंगळे, डॉ. संजय पाटील, रघुनाथ खलोकार, अनिल गावंडे, प्रशांत गोडचर, श्रीधर हिवसे, दीपक कंटाळे, पुरण मोहोड, शेषराव तायडे, सतीश टोलमारे, प्रकाश बावनकुळे, दिलीप दवंडे, ऋषिकेश इंगळे, कुलदीप हागे, शुभम सातपुते, प्रज्वल गावंडे, दिनेश मुंडाले, चंद्रशेखर पवार, सोपान सोळंके, कनक सोनटक्के यांच्यासह मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

## १५ जून ते ३० सप्टेबरपर्यत सफारी गेट बंद

### आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वन विभागाचा निर्णय

**अचलपूर/वार्ताहर**




मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये जंगल सफारीसाठी इच्छूक असलेल्या प्रवाशांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. वन विभागाने आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मेळघाटातील सेमाडोह, चिखलदरा, हरिसाल, शहानूर, नरनाळा आणि इतर सर्व सफारी गेट १५ जून ते ३० सप्टेंबरपर्यंत बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे साडेतीन महिने पर्यटकांना जंगलात सफारीचा आनंद घेऊ शकता येणार नाही.

साधारणपणे १५ जूनपासून पावसाळा संपेपर्यंत राज्यातील अनेक व्याघ्र प्रकल्पातील पर्यटन बंद करण्यात येते. १ ऑक्टोबरपासून पर्यटनाला पुन्हा सुरूवात होते. येत्या १५ जूनपासून वन विभागाने मेळघाटातील सफारीचे बुकिंग बंद केले आहे. संकेतस्थळावर त्याची माहिती मिळते. त्यामुळे आता पर्यटकांना पावसाळा संपेपर्यंत जंगल सफारीसाठी वाट बघावी लागणार आहे. एकीकडे जंगलात वाहने अडकून पडतात. याशिवाय वन्यप्राण्यांचा प्रजनन कालावधी लक्षात घेऊन वन्यप्राण्यांच्या हालचाली अबाधित ठेवण्यासाठी जंगल सफारी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे वन विभागातील सूत्रांनी सांगितले.

## कंत्राटदाराला मुदतवाढ; बससेवा सुरू राहणार

**अमरावती/का.प्र.**

शहर बससेवेच्या कंत्राटदाराचा करार सोमवारी संपला असून, आर्थिक नुकसानीमुळे कंत्राटदाराने काही सवलती मिळाल्यावरच बससेवा सुरू ठेवणे शक्य असल्याचे सांगितले होते; मात्र सध्या विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता सुरू असल्याने आणि ई-बसचा प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत सध्याचीच बससेवा सुरू ठेवणे अपरिहार्य असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे तूर्तास सध्याच्याच कंत्राटदाराला मुदतवाढ देण्यात आल्याने बससेवा सुरू राहणार असून, आचारसंहिता संपल्यावर कंत्राटदाराच्या मागण्यांवर विचार केल्या जाण्याची शक्यता आहे.

आयुक्त वर्षा लड्डा यांच्यास्तरावर प्रशासकीय बैठक पार पडली. त्यानंतर महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या अध्यक्षतेतही प्रमुख पदाधिकाऱ्यांचीही बैठक पार पडली. या दोन्ही बैठकांना 'साहू टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स' या कंत्राटदार संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. बसेसचा विमा, देखभाल दुरुस्ती व आता डिझेलचे वाढते दर यामुळे बससेवा तोट्यात असल्याचा दावा कंत्राटदाराकडून करण्यात आला. त्यामुळे बसचा विमा व रॉयल्टीमध्ये सवलत देण्यात यावी, अशी मागणी कंत्राटदाराने केली; मात्र सध्या आचारसंहिता लागू असल्याने शहरबसच्या नव्या करारासंदर्भातील प्रक्रिया व निर्णय तत्काळ घेणे शक्य नसल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच शहरातील हजारो नागरिक दररोज शहर बस सेवेचा वापर करीत असल्याने ही सेवा अखंडित सुरू राहणे अत्यंत आचारसंहितेमुळे कंत्राटदाराला तूर्तास कोणतीही सवलत नाही महापौरांसह महापोह महापालिका आयुक्तांनीही घेतली बैठक गरजेचे आहे. नवीन ई-बसेसचा प्रकल्प सुरू होण्यासाठी अद्याप तीन ते चार महिन्यांचा कालावधी



लागणार असून, तोपर्यंत सध्याची बससेवा सुरू ठेवावी लागणार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर कंत्राटदाराच्या रास्त मागण्यांबाबत निर्णय घेतल्या जाण्याची शक्यता आहे. या बैठकीत उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, गटनेता शेख हमीद शेख वाहेद, नगरसेवक ॲड. प्रशांत देशपांडे उपस्थित होते.

### आ.कडू यांची वसु कुटुंबाला सांत्वन भेट

**आसेगाव पूर्णा**-येथील संकेत वसु यांचा विवाह १० मे रोजी संपन्न झाला होता. मात्र विवाहानंतर अवघ्या चौथ्याच दिवशी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याने वसु कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार बच्चू कडू यांनी आसेगाव येथे वसु कुटुंबाच्या निवासस्थानी भेट देत सांत्वन केले.यावेळी परिवारातील सदस्यांसह मतदारसंघातील काही कार्यकर्ते उपस्थित होते.



## कडक उन्हात जनगणनेची फरफट

### जिल्ह्यातील तसेच ग्रामीण शिक्षकांचा संताप उसळला

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

राज्यात सुरू असलेल्या जनगणना मोहिमेमुळे अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शिक्षक व प्रगणकांवर कामाचा ताण प्रचंड वाढला आहे. तळपत्या उन्हात घराघरांत जाऊन माहिती संकलित करताना शिक्षकांची अक्षरशः फरफट होत असून अनेक शिक्षक या परिस्थितीबद्दल तीव्र संताप व्यक्त करत आहेत.



शाळांना सुट्या लागल्यानंतर शिक्षकांना जनगणना, घरगणना व विविध सर्वेक्षणांच्या अतिरिक्त कामांसाठी नियुक्त करण्यात आले आहे. मात्र अपुरा कर्मचारीवर्ग, कोणतीही योग्य योजना नसणे आणि एका प्रगणकावर शेकडो घरांची जबाबदारी देण्यात आल्यामुळे शिक्षक त्रस्त झाले आहेत.कडक उन्हामुळे चक्कर येणे, अशक्तपणा, डोकेदुखी, निर्जलीकरण यांसारख्या आरोग्य समस्या मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत. ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था खराब असल्याने व वाहतुकीची व्यवस्था नसल्यामुळे विशेषतः महिला प्रगणकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

माहिती संकलन, पडताळणी आणि ऑनलाइन नोंदी भरण्यासाठी शिक्षकांना दिवसभर गावोगावी फिरावे लागत आहे. सुट्यांमध्ये विश्रांती मिळण्याऐवजी उलट दुप्पट कामाचा ताण येत असल्याची खंत शिक्षक व्यक्त करत आहेत. अमरावती जिल्ह्यातील शिक्षक संघटनांनी प्रशासनाकडे अतिरिक्त प्रगणकांची नेमणूक, वाहतूक भत्ता, विशेष रजा, आरोग्य व अपघात विमा संरक्षण आणि समान कामाचे वाटप यांसारख्या मागण्या तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

## तक्षशीला अभियांत्रिकी महाविद्यालयात नवीन १०० केव्हीए रोहित्र केंद्र कार्यान्वित



**अचलपूर/वार्ताहर**

तक्षशीला अभियांत्रिकी महाविद्यालय, दारापूर येथे नुकतेच नवीन १०० केव्हीए क्षमतेचे रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) केंद्र उभारून ते यशस्वीपणे कार्यान्वित करण्यात आले. या नवीन रोहित्र केंद्रामुळे महाविद्यालय परिसर, शैक्षणिक इमारती तसेच वसतिगृहातील विद्युत पुरवठा अधिक अखंडित, सुरळीत राहण्यास मोठी मदत होणार आहे.

महाविद्यालय परिसरातच रोहित्र केंद्र उभारण्यात आल्याने विद्युत अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तांत्रिक ज्ञान मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. विद्यार्थ्यांना रोहित्र केंद्राची रचना, त्यासाठी लागणारे विविध विद्युत साहित्य, विविध व्होल्टेज पातळ्या, अर्थिंगचे महत्त्व तसेच वीज वितरण व्यवस्थेची कार्यपद्धती याबाबत प्रत्यक्ष माहिती व अनुभव मिळणार आहे.रोहित्र केंद्र कार्यान्वित करण्याच्या कार्यक्रमास प्रदीप अंधारे कार्यकारी अभियंता महावितरण अचलपूर विभाग, डॉ. डी. टी. इंगोले, प्राचार्य व संचालक, तक्षशीला अभियांत्रिकी महाविद्यालय, विक्रम काटोले उपकार्यकारी अभियंता महावितरण दर्यापूर उपविभाग तसेच खोलापूर वितरण केंद्राचे तांत्रिक कर्मचारी आणि महाविद्यालयातील प्राध्यापक मंडळी उपस्थित होती.या उपक्रमामुळे महाविद्यालयाच्या विद्युत पायाभूत सुविधांमध्ये भर पडली असून विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षणालाही नवी दिशा मिळणार असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

### महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशनतर्फे

## हृदयरोग तज्ञ डॉ अक्षय ढोरे यांचे व्याख्यान



**अमरावती/का.प्र**

महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन तर्फे हृदयरोग तज्ञ डॉ अक्षय ढोरे यांचे व्याख्यान संपन्न झाले.मंचावर डॉ स्वाती लबडे – पडोळे, सहसचिव डॉ जयंत भोसले,डॉ अशोक उमप, फोरम अध्यक्ष डॉ शशांक दुबे, लेडीविंग चेअरपर्सन डॉ शीतल आचार्य, प्रकल्प प्रमुख डॉ कपिल वानखडे, कार्डीयॉलॉजिस्ट डॉ अक्षय ढोरे उपस्थित होते.


कार्यक्रमाचा प्रकल्प अहवाल डॉ कपिल वानखडे यांनी सादर केला आणि सहप्रकल्प प्रमुख डॉ स्नेहल खेरडे यांनी कार्यक्रमासाठी त्यांना मदत केली. कार्डीयॉलॉजिस्ट डॉ अक्षय ढोरे यांनी अशी ` Myocardial Infaction & Cardiac Intervention' बद्दल महत्वपूर्ण माहिती सांगितली. होमिओपॅथीक बालरोग तज्ञ डॉ अमित निंभोरकर यांनी Segment of success & failuar of homoeopathy या विषयी अतिशय सुंदर असे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला संघटनेचे सचिव डॉ नंदकिशोर भूतडा देखील उपस्थित होते.संचालन डॉ विपुल भट्टड आणि डॉ स्नेहल वानखडे यांनी केले.कार्यक्रमाला संघटनेचे सर्व सन्मानीय पूर्वाध्यक्ष,उपाध्यक्ष तालुका प्रतिनिधी, संघटनेचे सदस्य आणि महिला डॉक्टर्स मोठया प्रमाणात उपस्थित होते. आभार प्रदर्शन सहसचिव डॉ जयंत भोसले यांनी केले. कार्यक्रमाची माहिती संघटनेच्या प्रसिद्धी प्रमुख डॉ वैशाली टेम्भे आणि सहप्रसिद्धी प्रमुख डॉ प्रज्ञा घाटोळ यांनी माध्यमाना कळविले.

# अमरावतीत खरबूजासह आंब्याची आवक वाढली

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीत आंब्यासह कलिंगड आणि खरबूजाची आवक वाढली आहे. गेल्या महिनाभरापासून कलिंगडाची आवक सुमारे १४० क्विंटलवर स्थिर असल्याचे व्यापारी सूत्रांनी सांगितले. सध्या कलिंगडाचे दर दबावात असून प्रतिक्विंटल ६०० ते १,४०० रुपये दराने व्यवहार होत आहेत. किरकोळ बाजारात मात्र कालिंगडाची विक्री प्रतिकिलो ४० ते ५० रुपये दराने हीत असल्याची माहिती देण्यात आली.


सध्या कलिंगडाचा हंगाम अंतिम टप्प्यात असला, तरी बाजारातील आवक स्थिर आहे. दर मात्र काहीसे दबावात आले आहेत. किरकोळ बाजारात आवक कमी झाल्याचे सांगत कलिंगडाची विक्री अधिक दराने केली जात आहे. कलिंगडासोबतच खरबूजाची आवकही नियमित असून ती सुमारे ७४ क्विंटल इतकी आहे. खरबूजाला प्रतिक्विंटल १ हजार ते १ हजार ५०० रुपये दर मिळत आहे.



बाजारातील आंबा आवकेचा विचार करता गावरान आंब्याची ११२ क्विंटल आवक नोंदविण्यात आली. त्याला प्रतिक्विंटल १ हजार ते १ हजार ५०० रुपये दर मिळाला. दशहरी आंब्याला प्रतिक्विंटल ३ हजार ते ४ हजार रुपये दर मिळाला असून त्याची आवक १२१ क्विंटल होती.

केशर आंब्याचे दर प्रतिक्विंटल ७ हजार ते ९ हजार रुपये असून त्याची आवक ११८ क्विंटल इतकी होती. बैंगनपल्ली आंब्याची ३३२ क्विंटल आवक झाली असून त्याला २ हजार ५०० ते ३ हजार ५०० रुपये दर मिळाला. तोतापुरी आंब्याला प्रतिक्विंटल १ हजार ते २ हजार रुपये दर मिळाला असून त्याची आवक १२६ क्विंटल होती. चरकुलस आंब्याचीही नियमित आवक होत असून त्याला प्रतिक्विंटल ३ हजार ते ३ हजार ५०० रुपये दर मिळाला. त्याची आवक १२४ क्विंटल नोंदविण्यात आली. बाजारात तैवान पपईची ८१ क्विंटल आवक झाली असून त्याला १ हजार ५०० ते २ हजार २०० रुपये दर मिळाला. भाजीपाला बाजाराचा विचार करता वांग्याची ११३ क्विंटल आवक झाली असून त्याला प्रतिक्विंटल १ हजार ते २ हजार रुपये दर मिळाला. लसणाला प्रतिक्विंटल ६ हजार ते १८ हजार रुपये दर मिळाला असून त्याची आवक १२६ क्विंटल होती. पालकाचे दर प्रतिक्विंटल १ हजार ते १ हजार ६०० रुपये राहिले असून त्याची १४७ क्विंटल आवक नोंदविण्यात आली. ढोबळी मिरचीची आवक ७० क्विंटल असून तिला २ हजार ते २ हजार ५०० रुपये दर मिळाला.

# परीक्षा कधी होणार 'नीट'?



**पेपर फुटीचे सूत्रधार हे पेशाने शिक्षक आहेत. विद्यार्थ्यांना घडविणारी ही शिक्षक मंडळी आपल्या विद्यार्थ्यांपुढे कोणता आदर्श ठेवत आहेत, याचा विचार आपण करायला हवा. शालेय विद्यार्थ्यांच्या मूल्यशिक्षणावर अजून काम करण्याची गरज आता निर्माण झाली आहे.**

**नी**ट पेपरफुटी प्रकरणावर देशभरात सध्या जोरात चर्चा सुरू आहे. त्याविरोधात येणाऱ्या प्रतिक्रियाही तीव्र आहेत. पेपर फुटीच्या घटनेवर येणाऱ्या काही प्रतिक्रिया अशा आहेत की, शंभर टक्के नीटच्या गुणांवर मेडिकलला प्रवेश नको, त्यात पन्नास टक्के नीट आणि पन्नास टक्के बारावी बोर्ड परीक्षेतील गुण मिळून प्रवेश व्हावेत. नीट प्रश्नपत्रिकेचे स्वरूप हे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न न ठेवता ते दीर्घ उत्तरी असावे. कोचिंग क्लासवर बंदी घालावी. शिक्षणाचे बाजारीकरण थांबवावे, ऑफलाइन ऐवजी ऑनलाइन परीक्षा घ्यावी. हे सर्व उपाय फक्त नीट परीक्षा आणि मेडिकल मध्ये प्रवेश यांच्या भोवतीच आता फिरत आहेत. वाढत चाललेले कोचिंग क्लासचे प्रस्थ आणि शिक्षणाचे बाजारीकरण, प्रवेश बेणे, बोर्ड परीक्षेसाठी अर्ज भरणे, परीक्षा घेणे, गुणपत्रक आणि टीसी देणे एवढ्याच सोपस्कारांपुरती उरलेली कनिष्ठ महाविद्यालये आणि प्रवेश परीक्षांच्या स्पर्धेत ग्रामीण, गरिब हुशार विद्यार्थ्यांला सोबत न घेणारी व्यवस्था या मूळ रोगांवर है तात्पुरते उपाय परिणामकारक ठरणार नाहीत. नीट पेपरफुटी प्रकरणाची चर्चा मागे पडली की हे उपाय ही विरून जाण्याचीच शक्यता जास्त आहे.

**शिक्षणाचा बाजार**

मुळात शिक्षणाच्या बाजरीकरणाची सुरुवात ही काही अकरावी, बारावीला होत नाही. त्याचे मूळ हे अगदी पूर्वप्राथमिक शिक्षणात आहे. साधारण नव्वदच्या दशकात सरकारी, अनुदानित शाळा आणि खाजगी स्कूल यांचे प्रमाण ९०:१० होते. आज हे प्रमाण ५०:५० इतके आले आहे. देशात २००९ ला आलेला शिक्षण हक्क कायदा आणि तो खाजगी शाळेतील २५ टक्के प्रवेश पुरताच मर्यादित राहिला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आपल्याकडे लागू झाले. परदेशी शिक्षणाचे अनेक संदर्भ घेत आपण हे घोरण राबवित आहोत. पण अमेरिका, फिनलंड सारख्या देशांत शालेय शिक्षणाची काय स्थिती आहे तर तिथे सर्व शाळा या सरकारी आहेत. पालक गरीब असो की श्रीमंत त्याला त्याच्या घराजवळच्याच सरकारी शाळेत आपल्या पाल्याचा प्रवेश घ्यावा लागतो. आपल्याकडे नेमकी विरुद्ध परिस्थिती आहे. सरकारी शाळा आहेत पण तिथे शिक्षक नाहीत. खाजगी स्कूलच्या तुलनेत भौतिक सुविधांचा अभाव आहे. सरकारी, अनुदानित शाळांतील शिक्षक आपले शिकविण्याचे मूळ काम सोडून सरकारने दिलेल्या कामांमध्ये अधिक व्यस्त आहेत. या शाळांच्या गुणवत्तेवर यंत्रणेचे सूचक मौन असते. ज्या पालकाकडे दोन पैसे आहेत. ते पूर्वप्राथमिक वर्गापासून हजारोंची फी भरून खाजगी स्कूलची वाट धरतात. खाजगी शाळा हे आता प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले आहे. इथून खरी शिक्षणाच्या बाजारीकरणाला सुरुवात होते. आपल्याला शिक्षणाचे बाजारीकरण थांबवायचे असेल तर अजूनही सरकारने सरकारी आणि अनुदानित शाळा सक्षम करायला हव्यात. सरकारी आणि अनुदानित शाळेत गुणवंत आणि पुरेसे शिक्षक भरणे, शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांविषयी पुनर्विचार करणे,शाळांची गुणवत्ता आणि दर्जा तपासणारी यंत्रणा शिक्षणातील सकारात्मक कामासाठी विकसित करणे, शाळा सक्षमीकरणात लोकसहभाग घेणे, सरकारी शाळांची यंत्रणा सक्षम करून शाळेत प्रवेशाची सक्ती केल्यास सर्वच विद्यार्थी एका व्यवस्थेत शिकू शकतात.

इच्छा, आवड, हुशारी याचा विचार न करता सर्वच जण डॉक्टर, इंजिनियर होण्याची वाट निवडतात. त्यातून कोचिंग क्लाससारख्या व्यवस्थेला बळ मिळते. डॉक्टर आणि इंजिनिअर वगळता इतर अनेक चांगली क्षेत्रे आहेत, याची मुलांना आणि पालकांनाही माहिती नसते. त्यामुळे करिअरच्या विविध संधींची, क्षेत्रांची ओळख विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणात करून देण्याची तरतूद आपण करायला हवी. सर्वच मुले डॉक्टर आणि इंजिनिअर होण्याकडे वळली तर बाकी क्षेत्रातही गुणी मुलांची गरज असते. तिथे आपण ही तूट कशी भरून काढणार आहोत. सुमारे बावीस लाख मुले दर वर्षी नीट परीक्षा देतात त्यातील साधारण पाच टक्के विद्यार्थी वैद्यकीय शाखेत प्रवेश घेतात. बाकी मुलांचे पुढे काय होते? याचाही विचार आपण करून शासन, समाज आणि पालक यांनी मुलांचे प्रबोधन करायला हवे. यामुळे डॉक्टर आणि इंजिनिअर होणे हेच यशाचे परिमाण आहे, हा पालक आणि समाजाचा गैरसमज दूर होण्यास मदत होईल.

**एक देश एक परीक्षा**

गाव खेड्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणारा विद्यार्थी आणि मुंबईतील एखाद्या उद्योगपतीच्या शाळेत शिक्षण घेणारा विद्यार्थी याची एकत्र स्पर्धा ही 'नीट' सारख्या परीक्षेतून घेतली जाते. अशी परीक्षा अभावग्रस्त शिक्षण घेणाऱ्या खेड्यातील मुलांवर अन्याय करणारी आहे. नीट परीक्षेत गेल्या बारा, तेरा वर्षांत कोचिंग क्लास शिवाय यशस्वी झालेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांची किती उदाहरणे आहेत ? ते प्रमाण खूपच नगण्य आहे. ज्या परीक्षेला कोचिंग क्लास शिवाय पर्याय नाही. शाळेत किंवा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नियमित अभ्यास करून ही परीक्षा उत्तीर्ण होण्याची शाश्वती नाही, तर मग मुलांना कोचिंग क्लास शिवाय पर्याय राहत नाही. महात्मा गांधी यांना अपेक्षित असलेल्या तो देशातील शेवटचा (हुशारपण आर्थिक परिस्थिती नसलेला) विद्यार्थी यात टिकू शकत नसेल तर या परीक्षेवर पुनर्विचार व्हायला हवा. राज्यातील बोर्ड परीक्षेतील पन्नास टक्के गुण आणि पन्नास टक्के गुण हे त्या त्या राज्यासाठी नीटऐवजी स्वतंत्र सीईटी अशी घेतली तर कोचिंग क्लासचे महत्त्व कमी होईल.

नीट, जेईई सारख्या परीक्षांमुळे इयत्ता दहावी नंतर मुलांचा औपचारिक शिक्षणाचा संबंध फक्त कागदोपत्री उरतो. बाकी पुर्णवेळ ही मुले कोचिंग क्लासमध्येच असतात. अकरावी आणि बारावीत शिक्षण घेणारी मुले ही सोळा ते अठरा वयोगटातील असतात. कोचिंग क्लाससाठी मुले मोठ्या शहरात आई-वडील आणि कुटुंबापासून दूर राहतात. संस्कार आणि मूल्यशिक्षणासह न मिळणारे दहावीनंतरचे औपचारिक शिक्षण यामुळे या मुलांच्या सामाजिकरणाचा प्रश्न निर्माण होतो, कोचिंग क्लास ही व्यवस्था फक्त 'घोका आणि ओका' या तत्वावर काम करते. कोचिंग क्लासमध्ये कृतियुक्त शिक्षण, अकरावी आणि बारावीच्या प्रात्यक्षिकासह शिक्षण होत नाही. नीट परीक्षा येण्याच्या आधी अकरावी-बारावीच्या विज्ञान शाखेच्या प्रत्यक्षिकाना विशेष महत्त्व होते. हल्ली ते होताना दिसत नाही. त्याचा परिणाम पुढे मुलांच्या उच्च शिक्षणातही होत आहे. त्यासाठी उच्च माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयात नियमित अभ्यासक्रमाबरोबर प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन सक्तीचे करायला हवे. राजर्षी शाह महाविद्यालयाच्या 'लातूर पॅटर्न' सारख्या शिक्षणाच्या बेटांचे सार्वत्रिकीकरण व्हायला हवे तरच ग्रामीण भागातील हुशार, गरीब विद्यार्थीही या स्पर्धेत टिकू शकेल. हे सर्व उपाय आज ताबडतोब बदल घडविणारे नसले तरी शिक्षणातील मोठ्या आणि सकारात्मक बदलाकडे जाणारे ठरतील.

**डॉ.रुपेश मोरे**
मो.९०२८६८४४८

# कुलूप!

**दे**शात आज सर्वात भयानक आवाज कोणता असेल तर तो आहे सरकारी शाळांवर लागणाऱ्या कुलूपाचा. हे कुलूप फक्त इमारतींना लागलेले नाही ते गरीबांच्या भविष्याला, ग्रामीण भारताच्या स्वप्नांना आणि लोकशाहीच्या आत्म्यालाच लावले जात आहे. नीती आयोगाचा अहवाल सांगतो की, गेल्या दहा वर्षांत जवळपास एक लाख शाळा बंद झाल्या. बहुसंख्य सरकारी. म्हणजे ज्या शाळांनी शेतकऱ्यांच्या मुलाला अधिकारी बनवले, मजुराच्या मुलीला डॉक्टर बनवले, सामान्य कुटुंबातील मुलांना न्यायालय, प्रशासन आणि विज्ञान क्षेत्रात पोहोचवले. त्याच शाळा आज सरकारच्या उदासीनतेने संपवल्या जात आहेत. पण हे अपघाताने घडत नाही. ही नियोजनबद्ध हत्या आहे.

पहिल्यांदा शाळांमध्ये शिक्षक कमी भरती करा नंतर सुविधा बंद करा मग शाळांना 'निकृष्ट' ठरवा आणि शेवटी खासगी शिक्षणाच्या बाजारासाठी रस्ता मोकळा करा. आज शिक्षण हा हक्क राहिलेला नाही; तो श्रीमंतांच्या तिजोरीत बंदिस्त झालेला व्यवसाय बनला आहे. देशात स्टेडियम उभे राहतात, पुतळ्यांवर हजारो कोटी खर्च होतात, जाहिरातींवर पैशांचा पाऊस पडतो, निवडणुकांमध्ये नोटांचा महापूर वाहतो पण गावातील शाळेला शिक्षक देण्यासाठी सरकारकडे पैसा नसतो. ही आर्थिक अडचण नाही; ही मानसिक दिवाळखोरी आहे. कारण सत्तेला माहिती आहे.शिक्षित गरीब युवक प्रश्न विचारतो. तो बेरोजगारीवर बोलतो. तो भ्रष्टाचाराचा हिशोब मागतो. तो संविधान वाचतो. तो गुलामी स्वीकारत नाही. म्हणूनच शिक्षण कमकुवत करा आणि भावनिक घोषणांमध्ये समाज अडकवून ठेवा, ही नवीन राजकीय नीती बनली आहे.

आज देशात अशी परिस्थिती तयार केली गेली आहे की सामान्य बाप मुलांच्या शिक्षणासाठी कर्जबाजारी होतो. नर्सरीपासून कॉलेजपर्यंत फीचा दहशतवाद सुरू आहे. पुस्तके,गणवेश, बस फी, कोचिंग, डोनेशन शिक्षण नाही, जणू संघटित खंडणी सुरू आहे. आणि हे सगळे 'नवीन भारत'च्या चमकदार घोषणांच्या पडद्यामागे सुरू आहे. ग्रामीण भारतात परिस्थिती आणखी भयानक आहे. गावातील शाळा बंद झाली की मुलींचे शिक्षण पहिल्यांदा मरते. कारण गरीब बापाकडे रोज अनेक किलोमीटर दूर मुलगी पाठवण्याची ताकद नसते. मग सरकार 'बेटी बचाओ'चे नारे देते, पण दुसऱ्या हाताने तिच्या हातातून पुस्तक हिसकावून घेते. सरकारी शाळा म्हणजे फक्त वर्गखोल्या नव्हत्या. त्या सामाजिक समानतेचा शेवटचा किल्ला होत्या. जिथे शेतमजुराचा मुलगा आणि अधिकाऱ्याचा मुलगा एकाच बाकावर बसत होता. आज तो किल्लाच उद्ध्वस्त केला जात आहे. आता शिक्षणातही वर्गव्यवस्था निर्माण झाली आहे.



श्रीमंतांसाठी एसी क्लासरूम आणि आंतरराष्ट्रीय बोर्ड गरीबांसाठी बंद, शाळा आणि रिकामी भविष्ये. ही केवळ शिक्षणाची समस्या नाही; हा लोकशाहीवरचा थेट हल्ला आहे. कारण ज्या देशात शिक्षण बाजाराच्या हवाली होते, तिथे नागरिक निर्माण होत नाहीत.ग्राहक निर्माण होतात. तिथे विचारवंत तयार होत नाहीत.आंधळे समर्थक तयार होतात. तिथे संविधान वाचणारी पिढी संपते आणि घोषणा ओरडणारी गर्दी उरते. आज शाळांवर कुलूप लागले आहे. उद्या पुस्तकांवर लागेल आणि परवा लोकांच्या विचारांवर. त्या दिवशी देशात निवडणुका होतील कदाचित पण लोकशाहीचा आत्मा मेलेला असेल. लक्षात ठेवा देश जाहिरातींनी महान होत नाही देश महान होतो तो वर्गखोल्यांत बसलेल्या विद्यार्थ्यांनी. आणि जे सरकार शाळा वाचवू शकत नाही, ते देशाचे भविष्यही वाचवू शकत नाही.

**ॲड. धनंजय देशमुख**
मो.९२८४३८२१०२

# मानवतेची तेजस्वी ज्योत

**भा**रतीय समाजाच्या परिवर्तनाच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. परंतु या महामानवाच्या जीवनातील संघर्षमय प्रवासामागे जी एक शांत, सहनशील आणि त्यागमय शक्ती उभी होती, त्या शक्तीचे नाव म्हणजे रमाबाई आंबेडकर. संपूर्ण आंबेडकरी चळवळीत 'रमाई' या नावाला आईचे स्थान प्राप्त झाले आहे.रमाबाई आंबेडकर यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी कोकणातील दापोली तालुक्यातील वणंद या गावाचा.१९०६ मध्ये अत्यंत लहान वयात रमाबाई यांचा विवाह भीमराव आंबेडकर यांच्याशी झाला. त्या काळात बालविवाहाची प्रथा समाजात रूढ होती. विवाहाच्या वेळी भीमराव हे शिक्षण घेत होते आणि पुढे उच्च शिक्षणासाठी त्यांनी अनेक संकटांचा सामना केला. रमाईंच्या आयुष्यातील सर्वात मोठी भूमिका याच क्षणापासून सुरू झाली. बाबासाहेबांचे स्वप्न मोठे होते; ते फक्त स्वतःसाठी नव्हे तर संपूर्ण बहुजन समाजासाठी शिक्षण, न्याय आणि समानतेची लढाई लढत होते. परंतु त्या स्वप्नामागे संसाराचा भार उचलणारी, संकटांशी झुंज देणारी रमाई होती. तिने कधीही बाबासाहेबांच्या मार्गात अडथळा आणला नाही. उलट स्वतःचे दुःख बाजूला ठेवून त्यांना सतत प्रेरणा दिली.



रमाईंच्या आयुष्यातील सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे मातृत्वातील दुःख. तिच्या अनेक मुलांचा मृत्यू बालवयात झाला.रमाईंच्या व्यक्तिमत्त्वात प्रचंड साधेपणा होता. ती धार्मिक वृत्तीची होती आणि देवभक्तीवर तिचा विश्वास होता. अनेकदा बाबासाहेबांच्या आरोग्यासाठी किंवा त्यांच्या कार्याच्या यशासाठी ती उपवास करत समाजाच्या उद्धारासाठी लढणाऱ्या या महामानवाच्या मागे उभी असलेली रमाई ही खऱ्या अर्थाने त्यांची जीवनसाथी होती.रमाईंच्या आरोग्याकडे मात्र कधीच योग्य लक्ष दिले गेले नाही. सततची गरिबी, अपुरा आहार, मानसिक ताण आणि श्रम यामुळे त्यांची प्रकृती खालावत गेली. २७ मे १९३५ रोजी रमाईंचे निधन झाले. रमाई गेल्यानंतर बाबासाहेब खूप एकटे पडले. त्यांनी आपल्या 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या ग्रंथाचे समर्पण रमाईंच्या स्मृतीला केले. आज रमाईंच्या त्यागाशिवाय बाबासाहेबांचे कार्य आणि भारतीय सामाजिक क्रांतीचा इतिहास अपूर्ण राहिला असता.

**- प्रा.डॉ.शुद्धोधन कांबळे**
अमरावती.
मो.९४२१२९४४४२

## रविशंकर यांचा 'प्रज्ञा योग'

# सिक्स सेन्स जागृती की फसवणूक ?

**जगभरात खरोखर 'सिक्स सेन्स' जागृत होत असता तर त्याचा सर्वात प्रथम उत्तम लाभ अमेरिकेने घेतला असता. अमेरिका जगभरात अनेक मोहिमा राबवत असते.मानवतेला घातक असणाऱ्या अनेक अतिरेकी किंवा खलनायकाचा ती शोध घेत असते. या कामात तिने आजवर 'सिक्स सेन्स' जागृत झालेल्या कुणाचाही उपयोग का केला नाही? ज्या ओसामा बिन लादेनला शोधण्यासाठी अमेरिकेने तीन वर्ष अब्जावधी रुपये आणि मोठे मनुष्यबळ खर्च केले,त्यासाठी त्यांना एवढे करण्याची काय गरज होती? ज्यांचा सिक्स सेन्स जागृत झाला आहे अश्या पावरफुल व्यक्तींना बोलावून लादेन सध्या कुठे लपून बसला आहे याची एका जागी बसून माहिती घेतली असती आणि त्याचा खात्मा केला असता पण तसे झाले नाही हे कृपया आपण लक्षात घेतले पाहिजे.**

**आ**पल्या समाजात अध्यात्माच्या नावाखाली लोकांना कोणत्याही दिशेला घेऊन जाण्याचे आवाहन करा ,लोक मोठी गर्दी करतात असा अनुभव आहे. गेल्या काही वर्षांपासून बंगळुरू येथील ट्रिपल श्री रविशंकर यांच्या 'आर्ट ऑफ लिव्हिंग' या संस्थेचा शिक्षित वर्गात मोठा बोलबाला सुरु आहे.जगण्याची कला शिकण्याची घाई खिशात पैसा आला की शिक्षित वर्गाला होते याचे हे जिवंत उदाहरण आहे. हजारो रुपये शुल्क आकारून लोक जगण्याची कला शिकताना बघून समाज अधिक सुसंस्कृत होईल याची आपण अनेक वर्ष प्रतीक्षा करीत आहोत मात्र त्याचे परिणाम पुढे येताना दिसत नाहीत.आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार अधिक श्रीमंत झाला आणि त्याच्या शाखा झपाट्याने वाढल्या हाच एकमेव परिणाम झाल्याचे जाणवत आहे. रविशंकर हे गेल्या काही वर्षात राजकीय नेत्यांचे सेलिब्रिटी बाबा झाले आहेत. त्यांनी देशात असणाऱ्या विविध सरकार सोबत असंख्य प्रकल्प सुरु केले आहेत. राजकीय नेत्यांच्या बुद्धीवर गंज चढला की त्यांची पावले तिकडे वळतात महाराष्ट्र सरकार सुद्धा त्याला अपवाद नाही.

योग,प्राणायाम,व्यायाम,व्यक्तिमत्व विकास अशी शिबिरे घेणारे रविशंकर पुढे भजन आणि संगीताकडे वळले,त्यांच्या संस्थेमार्फत 'सुमीरन संध्या'आयोजित व्हायला लागल्या. त्यात हजारो रुपये खर्च करीत शिक्षित वर्ग स्वतःला भाग्यवान समजायला लागला. ज्यांना आपल्या प्राचीन जीवन पद्धतीचा आजिबात अभ्यास,माहिती नाही असे लोक त्यांच्या शिबिरातून परत आल्यावर रविशंकर त्यांना अलौकिक गुरु वाटायला लागतात. तुम्ही आर्ट ऑफ लिव्हिंग जॉईन केले नाही तर आयुष्यात काहीच केले नाही अश्या तुच्छतेने हे साधक इतरांना सुनावू लागले आहेत. आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराचे डोळे दिपून टाकणारे कोट्यवधींचे इव्हेन्ट आणि त्याला मिळणारा राजाश्रय बघितला तर बुवाबाजी कशी कात टाकत आधुनिक रुपडे घेऊन येते याची खात्री पटायला लागते.आणखी काही काळाने या परिवाराचे रूपांतर नव्या धार्मिक पंथात झाल्यास नवल वाटणार नाही असे अर्थकारण उभे करण्यात रविशंकर यशस्वी झाले आहेत.

हातात गडगंज पैसा आला की तो ताणतणाव हे त्याचे नातेवाईक पण सोबत घेऊन येतो,घरात,कुटुंबात निर्माण झालेले तणाव,व्यावसायिक अडचणी आणि पालक,पाल्यात निर्माण झालेला दुरावा यावर रामबाण इलाज म्हणून आर्ट ऑफ लिविंग चा प्रचार केला जातो,लोक त्याकडे वळतात.असा अनुभव आल्यावर आता या परिवाराने विद्यार्थी वर्ग टार्गेट केला आहे. त्यांच्यासाठी उन्हाळी प्रशिक्षण शिबिरे घेणे सुरु केले आहे. अशी शिबिरे घेण्यात काहीही अयोग्य नाही मात्र आपण ५ ते १८ वयोगटातील मुलांच्या मेंदूत काय टाकतो आहोत यांचा विचार त्यांनी केलेला दिसत नाही. अगोदर पालक आपल्या ताब्यात घेतल्यावर आता मुलांसाठी शिबिरे घेतली पाहिजेत म्हणजे आपोआप नव्या पिढीत आपला विचार पेरण्याची संधी मिळते हा विचार कदाचित त्यामागे असला पाहिजे. मुलांसाठी संस्कार शिबीरे घेण्याच्या नावाखाली हा परिवार आणखी एक अवैज्ञानिक प्रयोग करताना दिसत आहे. प्रज्ञा योग हे त्याचे नाव आहे.

प्रज्ञा योगाच्या नावाखाली मुलांना 'सिक्स सेन्स' जागृत करण्याचे शिक्षण दिले जाते आणि काही ट्रिक शिकवल्या जातात. पुढे ही मुले डोळ्यावर पट्टी बांधून चित्र काढायला लागतात,काही गोष्टी ओळखायला लागतात, थोडक्यात जे उघड्या डोळ्यांनी होऊ शकते ते ही मुले डोळ्यावर पट्टी बांधून करू शकतात,यालाच प्रज्ञा योग असे म्हटले जाते. सध्या देशभरात अशी शिबिरे सुरु आहेत. सप्तखंजेरी वादक सत्यपाल महाराज जाहीरपणे असे प्रयोग त्यांच्या कार्यक्रमातून करून दाखवत असतात. डोळ्यावर काळी पट्टी बांधून महाराज तर शहरात मोटार सायकल पण चालवून दाखवत असतात. हे केल्यावर मात्र यातील बदमाशी ते लोकांना उलगडून दाखवत असतात इथे मात्र असे काहीही होत नाही. जी मुले डोळ्यावर पट्टी बांधून चित्र काढतात,किंवा काही वस्तू ओळखतात त्यांना स्वतःला भ्रम होऊन जणू काही आपला सिक्स सेन्स जागृत झाला आहे त्याद्वारे आपण हे सगळे करीत आहोत असे त्यांना वाटते.



शिबीराच्या शेवटच्या दिवशी त्याचे प्रात्यक्षिक केले जाते,मुलांचे आईवडील उपस्थित असतात,आपल्या मुलांचे हे अद्भुत सामर्थ्य बघून त्यांनाही मुलाचे सहावे इंद्रिय जागे झाल्याची खात्री पटायला लागते. इथे प्रश्न असा निर्माण होतो की आपण कुणाला आणि का फसवत आहोत? मुळात सहावे इंद्रिय जागृत करणे याला कोणताही वैज्ञानिक आधार नाही. मुळात ही पाश्चात्य कल्पना आहे. भारतीय अध्यात्मात हीच कल्पना वेगळ्या पद्धतीने आली आहे. मानवाच्या शरीरात मुळातच असे कोणतेही सहावे इंद्रिय नसते. भारतीय अध्यात्मात त्यासाठी प्रचंड विधी आणि साधना सांगितल्या आहेत. तुमचे सहावे निद्रिय जागृत होणे म्हणजे तुम्हाला भूत,वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञान प्राप्त होणे आहे. थोडक्यात अश्या व्यक्तीला अंतर्ज्ञान प्राप्त होते म्हणजे उद्या या जगात काय हडणार आहे त्याची आधीच त्याला माहिती होते असे मानले जाते. रविशंकर याना चिकित्सक विद्यार्थी पिढी घडवायची आहे की अद्यात्मिक साधकांची टोळी तयार करायची आहे? मुले कौतुक आणि स्तुतिप्रिय असतात. या शिबिरातून ज्यांना डोळ्यावर पट्टी बांधून वस्तू ओखण्याची ट्रिक माहित झाली की त्या मुलांचे समाजात,कुटुंबात,मित्रात मोठे कौतुक केले जाते,त्यामुळे आपण जे करीत आहोत ती कला कुणालाही शक्य होते ही जाणीव त्यांना राहत नाही. पालकांना सुद्धा मुलांचे सहावे इंद्रिय जागृत झाल्याचा भ्रम होतो. वास्तविक या प्रक्रियेत मुले स्वतःची आणि समाजाची न कळत फसवणूक करीत असतात. त्यांना वेळीच वैज्ञानिक माहिती देत हे थांबवले नाही तर ही मुले कायमस्वरूपी भ्रमाच्या आहारी जाण्याचा मोठा धोका असतो. आर्ट ऑफ लिन्व्हींग परिवार अश्या शिबिरात इतर सगळ्या चांगल्या गोष्टी शिकवत असतील तर ही बुवाबाजी मुलांच्या डोक्यात का टाकली जाते याचा विचार सुज्ञ पालकांनी केला पाहिजे. या जगात आपोआप मिळेल असे काहीही नसते,अलौकिक ज्ञान किंवा अंतर्ज्ञान असे काहीही नसते. प्रत्येक गोष्ट मोठ्या मेहनतीने प्राप्त करावी लागते. कठोर परिश्रमाला पर्याय नाही हे त्यांच्या मेंदूत पेरण्याचा काळात आपण काय पेरत आहोत?

जगभरात खरोखर 'सिक्स सेन्स' जागृत होत असता तर त्याचा सर्वात प्रथम उत्तम लाभ अमेरिकेने घेतला असता. अमेरिका जगभरात अनेक मोहिमा राबवत असते. मानवतेला घातक असणाऱ्या अनेक अतिरेकी किंवा खलनायकाचा ती शोध घेत असते. या कामात तिने आजवर 'सिक्स सेन्स' जागृत झालेल्या कुणाचाही उपयोग का केले नाही? ज्या ओसामा बिन लादेनला शोधण्यासाठी अमेरिकेने तीन वर्ष अब्जावधी रुपये आणि मोठे मनुष्यबळ खर्च केले ,त्यासाठी त्यांना एवढे करण्याची काय गरज होती? ज्यांचा सिक्स सेन्स जागृत झाला आहे अश्या पावरफुल व्यक्तींना बोलावून लादेन सध्या कुठे लपून बसला आहे याची एका जागी बसून माहिती घेतली असती आणि त्याचा खात्मा केला असता पण तसे झाले नाही हे कृपया आपण लक्षात घेतले पाहिजे. अलीकडे इराणचे राष्ट्रप्रमुख त्यांनी मारल्यावर नवीन राष्ट्रप्रमुख कुठे लपून बसले आहेत यासाठी अमेरिका जगभरातील गुप्तहेरांची मदत घेत आहेत. त्यांना एवढ्या वर्षात एखादा सुद्धा व्यक्ती भेटू नये की ज्याचे सहावे इंद्रिय जागे झालेले आहे?

सर्वात याचे वाईट वाटते की ज्या राजकीय नेत्यांवर वैधानिक जबाबदारी असते त्यांनी तरी किमान या थोतांडाला बळी पडू नये आणि त्याचे समर्थन तरी करू नये. आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नुकतेच रविशंकर यांच्या बंगळुरू आश्रमात जाऊन आले त्यांच्या जाण्याला कुणाचा आक्षेप नाही कारण राजकीय नेत्यांना लाखो अनुयायी असणाऱ्या बाबांकडे जावे लागते मात्र हे करताना 'कथित प्रज्ञा योगाचे' समर्थन तरी करू नये. आपल्या देशाच्या घटनेत प्रत्येक नागरिकांवर वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसाराची जबाबदारी घटनाकारांनी दिली आहे. तुम्ही तर वैधानिक पदावर बसलेले आहात मग तुमची जास्त जबाबदारी नाही का? त्यांचा राजकीय उपयोग घ्या,प्रसंगी बागेश्वर सारखी पाद्यपूजा पण करा मात्र समाजातील हजारो पिढयांना अंधश्रद्धेच्या खाईत ढकलू नका एकढेच त्यांना आवाहन आहे.

**पुरूषोत्तम आवारे पाटील**
मो.९८९२१६२२४८

# ...थोडक्यात...

## पुढील २ दिवस उष्णतेच्या लाटेची शक्यता

**अकोला :** जिल्ह्यात २६ ते २८ मे दरम्यान उष्णतेची लाट राहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. त्यानुसार नागरिकांसाठी जिल्हा प्रशासनातर्फे मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.ष्दु. १२ ते ४ दरम्यान उन्हात बाहेर जाणे टाळा. बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळा. उन्हात वाहने शक्यतो चालवू नये. ज्वलनशील पदार्थापासून दूर राहावे. लहान मुले व पाळीव प्राण्यांना दरवाजा बंद असलेल्या वाहनात किंवा पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. तहान असो किंवा नसो; भरपूर पाणी प्यावे. अशक्तपणा, स्थुलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम आदी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. पशुधनास तसेच पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे, तसेच पुरेसे पिण्याचे पाणी देण्यात यावे, आदी दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पीएम इंटर्नशीप योजनेत 'महिंद्रा ॲण्ड महिंद्रा' मध्ये प्रशिक्षण

**अकोला :** कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयामार्फत प्रधानमंत्री इंटर्नशीप योजना राबविण्यात येत आहे. भारतातील पहिल्या ५०० नामांकित कंपन्यामध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव देऊन त्यांचे कौशल्य विकसित करणे हा त्याचा उद्देश आहे. अकोला जिल्ह्यातील उमेदवारांना संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, अकोला या कार्यालयाच्या वतीने पं. दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे (प्लेसमेंट ड्राईव्ह) आयोजन दि. २९ मे २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, २ रा माळा, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला येथे केले आहे.

रोजगार मेळाव्यामध्ये महिंद्रा ॲण्ड महिंद्रा चाकण (पुणे) या नामांकित कंपनीने त्यांच्याकडील प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना (पीएमआयएस) अंतर्गत प्रशिक्षण संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या मेळावाद्वारे महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी प्रतिनिधीद्वारे गरजू व रोजगार इच्छुक उमेदवाराच्या ऑनलाईन मुलाखती घेण्यात येऊन त्यांची प्राथमिक निवड करण्यात येऊन नामांकित कंपनीमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी या मेळाव्याद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## आज माहेश्वरी भवनात बालकांचे रामरक्षा स्त्रोत वाचन



**अकोला :** जीवनात येणारे सुख- दुख हे आपल्या कर्माच्या परिपाकाने आपणास प्राप्त होते. हे सुख व दुख प्रत्येक जीवाला भोगावेच लागते. त्यात बदल कोणालाही करणे शक्य नाही, अगदी संतही आपले प्रारब्ध बदलू शकत नाहीत. जग नियंत्याची अशी रचनाच या संदर्भात असून जीवनात दुःखे येतात त्याला दूर करण्याचे कोणतेही साधन अस्तित्वात नाही.तथापी संतांच्या माध्यमातून ते कमी होऊ शकते, मात्र समाप्त होऊ शकत नाही. नशिबाचे प्रारब्ध हे भोगावेच लागते. यात उत्तम मार्ग म्हणजे चांगले कर्म करून भगवंत प्राप्ती हा एकमेव उपाय व इलाज आहे. सत्संगाने येणारी दुखे ही कष्टनाशक होतात. म्हणून सुखी जीवनासाठी उत्तम कर्म व सत्संगाची कास धरणे आवश्यक असल्याचा हितोपदेश वृंदावन निवासी आंतरराष्ट्रीय भागवत कथाकार पू राजेशकृष्णजी महाराज यांनी केला.

**Change In Name**
I Have Change
My Name From
**MOHAMMAD ZAKIR MOHAMMAD YOUSUF**
- TO -
**MOHAMMAD ZAKIR MOHAMMAD YUSUF**
My original DOB is - 10/08/1983 Passport No- N6210706
My Residential Address is --Near lucky kirana, Shastri Nagar Khadan, Akola Maharashtra 444001

**Change In Name**
I Have Change
My Name From
**SAURABH TULSHIDAS RAUT**
-TO-
**SAURABH TULASHIDAS RAUT**
My Residential Address is Wankhade nagar Dabki road Akola 444002

**Change In Name**
I Have Change
My Name From
**MOHINI RIJUMAL SOMWANI**
- TO -
**SARITA RAJKUMAR KALYANI**
My Residential Address is -- BEHIND SANT KANWARRAM STATUE, SINDHI CAMP, PAKKI KHOLI, AKOLA MAHARASHTRA 444004

**Change In Name**
I Have Change
My Name From
**HEMA RAJKUMAR KALYANI**
- TO -
**RIYA HARISH GOSWAMI**
DOB- 02/06/1987
My Residential Address is -SINDHI CAMP, PAKKI KHOLI, SANT KAVARAM PUTLE KE PASS, AKOLA MAHARASHTRA 444001

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# श्री रुपनाथ महाराज संस्थानास 'ब' वर्ग दर्जा द्यावा

## आ. रणधीर सावरकरांची ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे आग्रही मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री रुपनाथ महाराज संस्थान, दहिहंडा ता. अकोट, जि. अकोला या संस्थानास शासनाकडून 'ब' वर्ग दर्जा प्रदान करण्यात यावा, अशी आग्रही मागणी आमदार रणधीर सावरकर यांनी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे.

यावाबतचा प्रस्ताव आवश्यक व परिपूर्ण दस्ताऐवजांसह ग्रामविकास विभागाच्या सहसचिव (योजना-११), महाराष्ट्र शासन, बांधकाम भवन, मुंबई येथे सादर



करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली. या प्रस्तावाला तातडीने मंजुरी देऊन संस्थानास 'ब' वर्ग दर्जा प्रदान करण्यात यावा, अशी मागणी आमदार सावरकर यांनी केली आहे.

श्री रुपनाथ महाराज संस्थान हे राज्यातील लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान मानले जाते. दरवर्षी राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येथे येत असतात. भाविकांना आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्थानाचा विकास होणे गरजेचे असल्याचे आमदार सावरकर यांनी नमूद केले.

दरम्यान, श्री संत रूपनाथ महाराज संस्थान, दहीहांडा ता. अकोटच्या विकासासाठी तीर्थक्षेत्र पर्यटन विकास योजनेंतर्गत २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. आमदार रणधीर सावरकर यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या या विकासकामांपैकी सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

# अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नवनियुक्त अध्यक्षांचा पदग्रहण सोहळा आज




■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नवनियुक्त अध्यक्षांच्या पदग्रहण सोहळ्याचे आयोजन आज बुधवार, दि. २७ मे रोजी करण्यात आले आहे. हा सोहळा सायंकाळी ४ वाजता स्वराज्य भवन, अकोला येथे उत्साहात पार पडणार आहे.

या सोहळ्यात अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्त झालेले प्रकाश तायडे तसेच अकोला शहर काँग्रेस कमिटीच्या शहराध्यक्षपदी नियुक्त झालेले महेंद्र गवई पदभार स्वीकारणार आहेत. कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आ. साजिद खान पठाण यांच्यासह सर्व वरिष्ठ माजी पदाधिकारी, विविध आघाड्यांचे कार्यकर्ते तसेच जिल्हाभरातील काँग्रेस समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

या पदग्रहण सोहळ्यानिमित्त काँग्रेस पक्षामध्ये नवचैतन्य निर्माण होणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणीला अधिक गती मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. कार्यक्रमासाठी ब्लॉक अध्यक्ष, तालुका अध्यक्ष, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, अल्पसंख्याक काँग्रेस, अनुसूचित जाती काँग्रेस, सेवादल काँग्रेस तसेच विविध सेल व विभागांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचे सौंदर्यीकरण करून 'भीम सृष्टी' ची निर्मिती करा

## वंचित बहुजन आघाडीची तेल्हारा पालिकेकडे मागणी



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान हे शहरातील नागरिक, युवक, विद्यार्थी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्थान आहे. मात्र सद्यस्थितीत उद्यानामध्ये आवश्यक त्या सुविधा, आकर्षक सौंदर्यीकरण व ऐतिहासिक माहितीचा अभाव दिसून येत आहे. त्यामुळे या उद्यानाचे सर्वांगीण विकासकाम करून त्या ठिकाणी 'भीम सृष्टी' उभारण्यात यावी, अशी मागणी तेल्हारा तालुका व शहर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तेल्हारा पालिकेच्या अध्यक्षा व मुख्याधिकारी यांच्या कडे निवेदन देऊन करण्यात आली.

उद्यान परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित माहिती फलक, संविधान प्रेरणा स्थळ, आकर्षक विद्युत रोषणाई, बैठकीची व्यवस्था, हिरवळ, कारंजे, वाचन कट्टा, मुलांसाठी खेळ साहित्य तसेच समाजप्रबोधन करणारी शिल्पे उभारण्यात यावीत. यामुळे शहरातील युवकांना संविधान, सामाजिक समता व शिक्षणाची प्रेरणा मिळण्यास मोठी मदत होईल.

# तलाठी कार्यालयाच्या बांधकामावर प्रश्नचिन्ह

## सावरगाव-उमरा येथील प्रकार; अंदाजपत्रक फलक नसल्याने ग्रामस्थांमध्ये संभ्रम

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सावरगाव-उमरा येथे सुरू असलेल्या तलाठी कार्यालयाच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सुरू असलेल्या या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे शासन नियमानुसार विकासकामाच्या ठिकाणी अंदाजपत्रकाचा फलक लावणे बंधनकारक असताना, येथे अद्याप असा कोणताही फलक लावण्यात आलेला नसल्याने ग्रामस्थांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कामाची एकूण किंमत किती, निधी कोणत्या विभागामार्फत मंजूर झाला, कामाची मुदत किती आहे



याबाबत कोणतीही माहिती नागरिकांना उपलब्ध नसल्याने पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, बांधकामस्थळी संबंधित अभियंता किंवा वरिष्ठ अधिकारी पाहणीसाठी येत नसल्याने संपूर्ण काम सुपरवायझरच्या भरोशावर सुरू आहे. बांधकामादरम्यान आवश्यक प्रमाणात पाणी मारले जात नसल्याने इमारतीच्या मजबुतीबाबतही शंका व्यक्त होत आहे. यामुळे भविष्यात इमारतीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली. सावरगाव-उमरा हे गाव अतिदुर्गम भागात येत असल्याने अधिकारी व अभियंते नियमित भेट देत नसल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

दरम्यान, कंत्राटदाराकडून मनमानी पद्धतीने थातूरमातूर काम सुरू असल्याचे चित्र दिसून येत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. संबंधित विभागाने तातडीने कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### अभियंते फिरकेना; लाखोंच्या निधीवर प्रश्न

सावरगाव-उमरा येथे स्वतंत्र तलाठी कार्यालय नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. ही अडचण दूर करण्यासाठी शासनाने लाखो रुपयांचा निधी उपलब्ध करून तलाठी कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम मंजूर केले. मात्र, कामाच्या दर्जाबाबत निर्माण झालेल्या शंकांमुळे शासनाच्या निधीची उधळपट्टी होत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. अभियंते व संबंधित अधिकारी नियमित पाहणी करत नसल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत संशय अधिक गडद झाला आहे.

# रविवारी मुंडगाव येथे 'मेंदूची वारी आली आपल्या दारी' मोफत वैद्यकीय शिबीर

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिय सेवाभावी स्व.मोहनलाल लालचंद विरवाणी फाउंडेशनच्या वतीने 'मेंदूची वारी आली आपल्या दारी' या मेंदू, स्पाईन व अस्थी रुग्णांच्या मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.रविवार दि ३१ मे रोजी सकाळी ११ वाजता अकोट तालुक्यातील संत गजानन महाराज पादुका संस्थान, मुंडगाव येथे हे मेंदू, स्पाईन व अस्थी रुग्ण तपासणी शिबिर होणार आहे.या शिबिरात महानगरातील जेष्ठ मेंदू विकार तज्ञ डॉ नितीन विरवानी, ब्रेन व स्पाईन सर्जन डॉ आलोक सारडा व अस्थी रोग तज्ञ डॉ यश धनवानी हे रुग्ण तपासणी करणार आहेत.या शिबिरात डॉ विरवानी हे डोकेदुखी, अर्धशिशी, मिरगी, अपस्मार, फिट, स्मृतीभ्रंश, अधार्गवायूचा आजार, चक्कर येणे, तोल जाणे,



मेंदूज्वर, कंपवात, डोळ्यांना दोन दोन दिसणे, डोळ्यात रक्तस्त्राव, चेहऱ्यावर शॉक लागण्यासारखे होणे, झोप न येणे आदी मेंदूंचे आजार तथा डॉ सारडा हे स्पाइन प्रकारात बाल मस्तिक शस्त्रक्रिया, मेंदू व मणक्याची शस्त्रक्रिया मेंदू व मणक्याचे ट्यूमर गाठी कर्करोग गाठ मेंदूत रक्तस्त्राव दातखिळी, फिट, ट्रायजेमिनल न्यूरलमिया, पेरीफेरल नर्व सर्जरी तथा डॉ धनवाणी हे गुडघेदुखी गुडघ्याच्या आस्टिओ अर्थराइटिस, मेनिसकस दुखापत, गोठलेले खांदे खांद्याची दुखापत, खांदे सटकणे आदींची तपासणी करण्यात येणार आहे.

# डेंग्यूसदृश परिस्थिती; सावरगाव ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

## १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या खर्चाची चौकशी करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सावरगाव ग्रामपंचायतीत विकासकामांपेक्षा अनागोंदी कारभाराला प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप समोर आला आहे. १५ व्या वित्त आयोगातून २०२० ते २०२६ या कालावधीत ग्रामपंचायतीला मिळालेल्या सुमारे ९० लाख रुपयांच्या निधीच्या खर्चाबाबत सखोल चौकशी करावी, अशी मागणी माजी ग्रामपंचायत सदस्य जानू बाबूसिंग राठोड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारीतून केली आहे.

तक्रारीनुसार, सावरगाव ग्रामपंचायतीला १५ व्या वित्त आयोगातून ८८ लाख ६२ हजार



रुपयांचा निधी मंजूर झाला होता. व्याजासह ही रक्कम ९० लाख ३५ हजार ४९ रुपयांपर्यंत पोहोचली आहे. मात्र, एवढा निधी उपलब्ध होऊनही गावात मूलभूत सुविधांचा अभाव कायम असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

सन २०२४ मध्ये ग्रामपंचायत कार्यालयावरील टीनपत्रे उडाल्यानंतर आजपर्यंत ग्रामपंचायतीचा कारभार अन्य ठिकाणावरून सुरू असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी पद्धतीने निर्णय घेतले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

निधीच्या वापराबाबत वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. तसेच विस्तार अधिकारी अनंत लव्हाळे हे सरपंच व सचिवांना पाठबळ देत असल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण निधी खर्चाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला

गावात स्वच्छतेचा अभाव, साचलेले पाणी आणि अपुऱ्या सुविधा यामुळे सावरगावात डेंग्यूसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्याचा दावा होत असला तरी प्रत्यक्षात ग्रामस्थांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र आहे.

वेळेत उपाययोजना न झाल्यास गंभीर संसर्गजन्य आजार फैलावण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली असून, प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## मुर्तिजापूर नगर परिषदेत २५ विभागांचे स्टॉल; विविध योजनांचे लाभ वितरण

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत मुर्तिजापूर तालुक्यातील आठवे शिबीर मंगळवारी नगर परिषद कार्यालयात उत्साहात पार पडले. नागरिकांच्या विविध महसुली व शासकीय समस्यांचे एकाच ठिकाणी निराकरण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे आणि मुख्याधिकारी निलेश जाधव यांनी शिबिराचे आयोजन केले होते. आमदार हरीश मारोतीआप्पा पिंपळे यांनी शिबिराला भेट देऊन समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष हर्षल साबळे होते. यावेळी सोनल काळबांडे, शालिनी हजारे, गजानन नाकट, भूपेंद्र पिंपळे, तसवरखान तस्लीमखान, निजामुद्दीन इस्लामुद्दीन, अब्दुल बाकी, लखन मिलांदे यांच्यासह नगरसेवक,



समाजसेवक व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शिबिरात महसूल, पुरवठा, महिला व बालविकास, आरोग्य, महावितरण, परिवहन महामंडळ, कृषी, भूमी अभिलेख, सेतू केंद्र, आधार सेवा, नगर परिषद, तक्रार निवारण कक्ष आदी विभागांचे तब्बल २५ स्टॉल उभारण्यात आले होते. नागरिकांना ई-फेरफार, ई-मोजणी, अभिलेख दुरुस्ती, प्रमाणपत्र वितरण तसेच विविध योजनांबाबत मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी पीएम स्वनिधी योजनेंतर्गत १० पथविक्रेत्यांना कर्ज मंजुरी आदेश वितरित करण्यात आले. तसेच चार बचत गटांना राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत सहा लाख रुपयांपर्यंतच्या कर्ज मंजुरीचे आदेश देण्यात आले. नगर परिषदेमार्फत जन्म दाखल्यांचेही वितरण करण्यात आले.

उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी विविध विभागांच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेत तक्रारींचा तातडीने निपटारा करण्याच्या सूचना संबंधित विभाग प्रमुखांना दिल्या. मान्यवरांनी विविध स्टॉलला भेट देत योजनांची माहिती जाणून घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश भुगूल यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याधिकारी निलेश जाधव यांनी मानले. शिबिराच्या यशस्वितेसाठी तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. नागरिकांनी आगामी समाधान शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार शिल्पा बोबडे यांनी केले.

# तहानलेल्या गावाच्या नावावर 'गाळ' गिळला!

## बांबरडा ग्रामपंचायतीचा संशयास्पद कारभार उघड; सार्वजनिक नळ योजनेऐवजी कोरड्या विहिरीत 'गाळ उपशाचे नाटक'

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील बांबरडा ग्रामपंचायतीत सार्वजनिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या नावाखाली मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचा संशय व्यक्त होत असून, ग्रामपंचायतीच्या कारभारावर संतप्त ग्रामस्थांनी थेट बोट ठेवले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विहिरीचा गाळ उपसा करण्यासाठी दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेला निधी कागदोपत्री खर्च दाखवण्यात आला; मात्र प्रत्यक्षात त्या विहिरीला हातही लावला नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. धक्कादायक म्हणजे, माहिती अधिकारातून कागदपत्रे बाहेर येताच ग्रामपंचायतीने घाईघाईने गावातील कोरड्या व वापरात नसलेल्या विहिरीचा गाळ उपसा सुरू केल्याने संशय अधिकच गडद झाला आहे.

गावातील नागरिकांच्या मते, सार्वजनिक नळ योजनेची जी विहीर गावाला पाणीपुरवठा करते, त्या विहिरीत गेल्या अनेक महिन्यांपासून गाळ साचलेला होता. पाणीटंचाईच्या समस्येवर उपाय म्हणून शासनाने गाळ उपशासाठी निधी मंजूर केला होता.

मात्र प्रत्यक्षात काम न करता फक्त कागदांवरच काम पूर्ण झाल्याचे दाखवून निधीची उडवणूक करण्यात आल्याचा गंभीर आरोप आता उघडपणे होऊ लागला आहे.दरम्यान, काही जागरूक ग्रामस्थांनी माहिती अधिकाराचा आधार घेत संबंधित कागदपत्रांची मागणी केली. त्यानंतर ग्रामपंचायत प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली. माहिती बाहेर येण्याची चाहूल लागताच अचानक कोरड्या विहिरीवर जेसीबी आणि मजूर



पोहोचले. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ही विहीर सार्वजनिक नळ योजनेशी संबंधितच नसताना तिचा गाळ उपसा करून काम सुरू आहे असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.या संपूर्ण प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. पिण्याच्या पाण्यासारख्या जीवनावश्यक योजनेतही भ्रष्टाचाराची कीड शिरली असेल, तर सामान्य माणसाने कोणावर विश्वास ठेवायचा?' असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. ग्रामपंचायतीतील काही पदाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमतातून हा प्रकार घडल्याचा आरोपही पुढे येत आहे.

ग्रामस्थांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून, मंजूर निधी नेमका कुठे खर्च झाला, मोजमाप पुस्तके, तांत्रिक मान्यता, बिलांची देयके, कामाचे फोटो आणि संबंधित सर्व कागदपत्रांची कसून तपासणी व्हावी, अशी मागणी केली आहे. दोषी आढळणाऱ्या अधिकारी व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे. माजी सरपंच लता कडताई, सुचिता धंडाळे आणि भाग्यश्री चेले यांनी जिल्हा प्रशासनाकडे निवेदन देत या गंभीर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर आणण्याची मागणी केली आहे. आता प्रशासन या गाळाच्या खेळा'मागचे खरे चेहरे उघडे पाडते की प्रकरणावर माती टाकते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# सावरकर जयंतीनिमित्त विचारांचा जागर

## डॉ.प्रा.शुभा साठे यांचे व्याख्यान; समाजसेवारत्न सन्मानाने नितीन पजई गौरविणार

**वर्धा/जनमाध्यम**

विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर सामाजिक सेवा समिती तर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक डॉ, शोभा साठे यांचे 'त्या तिघी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.



या कार्यक्रमात यंदाचा 'स्वातंत्र्यवीर सावरकर सामाजिक सेवारत्न' सन्मान अमरावती विभागातील समाजसेवक आणि रक्तदान चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते नितीन मोहन पजई यांना प्रदान करण्यात येणार आहे. रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून समाजात मोलाचे योगदान दिल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या विदर्भस्तरीय निबंध स्पर्धेतील विजेत्यांनाही यावेळी पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. नागपूरच्या अश्विनी कुलकर्णी, डॉ. प्रज्ञा प्रकाश पुसदकर आणि वर्ध्याच्या सरिता आगवन यांनी स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.यावर्षीचा ज्येष्ठ नागरिक सन्मान मेजर शशिकांत देशपांडे यांना प्रदान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक जेठानंद राजपूत राहणार आहेत.

तसेच समितीचे उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र बोरकर, लोकतंत्र सेनानी जिल्हाध्यक्ष हरिभाऊ वझुरकर आणि सार्वजनिक वाचनालयाचे सचिव गौरीशंकर टीबडिवाल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.हा समारंभ २८ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता सत्यनारायण बजाज सार्वजनिक ग्रंथालय येथे होणार असून, नगरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष प्रा. श्याम देशपांडे आणि सचिव रवीभाऊ सातदेवे यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

**कारंजा (घा.)-** सततची आर्थिक विवंचना आणि कर्जाच्या तणावातून तालुक्यातील जऊरवाडा येथील शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. ओंकार मोतीराम जुक्सेनिया (५५) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांनी शेतातील झाडाला गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, ओंकार जुक्सेनिया हे मागील काही दिवसांपासून आर्थिक अडचणीत होते. शेतीतील नुकसान आणि कर्जाच्या वाढत्या बोजामुळे ते मानसिक तणावात असल्याची चर्चा गावात आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. कारंजा पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

### झडशी येथे व्यक्तीचा संशयास्पद मृत्यू

**सेलू-** तालुक्यातील झडशी येथे एका व्यक्तीचा मृतदेह प्राथमिक शाळेच्या व्हऱ्हाड्यात आढळून आल्याने गावात खळबळ उडाली. अशोक दादाजी चौधरी (६२) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. गावात एकटे राहणारे अशोक चौधरी यांची पत्नी व मुलगा अन्य गावात वास्तव्यास असल्याची माहिती आहे. परिसरात दुर्गंधी पसरल्याने नागरिकांनी शाळेच्या व्हऱ्हाड्यात जाऊन पाहणी केली असता त्यांचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर तातडीने पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. सध्या जिल्ह्यात वाढलेल्या तीव्र उष्णतेमुळे उष्माघाताने मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना

**वर्धा-** ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळ देणारी व पशुपालन व्यवसायाला उद्योजकतेचे आधुनिक स्वरूप देणारी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' अत्यंत पारदर्शक पद्धतीने राबविण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्यावतीने महाआयटीकडून 'महाडीबीटी' पोर्टलवर अर्ज प्राप्त करुन घेण्याची सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. या योजनेचा लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. राज्यातील पशुसंवर्धन व्यवसायाला नवीन दिशा देण्यासाठी व ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील उद्योजकतेला चालना देणारी ही योजना राज्याच्या आर्थिक विकासात भरीव योगदान देणारी ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर योजनेची अंमलबजावणी वेळेवर व पारदर्शकपणे व्हावी, यासाठी पशुसंवर्धन विभागाने सूक्ष्म नियोजन सुरू केले आहे. महाडीबीटी पोर्टलद्वारे अर्ज प्रक्रिया लाभार्थ्यांना घरातूनच सहज करता यावी यासाठी महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.यासाठी महाआयटीकडे विशेष पोर्टल निर्मितीचे काम सोपविण्यात आले आहे. महाआयटीची तांत्रिक टीम हे पोर्टल लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी युद्धपातळीवर काम करत आहे.

# डिझेलसाठी शेतकऱ्यांची फरफट थांबवा

## ट्रॅक्टरसाठी कॅनमध्ये ४० लिटर डिझेल द्या; खा.अमर काळेंची प्रशासनाकडे मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

पेट्रोल-डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना केवळ डिझेल भरण्यासाठी १० ते २० किलोमीटरपर्यंत ट्रॅक्टर चालवत पेट्रोलपंपावर जावे लागत असल्याने त्यांचा अतिरिक्त खर्च आणि डिझेलचा अपव्यय होत आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता शेतकऱ्यांना दररोज ट्रॅक्टरसाठी ४० लिटर डिझेल कॅन किंवा डब्यामध्ये उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी खा, अमर काळे यांनी अमरावती आणि वर्धा जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

सध्या शेती मशागतीचा हंगाम सुरू असून ग्रामीण



भागातील शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. अनेक गावांमध्ये पेट्रोलपंप दूर अंतरावर असल्याने शेतकऱ्यांना शेतीची कामे थांबवून ट्रॅक्टर घेऊन डिझेलसाठी जावे लागत आहे.

त्यामुळे डिझेलचा अतिरिक्त खर्च तर होतच आहे, शिवाय आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत असल्याचे खासदार काळे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.शेतकऱ्यांना सातबारा किंवा इतर आवश्यक कागदपत्रांच्या आधारे ओळख पटवून प्रतिदिन किमान ४० लिटर डिझेल कॅनमध्ये देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि इंधनाची बचत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, समाजमाध्यमांवर पेट्रोल-डिझेल तुटवड्याबाबत विविध चर्चा सुरू असल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आव्हानही प्रशासनासमोर निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पेट्रोलपंपांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवावी तसेच पोलीस प्रशासनाने नियमित गस्त वाढवावी, अशी सूचनाही खासदार काळे यांनी केली आहे.

शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा आणि जिल्ह्यातील सर्व पेट्रोलपंप चालकांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी अपेक्षाही खासदार अमर काळे यांनी व्यक्त केली आहे.

# बुद्ध-भीम गीतांच्या तालावर उमलली नव्या पिढीची स्वप्ने

## जयभीम धम्मशाळेच्या नृत्य स्पर्धेत युवराज सडमाके ठरला प्रथम



**वर्धा/जनमाध्यम**

महापुरुषांचे विचार, संस्कार आणि कलेची जोड मिळाल्यास विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते, याची प्रचिती सिंधी मेघे येथील जय भीम बुद्ध विहार येथे आयोजित बुद्धभीम गीतांवर आधारित नृत्य स्पर्धेत पाहायला मिळाली. जयभीम धम्मशाळेच्या वतीने आयोजित या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत युवराज सडमाके याने प्रथम क्रमांक पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

गेल्या वर्षभरापासून जयभीम धम्मशाळेमार्फत विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, आत्मविश्वास आणि कलागुण विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच उपक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांमधील मंचावरील भीती दूर व्हावी आणि त्यांना आपली कला सादर करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.भरगच्च प्रेक्षकांच्या उपस्थितीत ३१ स्पर्धकांनी बुद्ध-भीम गीतांवर आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेत कल्याणी खडसे आणि डॉली डफ यांनी संयुक्तपणे द्वितीय क्रमांक मिळवला, तर स्वराज मेंढे याने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. हे पुरस्कार स्मृतीशेष उमेश मेश्राम यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रमेश मेश्राम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.स्पर्धेचे परीक्षण प्रसिद्ध कोरिओग्राफर वृषभ काळबांडे आणि रागिनी ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रयासी डंभारे यांनी केले, तर प्रा. राजेश डंभारे यांनी आभार प्रदर्शन केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष सिद्धार्थ मून यांच्यासह जयभीम बुद्ध विहाराच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या डोळ्यातील समाधान या उपक्रमाचे खरे यश ठरले.

# दिखाव्याच्या लग्नांना लगाम हवा

## सामुदायिक विवाहातून लाखोंची बचत शक्य-आरती कारंजेकर

**गौळ/जनमाध्यम**

वाढत्या महागाईच्या काळात खर्चिक विवाहसोहळ्यांमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडत असून, समाजाने पुन्हा सामुदायिक विवाह सोहळ्यांकडे वळण्याची गरज आहे, असे मत आरती कारंजेकर यांनी व्यक्त केले. गिताई बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्थेच्या वतीने आयोजित ज्येष्ठ नागरिक कार्यक्रमात त्या बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ, मनोज भांगे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून योगेश कांबळे उपस्थित होते. यावेळी बोलताना आरती कारंजेकर यांनी आजच्या विवाहसोहळ्यांतील वाढत्या दिखावूपणावर चिंता व्यक्त केली.त्या म्हणाल्या, कोरोनाच्या काळात अत्यंत मर्यादित उपस्थितीत आणि कमी खर्चात विवाहसोहळे पार पडले. ना मोठा गाजावाजा, ना रोषणाई, ना महागडे छायाचित्रण; तरीही कुटुंबे



समाधानी होती. त्या काळात अनेक सामान्य कुटुंबांनी कर्ज टाळून साधेपणाने विवाह उरकले. मात्र आता पुन्हा विवाहांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिखाव्याची स्पर्धा सुरू झाली आहे.ग्रामीण भागातही आता डीजे, विद्युत रोषणाई, मोठे पडदे, ड्रोन कॅमेरे आणि भव्य सजावटीचा वापर वाढला आहे. परिणामी वधू-वर पक्षावर मोठा आर्थिक भार पडत आहे. वाढत्या महागाईमुळे सोने-चांदी, विवाह साहित्य आणि इतर खर्च गगनाला भिडले आहेत. अशा परिस्थितीत शेतमजूर आणि सर्वसामान्य कुटुंबांना मुला-मुलींच्या विवाहासाठी कर्ज काढावे लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.पूर्वी ग्रामीण भागातील विवाह साध्या आणि पारंपरिक पद्धतीने पार पडत होते. मात्र आता शहरी थाटामाटाची संस्कृती गावागावात पोहोचल्याने सामाजिक स्पर्धा वाढली आहे. समाजाने पुन्हा सामुदायिक विवाहासारख्या उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास खर्चात मोठी बचत होऊन समाजासमोर आदर्श निर्माण होईल, असे आवाहनही त्यांनी केले.कार्यक्रमाला परिसरातील अनेक ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

### युवकाचा आगीत होरपळून मृत्यू

**वर्धा-** शेताच्या बांधावरील कचरा जाळताना फिट आल्याने युवकाचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना काचनूर येथे उघडकीस आली. मुकिंदा विजय पारसे (४०) असे मृत युवकाचे नाव आहे. ते शेतात कचरा जाळण्यासाठी गेले होते. मात्र, रात्री उशिरापर्यंत घरी परत न आल्याने मित्रांनी शेतात जाऊन शोध घेतला. त्यावेळी बांधावरील आग पेटलेली दिसली. परिसरात शोध घेतल्यावर मुकिंदा हे जळालेल्या अवस्थेत आढळून आले. ग्रामस्थांनी त्यांना तातडीने गावात आणले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. मुकिंदा यांना मागील दहा वर्षांपासून फिटचा त्रास असल्याची माहिती आहे.

**कोर्ट विद्यमान श्री समर्थ क्षिरसागर तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी यांचे न्यायालय देवळी.**

**जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये**
**ज.मू.नो.र.प्र.क्र.३/२०२५-२६**

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार श्री सागर उत्तमराव हरणे रा. चिंचाळा ता. देवळी जि. वर्धा यांचे अर्जानुसार त्यांचा मुलगा चि. कान्हा सागर हरणे यांचा जन्म १३/०४/२०२४ रोजी मौजा अडेगांव ता. देवळी येथे झाला असून जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) आणि महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम व फोजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २० चे पोटकलम (१) अंतर्गत त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत अडेगांव ता. देवळी येथे घेण्यात आलेली नसल्याने ग्रामपंचायत अडेगांव ता. देवळी यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तिकेमध्ये नोंद घेण्याचा आदेश होणेबाबत या कार्यालयास ग्रामपंचायत अडेगांव ता. देवळी यांचेव्दारे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

त्याअर्थी सदर व्यक्तीच्या जन्माच्या नोंदीबाबत हितसंबंधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनो निश्चित केलेल्या तारखेस स्वतः अथवा विधी व्यवसायीमार्फत किंवा मान्यता प्राप्त अभिकर्त्यामार्फत हजर राहून १५ दिवसाचे आत सादर करावे. उक्त तारखेनंतर व ठिकाणी अशा रितीने हजर राहण्यास व हरकती निवेदन करण्यास कसूर केल्यास त्यानंतर प्राप्त कोणत्याही हरकती व आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**सही**
**तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी देवळी**

# सिकलसेल रुग्णांसाठी हायड्रोक्सी युरिया, औषध संजीवनी, डोस अर्धवट सोडू नये

## जिल्हा आरोग्य अधिका-यांचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

सिकलसेल, ॲनेमिया हा एक अनुवांशिक रक्ताचा आजार असून, या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांचे जीवन सुसह्य, सुरक्षित आणि वेदनामुक्त करण्यासाठी, हायड्रोक्सी युरिया हे औषध अत्यंत प्रभावी आहे. जिल्ह्यातील सर्व सिकलसेलग्रस्त रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने या औषधाचा नियमित वापर करावा आणि ते कोणत्याही परिस्थितीत स्वतःहून बंद करू नये, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले यांनी केले आहे.

हे औषध अन्न व औषध प्रशासनाद्वारे मान्यताप्राप्त असून सन १९९८ पासून सिकलसेलच्या उपचारांमध्ये सुरक्षितपणे वापरले जात आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा सामान्य रुग्णालयात हे औषध मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे.या औषधामुळे रुग्णांच्या असह्य वेदनांचे हल्ले ५० टक्के पेक्षा कमी होतात. सिकलसेलच्या रुग्णांना होणारा पेन क्रायसिस हा अत्यंत त्रासदायक असतो. या औषधामुळे रक्तातील अडथळे कमी होऊन वेदनांचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक घटते. पर्यायाने रुग्णांना वारंवार रुग्णालयात दाखल होण्याची गरज पडत नाही.मानवी शरीरात 'बाळाचे हिमोग्लोबिन' (HbF) असते. हायड्रोक्सी युरिया शरीरातील HbF ची पातळी वाढवतो. यामुळे लाल रक्तपेशींचा आकार विळ्यासारखा (सिकल) होत नाही व त्या रक्तवाहिन्यांमध्ये अडकत नाहीत.





या औषधाच्या नियमित सेवनामुळे रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी स्थिर राहण्यास मदत होते. परिणामी, रुग्णाला वारंवार बाहेरून रक्त देण्याची गरज पडत नाही, ज्यामुळे शरीरात आयर्न ओव्हरलोड, (लोहाचे अतिप्रमाण) होण्याचा धोका टळतो. फुफ्फुसाचा हा आजार सिकलसेल रुग्णांसाठी अत्यंत घातक मानला जातो. मात्र, हायड्रोक्सी युरियामुळे फुफ्फुसात होणारा हा त्रास तब्बल ५० टक्क्यांपर्यंत कमी होतो.

औषधांमुळे मेंदूवरील स्ट्रोकचा (पक्षाघात) धोका कमी होतो. विशेषतः लहान मुलांमध्ये सायलेंट स्ट्रोक किंवा मोठा स्ट्रोक येण्याचा धोका जास्त असतो. हे औषध रक्तवाहिन्यांमधील ब्लॉकेज रोखत असल्याने स्ट्रोकचा धोका मोठ्या प्रमाणावर टळतो. रक्ताभिसरण सुरळीत न झाल्याने दीर्घकाळात किडनी, प्लीहा, यकृत, आणि हाडे खराब होतात. औषधामुळे रक्तप्रवाह उत्तम राहून या सर्व अवयवांचे कार्य दीर्घकाळ सुस्थितीत राहते. वैद्यकीय संशोधनानूसार नियमित औषध घेणाऱ्या रुग्णांचे आयुष्य १० ते १५ वर्षांनी वाढते. रुग्णांचा थकवा कमी होऊन मुले नियमित शाळेत जाऊ शकतात आणि प्रौढ व्यक्ती आपली दैनंदिन कामे सामान्यपणे करु शकतात.औषध ९ महिन्यांच्या लहान बाळापासून ते वयस्कर रुग्णांपर्यंत सर्व वयोगटातील व्यक्तींसाठी पूर्णपणे सुरक्षित आणि उपयुक्त आहे. औषध सुरू केल्यावर त्याचा दृश्य परिणाम दिसण्यासाठी साधारणतः ३ ते ६ महिन्यांचा कालावधी लागू शकतो, त्यामुळे संयम ठेवून औषध सुरु ठेवणे आवश्यक आहे. डॉक्टर रुग्णाच्या वजनानुसार डोस ठरवतात. रक्ताची नियमित तपासणी करून डॉक्टर गरजेनुसार डोसमध्ये बदल करतात. हायड्रोक्सी युरिया हे सिकलसेल आजार मुळापासून पूर्णपणे बरा करत नसले, तरी रुग्णांचे दैनंदिन जीवन सामान्य करण्यासाठी ते एकमेव प्रभावी औषध आहे. जिल्ह्यातील सिकलसेल बाधित रुग्णांनी अथवा त्यांच्या पालकांनी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय हे औषध अजिबात बंद करू नये. आपल्या जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रातून हे औषध मोफत प्राप्त करून घ्यावे व आरोग्य विभागाच्या या मोहिमेला सहकार्य करावे, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कळविले आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १७९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# चारचाकी-दोन दुचाकीत धडक; दोघांचा मृत्यू, एक गंभीर

## -कठोरा नाक्याजवळ मध्यरात्री भीषण अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील कठोरा नाका परिसर २६ मे रोजी मध्यरात्री भीषण अपघाताने हादरला. भरधाव वेगातील वाहनाने दोन दुचाकींना जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन जिवलग मित्रांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर एका युवकाला गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेमुळे गाडगेनगर परिसरात हळहळ व्यक्त होत असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.




मृत तरुणांची नावे तेजस दिवाकर माथुरकर (वय २१, रा. मनीपूर कॉलनी, दुर्गामाता मंदिराजवळ, गाडगेनगर) आणि यश ओमप्रकाश कनोजिया (वय २३, रा. हर्षराज कॉलनी, गाडगेनगर) अशी आहेत. दोघेही जिवलग मित्र असून एका दुचाकीवरून प्रवास करत होते. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास कठोरा नाक्याजवळ एमएच-२७-बीएक्स-८६८३ क्रमांकाच्या वाहनाने दोन दुचाकींना जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की तिन्ही युवक रस्त्यावर फेकले गेले आणि गंभीर जखमी झाले. अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत तातडीने मदतकार्य सुरू केले. जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान तेजस माथुरकर आणि यश कनोजिया यांचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या दुचाकीवरील निरजंन अविनाश कोकाटे (रा. पोलीस कॉलनी, अर्जुननगर, गाडगेनगर) हा युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी प्रथमेश दिवाकर माथुरकर, रा. शोभानगर यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी एमएच-२७-बीएक्स-८६८३ क्रमांकाच्या वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. अपघातग्रस्त वाहने पोलिसांनी ताब्यात घेतली असून घटनेचा पुढील तपास सुरू आहे. घटनेनंतर मृत तरुणांच्या परिसरात शोककळा पसरली असून मित्रपरिवार आणि नातेवाईकांनी हळहळ व्यक्त केली आहे. वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे कठोरा नाका परिसरातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# पद्मश्री जनार्दन बोथे यांचा महाराष्ट्र सदनात सत्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** आपल्या समर्पित लोकसेवेने महाराष्ट्राची मान राष्ट्रीय पातळीवर उंचावणारे पद्मश्री जनार्दन बोथे यांचा महाराष्ट्र सदनात आज एक विशेष कौतुक सोहळा आयोजित करून सत्कार करण्यात आला होता. महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त व सचिव आर. विमला यांच्याहस्ते त्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र सदनात आयोजित या सोहळ्याला माहिती संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, व्यवस्थापक प्रमोद कोलपते उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना बोथे म्हणाले, देशाच्या राजधानीत आणि विशेषतः आपल्या राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र सदनात झालेला हा सत्कार माझ्यासाठी घरच्या कौतुकासारखा आहे. हा पुरस्कार म्हणजे माझ्या एकट्याचा सन्मान नसून, माझ्या जीवनात आलेले महान संत, स्वातंत्र्यसेनानी राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा आणि कार्याचा हा गौरव आहे. महाराजांनी स्थापन केलेल्या अमरावतीच्या गुरुकुंज आश्रमातून हजारो विद्यार्थी आणि कार्यकर्ते देशाची संस्कृती, अध्यात्म आणि राष्ट्रप्रेम जगवण्यासाठी अविरत काम करत आहेत. त्या गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांसोबत मला काम करण्याची संधी मिळाली, म्हणूनच आज मी इथपर्यंत पोहोचू शकलो असेही त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी बोलताना निवासी आयुक्त आर. विमला यांनी जनार्दन बोथे यांच्या कार्याचा गौरव केला. महाराष्ट्राच्या मातीतून देशपातळीवर चमकणाऱ्या अशा ज्येष्ठ आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्वाचा सत्कार करण्याची संधी महाराष्ट्र सदनाला मिळाली, हे आमचे भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. माहिती संचालक हेमराज बागुल यांनी बोथे यांचे सामाजिक कार्य या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र सदनातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



# मोटारसायकल चोरीप्रकरणी आरोपी जेरबंद

## तिवसा पोलिसांची कारवाई

**तिवसा :** तिवसा पोलिसांनी मोटारसायकल चोरीप्रकरणी तातडीने कारवाई करत एका आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून चोरीस गेलेली दुचाकी आणि मोबाईल फोन असा एकूण २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरातील वाहनचोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

तिवसा येथील अगर चौक परिसरातील रहिवासी अमोल बाबुराव गोहने यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या शेतमालक मुकुंदराव देशमुख यांची एमएच-२७-डब्ल्यू-६६१९ क्रमांकाची मोटारसायकल समर्थ लॉन परिसरातून अज्ञात चोरट्याने लंपास केली होती. ही घटना २५ एप्रिलच्या रात्री ते २६ एप्रिलच्या सकाळदरम्यान घडली होती. याप्रकरणी तिवसा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे गावील जगदीश मोरे (वय २४,



रा. शेंदुर्जना माहोरे, ता. तिवसा) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चोरीची कबुली दिल्यानंतर त्याच्याकडून चोरीस गेलेली मोटारसायकल आणि ८ हजार रुपये किमतीचा ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला.

# नऊ महिन्यानंतर अल्पवयीन मुलीचा शोध

## -आरोपीसह मुलगी ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यातील अल्पवयीन मुलीच्या अपहरण प्रकरणाचा अखेर उलगडा करण्यात अमरावती ग्रामीण पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला यश आले आहे. तब्बल नऊ महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीसह अल्पवयीन मुलीचा शोध घेत पथकाने दोघांनाही अमरावती शहरातील नवसारी परिसरातून ताब्यात घेतले.

अमरावती ग्रामिण पोलीस विभागाच्या अंतर्गत चांदूर रेल्वे येथे १४ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील अल्पवयीन मुलगी आणि आरोपी दीर्घकाळापासून बेपत्ता असल्याने तपासाची जबाबदारी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे सोपविण्यात आली होती. तांत्रिक तपास, गुप्त माहिती आणि सातत्यपूर्ण शोध मोहिमेच्या आधारे पथकाने आरोपी अश्विन कुमार रामगुवल यादव (वय २५, ता. चांदूर रेल्वे) याला अल्पवयीन मुलीसह नवसारी येथील ऑटो स्टॉप परिसरातून ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपीला चांदूर रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

---

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.मो.नदीम शे.नजीर**, पत्ता नौबागपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२९ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/25307 जुना मालमत्ता क्र. २९०००२०३ नझुल शिट क्र.४-डी प्लॉट नं.२७४/२ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **श्री.उत्तम ब.नाळे, श्रीराम ब.नाळे, शे.नजीर शे.कलाम, नावेद अहमद शे.नजीर, मो.नदीम शे.नजीर, शे.नईम शे.नजीर** या क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **११.०२.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

**पुर्वेस** - सरकारी रस्ता
**पश्चिमेस** - शे.कलीम चे घर
**दक्षिणेस** - नाळे यांचे घर
**उत्तरेस** - आमदखॉं यांचे घर

शिक्का

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७११/२०२६
**रमेश व ईतर-वि- निरंक**
पुढील ता.१५.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Ramesh Ganpatrao Yawale, Age 74 Yrs. Occu.: Retired R/o Flat No.402] 4th Floor Parijat Enclave Manish Nagar, Besa Road Behind Shrikant Electronic Jagannath Nagar, Besa, Tq.Dist.Nagpur.
2. Rutuja Dhiraj Dangore, Age 40 Yrs. Occu.: Household R/o Flat No.101, Maxx Sanman-B Plot No.2, Harihar Nagar, Besa, Tq. Dist. Nagpur
3. Akshay Ramesh Yawale, Age 37 Yrs. Occu.: Pvt. Job. R/o House No.19, Chhatritalav Road, Near Hanuman Mandir, Deep Nagar No.1, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत पुनम रमेश यावले** हे दिनांक 01.03.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रमेश व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रमेश व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

| | |
|---|---|
| फेरफार अहवाल/अर्ज क्र. | 278/2026 कलम २२ |
| सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक | **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती** **एफ-१२७७३/अमरावती** |
| बाबत अर्जदार - | **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती** |

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--

पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**मा.सहदिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.१४८/२०२६ ने.ता.०९.०६.२०२६

**अर्जदार :**
१. प्रशांत प्रदीपराव चव्हाण, रा.वार्ड नं.५, नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. अंकुश प्रदीपराव चव्हाण, रा.वार्ड नं.५, नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **प्रदीप शंकर चव्हाण** यांचा मृत्यू दि.**२०.०३.२०१८** रोजी मुंडनिशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला असून मयताची पत्नी नामे **लता प्रदीप चव्हाण** यांचा मृत्यू **१२.०३.२०२६** रोजी मुंडनिशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयत यांचे अर्जदार नं.१ व २ ही मुले आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०८`, २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.११०/२०२६ ने.ता.२४.०३.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती सरला राधेश्याम चांडक, वय ७९ वर्षे, धंदा - घरकाम रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. श्री.राजेशकुमार राधेश्याम चांडक, वय ५९ वर्षे, धंदा - शेती व व्यवसाय रा.नेरपिंगळाई, ह.मु.अड्याळ, ता.पवनी, जि.भंडारा
३. श्री.संजय राधेश्यामजी चांडक, वय ५३ वर्षे, धंदा - शेती व व्यवसाय रा.नेरपिंगळाई, ह.मु.वेलतूर, ता.कुही, जि.नागपूर
४. सौ.चंदा घनश्याम काबरा, वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम रा.महाराज लॉजजवळ, मंगळवार पेठ, पुणे, ता.जि.पुणे
५. सौ.मिना घनश्याम राठी, वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम रा.वार्ड नं.९, नांदुरा, ता.नांदुरा, जि.बुलढाणा

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ५ चे वडील **नामे राधेश्याम गोपालदास चांडक** हे दि.**१५.११.२०२५** रोजी **अड्याळ, ता.पवनी, जि.बुलढाणा** येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १२.०५.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहम्मद साजिद मोहम्मद साबिर** अर्जात नमूद जन्म दिनांक **११.०१.१९८८** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४)

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ३) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ४) सौ.सुनंदा रा.देऊळकर (ग्रा.स.) | ४) सौ.सुनंदा रा.देऊळकर (ग्रा.स.) |
| ५) सौ.अनुश्री रोशन जयसिंगपुरे | ५) सौ.अनुश्री रोशन जयसिंगपुरे |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शमशाद बेगम अ.कादर** अर्जात नमूद जन्म दिनांक **०४/०९/१९८२** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **कसबेगव्हाण, ता.अंजनगांव सुर्जी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४)

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) सौ.अनुश्री रोशन जयसिंगपुरे | ५) सौ.अनुश्री रोशन जयसिंगपुरे |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **घाटलाडकी** येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **आसीया परवीन मो.साबीर** अर्जात नमूद जन्म दिनांक **०२.०२.१९८५** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **कसबेगव्हाण, ता.अंजनगांव सुर्जी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४)

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) खालीक अ.मजीद (ग्रा.स.) | ५) खालीक अ.मजीद (ग्रा.स.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **घाटलाडकी** येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **नाहीद अंजुम नूर मोहम्मर** अर्जात नमूद जन्म दिनांक **०९.०३.१९९०** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४)

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) खालीक अ.मजीद (ग्रा.स.) | ५) खालीक अ.मजीद (ग्रा.स.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

### जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **दिगांबर कोंडीबाराव हिंगोले,** रा.हैद्रेपाडा शाळेजवळ, बदलापूर वेस्ट, जि.ठाणे-४२१५०३ यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यात असलेली खालील मिळकत विकत घेण्याचा सौदा केला असून माझे पक्षकाराने खालील नमूद मिळकतीबाबत टोकनचिठ्ठी केली आहे, त्या मिळकतीचे वर्णन--

**मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी शहर कचेरीचे व कक्षेती व महानगरपालिका, अमरावतीच्या हद्दीतील मौजा आकोली, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.३४/१, मधील १ हे.४८ आर पैकी पोट खराब ०.०४ आर जमिनीपैकी उत्तर-दक्षिण वाटणीचा पुर्वेकडील भागाची ०.६७ आर या शेतजमिनीवर मा.आयुक्त यांचे दिनांक २९.०९.२०१७ च्या आदेशानुसार व अमरावती मनपा तर्फे दिनांक २७.०७.२०१८ नुसार लेआऊट मंजूर झालेले व विद्यमान उपविभागीय अधिकारी यांचे फाईलावरील रा.मा.क्र.एन.ए.पी.-३४/अकोली-१८/२०१८-२०१९, नि.ता.२५.१०.२०१८ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील प्लॉट नं.३३ (तेहतीस) याची साईज ७.५ मी. बाय १६.९२ मी. असून याचे एकुण क्षेत्रफळ १२६.९० चौ.मी. (१३६५.९५ चौ.फुट) याची चतुःसिमा--

पुर्वेस - लेआऊट मधील ९ मिटर रुंदीचा रोड
पश्चिमेस - सर्व्हे नं.३४ चा भाग
उत्तरेस - प्लॉट नं.३४
दक्षिणेस - प्लॉट नं.३२

येणेप्रमाणे वरील सदरहू मिळकतीचा सौदा करण्याचे ठरविले असून सदरहू मिळकतीचे खरेदीखत नोंदवून घ्यायचे आहे. जर या मिळकतीबाबत कोणाचा काही हक्क, संबंध, बोजा, गहाण, हितसंबंध, सामाईक हिस्सा किंवा वारस हक्क व इतर काही वाद किंवा काही हरकत आक्षेप असल्यास सदरहू नोटीस प्रकाशित झाल्यापासून ५ दिवसांच्या आत मूळ दस्ताऐवजासह मला भेटावे किंवा फोनद्वारे संपर्क साधावा. अन्यथा कोणाचाही काहीही आक्षेप, हरकत चालणार नाही, याची कृपया सर्वांनी नोद घ्यावी.

**दिनांक २६.०५.२०२६**
**अमरावती**

(ॲड.एम.बी.राठी)
रा.१०३, दयासागर अपार्टमेंट,
जयराम नगर, राजापेठ, अमरावती
ता.जि.अमरावती
मो.९८९०५७९००५

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.९३०/२०२६
**इंद्रकला व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२०.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. इंद्रकला अजाबराव भगत, वय ८६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. हुमेंद्र अजाबराव भगत, वय ४७ वर्षे, व्यवसाय - मजूरी
३. प्रफुल अजाबराव भगत, वय ४५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
४. सविता दिगांबर शेळके, वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
१ ते ४ सर्व रा.डिगरगव्हाण, ता.जि.अमरावती
५. कोकीळा विनोद लोहांडे, वय ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.शिरजगांव (भि.) ता.मोर्शी, जि.अमरावती
६. वंदना रामदास टोपले, वय ५० वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.तिवसा, ता.तिवसा, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अजाबराव मारोतराव भगत** यांचे दिनांक **१४.०६.२०२४** रोजी **डिगरगव्हाण, ता.जि.अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार इंद्रकला अजाबराव भगत व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **इंद्रकला अजाबराव भगत व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार,**
**जि.अमरावती यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.२७३/२०२६ ने.ता. २५.०६.२०२६

**अर्जदार :** **१.** सौ.प्रिया मुकेश ताटस्कर, वय २६ वर्षे, धंदा - गृहिणी रा.घाटलाडकी, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक अनिल दामोदर जवंजाळ** यांचा मृत्यू दिनांक **०६.०९.२०१७** रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक मंजुळा अनिल जवंजाळ** हिचा दि.**२५.०९.२०२३** रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२७३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**११.०५.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### जिल्हा सामान्य रुग्णालयात 'जागतिक स्झिझोफ्रेनिया दिन' साजरा

**अमरावती -** जिल्हा सामान्य रुग्णालयात 'जागतिक स्झिझोफ्रेनिया दिन' साजरा करण्यात आला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी यावेळी मार्गदर्शन केले.अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद निरवणे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अमोल गुल्हाने, डॉ. रुपिकेश होले, भावना पुरोहित, प्रमोद भक्ते, सुनील कळतकर, विशाल झामरे, सायली डंभे उपस्थित होते.डॉ. प्रमोद निरवणे, डॉ. अमोल गुल्हाने आणि भावना पुरोहित यांनी 'स्झिझोफ्रेनिया' या गंभीर मानसिक आजाराविषयी मार्गदर्शन केले. आजाराची लक्षणे, त्याचे वेळेवर निदान कसे करावे आणि उपलब्ध उपचार पद्धती कोणत्या आहेत, याबाबत माहिती दिली. विशाल झामरे यांनी सूत्रसंचालन केले. सायली डंभे यांनी आभार मानले.

### तहसिल कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन

**अमरावती-** भातकुली जैन तहसिल कार्यालयात दि. १ जूनपासून आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पावासाळ्याचे कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान हवा, वादळी पाऊस, सतत पाऊस, अतिवृष्टी, ढगफुटी, पूर इत्यादी कारणामुळे पशूहानी, जिवीत हानी उद्भवल्यास, त्याबाबतची माहिती तहसिल कार्यालय, भातकुली येथील दूरध्वनी क्रमांक ०७२१-२३८९००१ वर तात्काळ कळवावी, असे आवाहन भातकुलीचे तहसिलदार अक्षय मंडवे यांनी कळविले आहे.




### अमरावती-परतवाडा महामार्गावरील वाहतूक ठप्प

**आसेगाव पूर्णा-** अमरावती-परतवाडा महामार्गावरील पूर्णा नगर फाट्याजवळ सोमवार ला दुपारच्या सुमारास मोठे कडुलिंबाचे झाड रस्त्यावर कोसळल्याने वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली. घटनेमुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.माहितीनुसार, गेल्या काही आठवड्यांपासून महामार्गालगतच्या जुन्या कडुलिंबाच्या झाडांना अज्ञातांकडून आग लावण्याच्या घटना घडत आहेत. सोमवारीही एका मोठ्या कडुलिंबाच्या झाडाला आग लावण्यात आल्याने ते झाड अचानक महामार्गाच्या मधोमध कोसळले.वाहतूक ठप्प झाल्याने काही वाहन चालकांनी शेतातून पर्यायी मार्ग काढत वाहने पुढे नेण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा आर्थिक नुकसान झाले नाही. मात्र, वर्दळीच्या मार्गावर झाड कोसळल्याने मोठी दुर्घटना टळल्याची चर्चा नागरिकांमध्ये होती.दरम्यान, वृत्त लिहीपर्यंत संबंधित विभागाची कोणतीही यंत्रणा घटनास्थळी पोहोचली नसल्याने वाहनचालकांनी नाराजी व्यक्त केली.




### संजय सरवटकर यांचा सत्कार

**अमरावती-** राजमाता जिजाऊ बहुउद्देशिय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तसेच स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ अमरावती चे जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर यांचा पुणे येथे विशिष्ट मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह, शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. डी. एस. लोखंडे पाटील यांच्या मार्गदर्शनात नारी गौरव पुरस्कार समारंभ पुणे येथील मराठा चेम्बर्स ऑफ कॉमर्स सभागृह स्वारगेट येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी संजय सरवटकर यांचा सामाजिक क्षेत्रात व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल दैनिक चालू वार्ता पुणे आवृत्ती च्या सहसंपादिका सोनाली लोखंडे पाटील व इतर मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांना गौरवण्यात आले. त्यांच्या या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.याप्रसंगी विजय काळे पाटील, जयानंद खरड, भास्कर काळे, मयूर निर्मळ, वाय. एम. रामटेके, यांची उपस्थिती होती.



### चांदूर बाजारचे तहसीलदार योगेश गाडे रुजू

**चांदूर बाजार-** तहसील कार्यालयाचे तहसीलदार म्हणून, योगेश गाडे यांनी आपला कार्यभार स्वीकारला. योगेश गाडे तसे ८ मे रोजीच तहसीलदार म्हणून रूजू झाले होते.परंतू ते लगेच दिर्घ रजेच्या सुटीवर निघून गेले होते.२५ मे ला त्यांनी रितसर आपल्या तहसीलदार पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. सध्या ते परिविक्षाधीन तहसीलदार म्हणून, चांदूरबाजार तहसीलचा कार्यभार सहा महिन्यां करीता सांभाळणार आहे. या आधी ही चांदूर बाजारचे तहसीलदार पद हे परिविक्षाधीन सोनल सुर्यवंशी सांभाळले आहे. त्यामुळे चांदूरबाजार चे तहसीलदार पद हे पुन्हा, परिविक्षाधीन अधिकार्याकिडेच आले आहे.



### चंद्रभान गावनर यांचे निधन

**तिवसा-** तालुक्यातील सातरगाव येथील रहिवासी चंद्रभान सखाराम गावनर (वय ८४) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.

# अचलपूर-परतवाडा जुळया शहरात कृत्रिम पाणीटंचाई

## टँकरने पाणीपुरवठा, स्थानिक नागरिकांची भटकंती

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर-परतवाडा या जुळ्या नगरीत पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले असून नळाची धार आटली आहे. टंचाईग्रस्त भागात नगरपालिकेकडून तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.यामुळे नागरिकांमध्ये तीर्व रोष व्यक्त होत आहे.चंद्रभागा धरणातून जलशुद्धिकरण केंद्रापर्यंत येणाऱ्या पाण्याचा दाब कमी झाल्यामुळे शहरातील पाण्याच्या टाक्या भरण्यास अडचणी येत आहेत. टाक्या पूर्ण क्षमतेने भरल्या जात नाहीत. त्यामुळे जुळया नगरीचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. नळाची धार आटली आहे.



यातून ही टंचाई निर्माण झाली आहे. दुसरीकडे शहराला आणि पाण्याच्या टाक्यांपर्यंत पाणीपुरवठा करणाऱ्या पाइप लाइनला अनेक ठिकाणी लिकेज आहेत. यातील काही भूमिगत आहेत. यातून ही कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

**तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा**

कृत्रिम पाणीटंचाईमुळे अचलपूर नगर परिषदेला टँकर द्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. नगर परिषदेकडून तीन टँकरद्वारे हा पाणीपुरवठा केला जात आहे. यामुळे जुळ्या शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असताना टँकर ची संख्या न वाढविता तीन टँकर द्वारे पाणीपुरवठा होऊ शकतो का? हा प्रश्न सुद्धा निर्माण झाला आहे.

अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी विलायतपूरा भागाची पाहणी केली होती .यावेळी नागरिकांच्या अनेक तक्रारी पाणीटंचाई संदर्भात प्राप्त होताच अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर नगर परिषदेचे पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी यांच्या शी चर्चा करून या भागासह जुळ्या शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहे.

**-प्रफुल बर्वे,** भाजपा पदाधिकारी

चंद्रभागा धरणातून जलशुद्धिकरण केंद्रापर्यंत पोहोचणाऱ्या पाण्याचा दाब कमी झाला आहे. यातच पाण्याची मागणी वाढली आहे. पाणीटंचाईवर उपाययोजना केल्या जात आहेत.

**-धीरजकुमार गोहाड,** मुख्याधिकारी, नगर परिषद

टंचाईग्रस्त क्षेत्रात नगरपालिकेकडून टँकरने पाणीपुरवठा केल्या जात आहे. बाधित पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश नगरपालिका प्रशासनाला देण्यात आले आहेत.

**-रूपाली माथने,** नगराध्यक्ष

चंद्रभागा धरणातून गुरुत्वाकर्षण शक्तीने पाणीपुरवठा होत आहे. धरणातून दिल्या जाणाऱ्या पाण्याचा वेग किंवा दाब कमी केला गेलेला नाही.

**-श्रीकांत उमप,** कार्यकारी अभियंता

### दिवसातून एकदा पाणीपुरवठा

पाणीपुरवठा योजनेंतर्गत जुळ्या नगरीला सकाळ-संध्याकाळ असा दोन्ही वेळेला होणारा पाणीपुरवठा आता केवळ एकदा पाणीपुरवठा होत आहे. अचलपूर शहराला सकाळी, तर परतवाडा शहराला सायंकाळी पाणीपुरवठा केला जात आहे.

## शाळा २६जूनला सुरू करा शिक्षक समितीचे शिक्षणमंत्री यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

दरवर्षी राज्यातील शाळा विदर्भ वगळता उर्वरीत शाळा साधारणपणे १५ जून रोजी सुरू होतात. मात्र, चालू वर्ष २०२६ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात, विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात उन्हाचा पारा कमालीचा वाढला आहे. मे महिन्याच्या मध्यातच अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४३ष्टण ते ४७ष्टण च्या पार गेले आहे. हवामान खात्याने (घ्श्र्) जूनच्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यातही तीव्र उन्हाची लाट (एनी पूँ ॅन) कायम राहण्याचा इशारा दिला आहे. या वाढत्या तापमानामुळे राज्यात उष्माघाताचे (पूँ ऐॅदव) रुग्ण आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या चिंताजनक रितीने वाढत आहे. आरोग्य विभागाकडून काही आठवड्यात समोर आलेली राज्यातील उष्माघाताची सद्यस्थिती व आकडेवारी अत्यंत भीतीदायक आहे. मे महिन्यातील विदर्भाचे (नागपूर, चंद्रपूर, अकोला,अमरावती,वर्धा)



सरासरी तापमान ४४.५°C - ४६.२°C, उष्माघाताची नोंदवलेली प्रकरणे ८५० पेक्षा अधिक, तर गंभीर रुग्ण १२० पेक्षा अधिक आहे. मराठवाडा (लातूर, जालना, छत्रपती संभाजीनगर) सरासरी तापमान ४३ष्टण - ४५ष्टण, उष्माघाताची नोंदवलेली प्रकरणे ६२० पेक्षा अधिक तर गंभीर रुग्ण ९५ पेक्षा अधिक आहे. उत्तर महाराष्ट्र (जळगाव, धुळे, नाशिक) सरासरी तापमान ४२.५ष्टण - ४४.८ष्टण उष्माघाताची नोंदवलेली प्रकरणे ४८० पेक्षा अधिक तर गंभीर रुग्ण ६५ पेक्षा अधिक आहेत. उर्वरित महाराष्ट्रात देखील ४०ष्टण - ४२ष्टण पर्यंत तापमान आहे.आरोग्य खात्याच्या प्राथमिक अहवालानुसार, राज्यात आतापर्यंत उष्माघातामुळे कच्च्या आकडेवारीनुसार २५ हून अधिक नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. यामध्ये शेतमजूर, वृद्ध आणि लहान मुलांचा समावेश अधिक आहे. म्हणून, प्रशासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा १५ जून २०२६ ऐवजी २६ जून २०२६ रोजी सुरू कराव्यात. मात्र, मुलांचा जीव आणि आरोग्य हीच शासनाची सर्वोच्च प्राथमिकता असायला हवी. आपण या गंभीर बाबीची त्वरित दखल घेऊन योग्य तो सकारात्मक निर्णय जाहीर करणेबाबत शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी राज्य शासनाला निवेदन दिले.

## 'बाबा' व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्रात जनजागृती



**अमरावती-** मानस उपक्रमित 'बाबा' व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र येथे जागतिक स्किझोफ्रेनिया जनजागृती दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला केंद्राचे संचालक डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. उषा देशमुख, केंद्रप्रमुख डॉ. विक्रम वानखडे तसेच डॉ. रश्मी मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी डॉ. श्रीकांत देशमुख यांनी मार्गदर्शन केले. डॉ. उषा देशमुख यांनी कुटुंबाच्या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले, तर डॉ. विक्रम वानखडे यांनी अंधश्रद्धा सोडून योग्य वैद्यकीय उपचार स्वीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना ग्रीन रिबीन बांधून 'आपले मानसिक स्वास्थ जपा' हा संदेश देण्यात आला. तसेच नर्सिंग बॅचने विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर करून मानसिक आरोग्य जनजागृती केली. कार्यक्रमाचे संचालन जया राघोर्ते यांनी केले. प्रास्ताविक शरद मानकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राची गेठे यांनी केले.

# मतदारयाद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहीम, जूनपासून प्रत्यक्ष पडताळणी

**अमरावती/का.प्र.**

भारत निवडणूक आयोगाने संपूर्ण देशात मतदार याद्यांचे 'विशेष सखोल पुनरिक्षण' घेण्याचे आदेश दिले आहेत. या मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर झाला आहे. यात महाराष्ट्राचा समावेश आहे. या मोहिमेत राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

देशात यापूर्वी १९५२ ते २००४ दरम्यान विविध वर्षांमध्ये अशी मोहीम राबवण्यात आली होती. मात्र, मागील २० वर्षांत केवळ 'विशेष संक्षिप्त पुनरिक्षण' घेण्यात आले असून 'विशेष सखोल पुनरिक्षण' झालेले नाही. या काळात झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. अनेक मतदारांनी नवीन ठिकाणी नाव नोंदवले, पण जुन्या ठिकाणचे नाव वगळले नाही. परिणामी मतदारयाद्यांमध्ये दुबार नावे वाढली असण्याची शक्यता असल्याने ही पडताळणी केली जात आहे.राज्यातील क्षेत्रीय यंत्रणा सध्या जनगणनेच्या कामात व्यस्त असल्याने निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासाठी स्वतंत्र वेळापत्रक निश्चित केले आहे. ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबर २०२६ मध्ये पूर्ण होईल.

२० ते २९ जून दरम्यान गणना अर्जांची छपाई आणि बीएलओ यांचे प्रशिक्षण. ३० जून ते २९ जुलै दरम्यान 'बीएलओ' घरोघरी जाऊन गणना अर्ज वाटप करतील व भरलेले अर्ज परत घेतील. ५ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान प्रारुप यादीवर दावे व हरकती नोंदवणे. ३ ऑक्टोबरपर्यंत दावे व हरकती निकालात काढणे. ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार याद्यांची प्रासिद्धी करण्यात येणार आहे.राज्यातील एकूण ९ कोटी ८६ लाख ४४ हजार ४१३ मतदारांच्या तपशिलाची खातरजमा १ लाख २५३ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत केली जाईल. ३० जून ते २९ जुलै या कालावधीत 'बीएलओ' घरोघरी जाऊन आधीच माहिती भरलेले 'गणना प्रपत्र' मतदारांना देतील. यात मतदाराची सध्याची माहिती तसेच २००२-२००४ मधील जुनी माहिती भरलेली असेल किंवा ती मतदाराला स्वतः भरता येईल.

मतदारांना ही जुनी माहिती निवडणूक आयोगाच्या voters.eci.gov.in या संकेतस्थळावरूनही मिळवता येईल. मतदारांना हे गणना प्रपत्र ऑनलाइन पद्धतीनेही भरण्याची सुविधा उपलब्ध असेल. गृहभेटीदरम्यान घर बंद आढळल्यास अधिकारी किमान ३ वेळा भेट देतील.

आजमितीस राज्यात ७२.०४ टक्के जुन्या नोंदींचे मॅपिंग पूर्ण झाले आहे.मतदार यादीतील व्यक्ती भारतीय नागरिक आहे, याची खातरजमा करण्याची जबाबदारी आयोगावर आहे. मतदारयादीत नोंदी जुळल्या नाहीत तर संबंधित मतदारांना नोटीस पाठवून कागदपत्रे सादर करण्यास सांगितले जाईल. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार 'आधार' हे केवळ ओळख पुरावा म्हणून वापरले जाते. आधार ॲक्ट, २०२६ च्या कलम ९ प्रमाणे आधार कार्ड हे नागरिकत्वाचा पुरावा म्हणून मानले जाणार नाही, हे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात येणारे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी सहकार्य करणार आहेत.

यामुळे दुबार व मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे सोपे होईल. राज्यात सध्या राजकीय पक्षांनी फक्त १ लाख १३ हजार ५५८ 'बीएलए' नेमले आहेत. त्यामुळे सर्वच पक्षांनी प्रत्येक मतदान केंद्रावर जास्तीत जास्त प्रतिनिधी नियुक्त करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वुई अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या अध्यक्षपदी कॅप्टन कमलेश्वर दाभाडे तर उपाध्यक्षपदी प्रकाश मेश्राम

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक चैतन्य कॉलनी रोडवरील सखा मंगलम सभागृहात वुई अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी र. नं. १४८ च्या संचालक मंडळ सदस्यांची प्रथम सभा उत्साहात पार पडली. या सभेत संस्थेच्या अध्यक्षपदी कॅप्टन कमलेश्वर दाभाडे तर उपाध्यक्षपदी प्रकाश मेश्राम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती शंकर कुंभार यांच्या निर्देशानुसार दि. २१ रोजी निवडणूक अधिकारी



ए. एस. खान यांनी निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली. अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी अन्य कोणताही अर्ज दाखल न झाल्याने निवडणूक अधिकारी खान यांनी कॅप्टन दाभाडे आणि मेश्राम यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली.नवनिर्वाचित अध्यक्ष कॅप्टन कमलेश्वर दाभाडे आणि उपाध्यक्ष प्रकाश मेश्राम यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू छोट्या उद्योजकांना मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप करण्याचे धोरण राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.याप्रसंगी संस्थेचे संचालक सुनील वानखडे, डॉ. रत्नाकर बनसोड, वाल्मीक डवले, डॉ. संजय भीमराव खडसे,संदेश खडसे, संघपाल सरदार, राजकपूर डोंगरे, डॉ. रत्नशील खोब्रागडे, गौतम गजभिये, प्रा. अरुणा तसरे तसेच बॉबी दाभाडे आदी उपस्थित होते. सभेच्या शेवटी सर्व संचालकांनी नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

## प्रा. रजनी काळे ठाकरे यांना आचार्य पदवी

**अमरावती-** संत गाडगेबाबा



अमरावती विद्यापीठातर्फे तत्वज्ञान विषयामध्ये प्रा. रजनी आनंदराव काळे (रश्मी मनोज ठाकरे) यांना आचार्य पदवी (पीएचडी) प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील दर्शनीक दृष्टीकोन, हा होता. त्यांनी हे संशोधन प्रो. डॉ. सुनील काळमेघ यांच्या मार्गदर्शनामध्ये पूर्ण केले.

# एक सीसीटीव्ही कॅमेरा समाजासाठी-सागर भामरे

**चांदूरबाजार/वार्ताहर**

प्रत्येक व्यवसायिकाने आपल्या दुकानासमोर समाजहितासाठी किमान एक सीसीटीव्ही कॅमेरा लावावा. असे आवाहन पंचायत समिती सभागृहामध्ये आयोजित शांतता समितीच्या बैठकीमध्ये, आयपीएस तथा ठाणेदार सागर भामरे केले. नगरात घडणाऱ्या अनुसूचित घटनांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे अत्यंत उपयुक्त ठरत असून,व्यवसायीकांनी पोलिस प्रशासनाला यासाठी सहकार्य करावे.तसेच ज्या नागरीकांना शक्य असेल त्यांनीही, आपल्या घरात बाहेर एक ही.सी.टिव्ही



कॅमेरा अवश्य लावावा. समाजहितासाठी हे कर्तव्य प्रत्येकाने पार पाडावे.असे ही मत यावेळी. आय.पी.एस.भामरे यांनी व्यक्त केले.यावेळी ते शांतता समितीच्या बैठकीत बोलत होते.

स्थानिक पंचायत समिती सभागृहात आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर, शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीच्या मंचावर नगराध्यक्ष मनीषा नांगलिया, उपाध्यक्ष शेख रहमान शेख इब्राहिम. तसेच पी.आय. अशोक जाधव मंचावर उपस्थित होते. बैठकी दरम्यान बोलताना आयपीएस सागर भामरे यांनी त्यांच्या कार्यकाळात घडलेल्या विविध घटनांची माहिती दिली. गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाने केलेल्या कारवायांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. शहरातील शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी पोलिस विभाग सातत्याने प्रयत्नशील असून नागरिकांनीही जबाबदारीची भावना ठेवून प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.'एक सीसीटीव्ही कॅमेरा समाजासाठी' ही संकल्पना राबविल्यास चोरी, मारामारी, वाहतूक नियमभंग यांसारख्या घटनांवर नियंत्रण मिळवणे अधिक सोपे होईल. एखादी घटना घडल्यानंतर तपास कार्यात सीसीटीव्ही फुटेज महत्त्वाची भूमिका बजावत असल्यामुळे प्रत्येक दुकानदाराने आपल्या दुकानासमोर कॅमेरा बसविणे काळाची गरज बनली आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.पुढील काळातही अशाच प्रभावी कारवाया पोलिस प्रशासना कडून, सुरू राहणार असल्याचे ही त्यांनी नमूद केले. तसेच शहरा बरोबरच ग्रामीण भागातही रात्रीच्यागस्तीत वाढ करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच या बैठकीमध्ये पी.आय. अशोक जाधव यांनी सुद्धा बैठकीला मार्गदर्शन केले. या बैठकीला नगरसेवक, विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी, व्यवसायिक, पोलीस पाटील, पत्रकार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गाजीपूर - रुदाळी खाण फाईल्स : सातपुड्यात येणा-या स्फोटकांचे 'एमपी' कनेक्शन?

## मध्यप्रदेशातून जंगलमार्गे जिलेटीन-डिटोनेटरचा कथित पुरवठा



**- ब्लास्टिंगची नोंद नाही, बिलांमध्ये तफावत**

**-खाण नसतानाही स्फोटक व्यवहार; पोलिस, खनिकर्म आणि खुफिया यंत्रणांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न**

### ■ स्फोटक मॅगझिनभोवती धोक्याचे सावट!

गाजीपूर–रुदाळी परिसरात काही वर्षांपूर्वी मोठ्या विरोधानंतर स्फोटक साठवणुकीसाठी मॅगझिन उभारण्यात आल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे खाणीसाठी अकृषक करण्यात आलेल्या जमिनीवर हे मॅगझिन उभारण्यात आल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या मॅगझिनच्या परिसरात मानवी वस्ती, खाणी आणि वनक्षेत्र अगदी जवळ आहे. सततच्या ब्लास्टिंगमुळे भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. पेट्रोलियम अँड एक्स्प्लोसिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशन (PESO) तसेच संबंधित तांत्रिक विभागांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून सुरक्षा निकष, वनक्षेत्राचे अंतर, मानवी वस्त्यांची जवळीक आणि परवानग्यांची वैधता तपासावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

### ■ धारणी जंगलमार्गे 'सप्लाय चेन'?

स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या चर्चेनुसार, मध्यप्रदेशातून कमी दरात जिलेटीन आणि डिटोनेटर आणून धारणीच्या जंगलमार्गे गाजीपूर–रुदाळी परिसरात त्याचा पुरवठा केला जात असल्याचा संशय आहे. विशेष म्हणजे ही वाहतूक रात्रीच्या काळोखात होत असल्याची चर्चा असून, या सर्व प्रकारामागे मोठे आर्थिक रॅकेट कार्यरत असल्याचा आरोपही स्थानिकांकडून केला जात आहे. जर हा प्रकार खरा असेल, तर राज्याच्या सीमावर्ती भागातून इतक्या मोठ्या प्रमाणावर स्फोटके हलविली जात असताना पोलिस आणि खुफिया यंत्रणा पूर्णपणे अनभिज्ञ कशा राहिल्या? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**अॅड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या गाजीपूर–रुदाळी खाण पट्ट्यात गौण खनिज उत्खननाच्या आड स्फोटकांचा मोठा आणि संशयास्पद वापर सुरू असल्याची चर्चा रंगू लागल्याने प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. मध्यप्रदेशातून धारणीच्या जंगलमार्गे रात्रीच्या अंधारात जिलेटीन आणि डिटोनेटरसारखी शक्तिशाली स्फोटके आणली जात असल्याचा गंभीर संशय व्यक्त केला जात असून, या संपूर्ण प्रकाराकडे स्थानिक पोलिस, खनिकर्म विभाग, महसूल यंत्रणा आणि राज्याच्या खुफिया विभागाने डोळेझाक केली का, असा संतप्त सवाल आता उपस्थित होऊ लागला आहे. पोपटखोड गट ग्रामपंचायतीअंतर्गत मौजे गाजीपूर, रुदाळी आणि परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर गौण खनिज उत्खनन सुरू आहे. सातपुड्याच्या डोंगररांगांमध्ये असलेल्या या भागातील खडक अत्यंत कठीण स्वरूपाचे असल्याने मोठ्या प्रमाणावर ब्लास्टिंगशिवाय उत्खनन करणे जवळपास अशक्य मानले जाते. गेल्या २०१० पासून या परिसरातून लाखो ब्रास गौण खनिज बाहेर काढण्यात आल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणावर ब्लास्टिंग होऊनही केवळ दोन - तीन खाण धारक वगळता अनेक अनेक खाण धारकांकडे स्फोटक वापराची अधिकृत नोंद, खरेदीची बिले, परवानग्या किंवा वापराचा तपशील उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. यामुळे या खाणींमध्ये वापरण्यात आलेली जिलेटीन व डिटोनेटर अधिकृतरीत्या खरेदी करण्यात आली होती का? की बेकायदेशीर मार्गाने स्फोटके आणून त्यांचा वापर करण्यात आला? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

या संपूर्ण प्रकरणात कोणालाही दोषी ठरविण्यापूर्वी निष्पक्ष आणि सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे. खाण परिसरातील प्रत्यक्ष उत्खनन, ब्लास्टिंगचे प्रमाण, स्फोटक खरेदी-विक्रीची कागदपत्रे, वाहतूक मार्ग, आणि संबंधित आर्थिक व्यवहारांची संयुक्त चौकशी झाल्यास वास्तव समोर येऊ शकते, असे स्थानिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे सातपुडा परिसरातील खाण व्यवसाय, पर्यावरणीय सुरक्षा आणि प्रशासनाच्या नियंत्रण यंत्रणेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### ■ खाण नाही... तरी ब्लास्टिंगची बिले ?


या संपूर्ण प्रकरणातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे परिसरातील एका कथित खाण व्यावसायिकाच्या नावावर एकही अधिकृत खाण नसतानाही त्याच्याकडून ब्लास्टिंगसंदर्भातील बिले घेतली जात असल्याची चर्चा आहे. जीएसटी सेट-ऑफ आणि व्यवहार कागदोपत्री वैध दाखवण्यासाठी ही बिले वापरली जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. जर संबंधित व्यक्तीकडे खाणच नसेल, तर त्याने घेतलेली स्फोटके वापरली कुठे? ती नेमकी कोणाच्या खाणींमध्ये वापरण्यात आली? यामागे आणखी मोठे नेटवर्क कार्यरत आहे का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र, या सर्व व्यवहारांची अधिकृत चौकशी अद्याप झालेली नसून, संबंधित यंत्रणांनी आर्थिक, तांत्रिक आणि फॉरेन्सिक तपास करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### प्रशासनाची 'मौन भूमिका' संशय वाढवणारी

सातपुड्याच्या पायथ्याशी दिवस-रात्र सुरू असलेल्या ब्लास्टिंगच्या आवाजाने संपूर्ण परिसर हादरत असताना संबंधित यंत्रणांना याची माहिती नव्हती, हे मान्य करणे कठीण असल्याचे बोलले जात आहे. खनिकर्म विभागाने उत्खननाचे प्रमाण आणि वापरलेल्या स्फोटकांचा हिशेब तपासला का? महसूल विभागाने खाणींच्या नोंदींची पडताळणी केली का? पोलिस विभागाने स्फोटक वाहतुकीवर नियंत्रण ठेवले का? आणि राज्याच्या खुफिया विभागाने सीमावर्ती हालचालींवर लक्ष ठेवले का? असे अनेक प्रश्न आता ऐरणीवर आले आहेत. स्थानिक नागरिकांच्या मते, संपूर्ण खाण पट्ट्याची संयुक्त तपासणी करून उत्खननाचे प्रमाण, ब्लास्टिंगचा वापर, स्फोटक पुरवठादार, वाहतूक मार्ग, साठवणूक व्यवस्था आणि संबंधित आर्थिक व्यवहारांची चौकशी केल्यास मोठे घबाड समोर येऊ शकते.

# रामपुरी कॅम्पमधील बिबट जेरबंद

**सहा तासांचे शर्थीचे प्रयत्न**





**अमरावती/प्रतिनिधीः-** शहराच्या मध्यवर्ती आणि दाट लोकवस्तीच्या रामपुरी कॅम्प परिसरात मंगळवारी दुपारी अचानक 'जंगलाचा पाहुणा' अवतरल्याने नागरिकांची अक्षरशः तारांबळ उडाली. अंदाजे सात ते आठ महिन्याचा बिबट थेट एका गोदामात शिरल्याची घटना समोर येताच परिसरात भीती, गोंधळ आणि प्रचंड कुतूहलाचे वातावरण निर्माण झाले. तब्बल सहा तास सुरू असलेल्या थरारक रेस्क्यू ऑपरेशननंतर वन विभाग, पोलीस प्रशासन आणि बचाव पथकाने अखेर सायंकाळी बिबट्याला सुरक्षितपणे जेरबंद केले.

रामपुरी कॅम्प परिसरातील रहिवासी राजेंद्र तेजवानी हे दुपारी आपल्या फर्निचर गोदामात गेले असता आतमध्ये बिबट्या दबा धरून बसल्याचे त्यांच्या लक्षात आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता गोदामाचे शटर बाहेरून बंद केले आणि तात्काळ वन विभागाला माहिती दिली. त्यांच्या या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची चर्चा परिसरात सुरू होती. घटनेची माहिती मिळताच गाडगे नगर पोलीस ठाण्याचे अधिकारी, वन विभागाचे बचाव पथक, महानगरपालिकेचे पशुवैद्यकीय अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थांचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले. सुरक्षेच्या दृष्टीने परिसर पूर्णतः बंदिस्त करण्यात आला. मात्र बिबट्याला ☞(पान २ वर)

# मुऱ्हा देवी येथील मिनी बँक संचालकाचा लाखो रुपयांवर डल्ला

## परिसरातील १०-१२ बचत गटांची फसवणूक

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** ग्रामीण भागातील नागरिकांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या 'मिनी बँक' संकल्पनेला हरताळ फासणारा एक धक्कादायक प्रकार अंजनगाव तालुक्यातील मुऱ्हा देवी येथे उघडकीस आला आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मिनी बँक संचालकाने परिसरातील १० ते १२ बचत गटांतील महिलांची सुमारे ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.



मुऱ्हा देवी येथील बचत गटाच्या महिला मागील काही दिवसांपासून आपल्या हक्काचे पैसे काढण्यासाठी मिनी बँकेत चकरा मारत होत्या. मात्र, संचालक दरवेळी काहीतरी कारण सांगून महिलांना रिकाम्या हाती परत पाठवत होता. संशय बळावल्याने या महिलांनी थेट सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अंजनगाव ☞(पान २ वर)

### ■ बनावट पावत्यांचा केला वापर


या घोटाळ्यात संचालकाने अत्यंत चलाखीने बनावट पावत्यांचा वापर केला. राष्ट्रीयकृत बँकेचे नाव असल्याने नागरिकांनी विश्वासाने पैसे जमा केले होते. मात्र, प्रत्यक्षात ही रक्कम बँकेपर्यंत पोहोचलीच नाही. यामुळे 'राष्ट्रीयकृत बँकांच्या या मिनी बँकांवर नक्की नियंत्रण कोणाचे?' असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत असून इतरही मिनी बँकेच्या चौकशीची मागणी होत आहे.

# शहीद भगतसिंग हॉकर्स युनियनचे प्रहारमध्ये विलीनीकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील शहीद भगतसिंग हॉकर्स युनियनचे प्रहार जनशक्ती पक्षात अधिकृत विलीनीकरण करण्यात आले असून, यापुढे ही संघटना 'प्रहार हॉकर्स युनियन' या नावाने कार्य करणार आहे. या प्रवेश सोहळ्याला आमदार बच्चू कडू यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने हॉकर्स बांधव उपस्थित होते. आ. बच्चू कडू यांच्या उपस्थितीत शहीद भगतसिंग हॉकर्स युनियनच्या संपूर्ण ☞(पान २ वर)

# फिशरीज हब प्रकल्पाच्या प्रगतीचा विभागीय आयुक्तांकडून आढावा



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरात प्रस्तावित अत्याधुनिक फिशरीज हब प्रकल्पाच्या उभारणीसंदर्भात आज महानगरपालिकेत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी आशिष येरेकर तसेच महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या उपस्थितीत आयोजित बैठकीत प्रकल्पाच्या विविध तांत्रिक, प्रशासकीय व विकासात्मक बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत मत्स्य विभाग व महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत प्रकल्पासंदर्भातील सादरीकरण करण्यात आले. प्रकल्पातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे ☞(पान २ वर)

# नांदगावात कृत्रिम पाणीटंचाई तीव्र

## नगरपंचायतच्या दालनात दगडावर जलभिषेक करून माकप चे आंदोलन



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** हल्ली उन्हाळ्याच्या दिवसात नांदगाव शहरामध्ये तीव्र आणि भीषण कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाली असून, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे संतप्त झालेल्या , नागरिकांनी नगरपंचायत प्रशासनाच्या दालना समोर दगडावर पाणी टाकून जलभिषेक ☞(पान २ वर)

# कत्तलीसाठी आणलेली १९ जनावरे घेतली ताब्यात

## -अंजनगाव सुर्जी पोलिसांची कारवाई, गोशाळेत रवानगी

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि अवैध गोवंश कत्तलीस प्रतिबंध करण्यासाठी अंजनगाव सुर्जी पोलिसांनी एक मोठी विशेष मोहीम राबवली. या धडक कारवाईमध्ये कत्तलीच्या उद्देशाने आणलेली तब्बल १९ जनावरे पोलिसांनी ताब्यात घेतली असून, त्यांची सुरक्षितपणे गोशाळेत रवानगी करण्यात आली आहे.

अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या थेट आदेशान्वये ही मोहीम राबवण्यात आली. बकरी ईदच्या काळात अवैध जनावरांची वाहतूक किंवा बेकायदेशीर कत्तल रोखण्यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सतर्क आहे. याच सतर्कतेचा भाग म्हणून ही संवेदनशील कारवाई करण्यात आली.ही मोहीम यशस्वी करण्यासाठी केवळ पोलीस प्रशासनच नाही, तर स्थानिक नगरपरिषद आणि पशुवैद्यकीय विभागाचीही मदत घेण्यात आली. शासकीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी जनावरांची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या संयुक्त कारवाईमुळे अवैध कृत्य करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.ही यशस्वी कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये प्रामुख्याने निकेतन कदम (पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण) दत्ता तोटेवाड (अप्पर पोलीस अधीक्षक), मनीष ठाकरे (उपविभागीय पोलीस अधिकारी, अंजनगाव)☞(पान २ वर)

# सोयाबीनचा भाव ७२०० पार

## भाव वाढीचा शेतकऱ्यांना फायदा नाही,साठेबाजाचे चांगभलं



**नांदगाव खंडेश्वर /प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांच्या घरात सोयाबीनचा दाना शिल्लक नसल्यावर सोयाबीन मध्ये झालेली भाव वाढ म्हणजे शेतकऱ्यांचे जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असून झालेल्या भाव वाढीमुळे साठेबाजाचे चांगभलं व फायदा होऊन शेतकऱ्याची मात्र सरासरी ३००० रुपये प्रतिक्विंटल लूट झाली अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांकडे सोयाबीन नसल्यामुळे बाजारात आवक मंदावली आणि भावाने उसळी घेतली. नांदगाव बाजार समितीत सोयाबीनला ७२०० पार भाव मिळाला. या भाववाढीचा फायदा साठेबाजांना होत आहे. सोयाबीनच्या ☞(पान २ वर)

# पाचही झोनला जणगणना संचालनालय उप महाराजिस्ट्रार यांची भेट



**अमरावती/प्रतिनिधीः-** यशवंत पाटील, जणगणना संचालनालय उप महाराजिस्ट्रार तसेच योगेश पीठे, उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी यांनी आज पाचही झोनला भेट देऊन सुरू असलेल्या जनगणना कामाचा आढावा घेतला.☞(पान २ वर)

# मोदी सरकारकडून जनतेची लूट - काँग्रेस आक्रमक

## पेट्रोल-डिझेलच्या ८ रुपयांच्या दरवाढीचा तीव्र निषेध!



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने आज मंगळवार, दिनांक २६ मे २०२६ रोजी या अन्यायकारक दरवाढी व इंधन टंचाईच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या भाजप सरकारने केवळ गेल्या चार दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या ☞(पान २ वर)

# शहराच्या विकासात्मक अॅक्शन प्लॅन वर प्रश्नोत्तरांची परिषद?

## आचारसंहितेचा दाखला देत विकास आराखड्यावर थेट भाष्य टाळले



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** यवतमाळ शहर नगरपरिषदेच्या १०० दिवसांच्या अॅक्शन प्लॅनच्या पार्श्वभूमीवर आज स्थानिक केमिस्ट भवन येथे नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांनी पत्रकार परिषद घेतली. मात्र, अपेक्षेप्रमाणे शंभर दिवसांच्या कृती आराखड्याची सविस्तर माहिती देण्याऐवजी ही पत्रकार परिषद शहरातील विविध समस्या, विकासात्मक कामे आणि प्रश्नोत्तरांवरच अधिक केंद्रित राहिल्याचे दिसून आले.पत्रकार परिषदेत ☞(पान २ वर)